

९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | रविवार | दि. १८ ऑक्टोबर २०२६ | अंक १३२ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

विकणे आहे

अलिबाग ब्राह्मणआळी युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचा व्यापारी गाळा विकणे आहे.

मोहनिश जोग
मो.9970666203

महायुतीत पुन्हा ठिणगी



राष्ट्रवादी, शिंदे गटातील वाद पेटला
आमदार थोरवेंकडून बैलमारेंना धमकी?

एल ॲन्ड टी कंपनीमधील कामगारांच्या प्रश्नांवरून कलह

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्ह्यात शिंदे गटातील आमदार महेंद्र थोरवे आणि खालापूर राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे यांच्यामध्ये श्रेयवाद पेटला आहे. ''एल ॲन्ड टी कंपनीत जायाचे नाही, अन्यथा ठार मारू,'' अशी धमकी आमदार थोरवे यांनी दिल्याचा आरोप बैलमारे यांनी केला आहे. त्यामुळे राजकीय कलह आता टोकाला पोहचू लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार खालापूर तालुक्यातील सावरोलीमध्ये गेल्या वर्षभरापासून एल ॲन्ड टी कंपनी काम करीत आहे. साधारणतः ३५ एकर क्षेत्रामध्ये वसलेल्या या कंपनीमध्ये स्थानिकांना रोजगार व व्यवसाय मिळावा, म्हणून खालापूरचे राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष तथा रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य, राष्ट्रवागदीचे गट नेते संतोष बैलमारे यांनी कंपनीत पत्रव्यवहार केला होता. मात्र, कंपनीने दखल घेतली नाही. त्यामूळे बैलमारे यांनी ३ सप्टेंबरला उपोषण करणार, असा इशारा दिला होता. अखेर पोलीस व महसूल प्रशासनाने मध्यस्थी करीत कंपनी प्रशासनाची बैठक घेतली. या बैठकीमध्ये स्थानिकांना ३० सप्टेंबरपर्यंत घेण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.•➤पान २ वर

> बैलमारे आणि इतर कार्यकर्ते गेल्या दोन दिवसांपासून एल ॲन्ड टी कंपनीचे गेट बंद करण्याची भाषा करीत स्टंटबाजी करत आहेत. मी लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांना फोन करून समजावले होते. कामांच्या मुद्द्यावर चर्चा देखील केली. मात्र, त्यांनी माझ्यावर हातपाय तोडण्याची भाषा केल्याचा आणि शिवीगाळ केल्याचा जो आरोप केला आहे, तो अत्यंत चुकीचा आणि निराधार आहे. या प्रकरणाची सत्यता समोर यावी म्हणून रायगड जिल्हा पोलीस अधिक्षकांना फोन करून कॉल रेकॉर्डिंग काढून तपासावे, अशी विनंती केली आहे.
> – आमदार महेंद्र थोरवे

> खालापूर तालुक्यातील सावरोली या गावात एल ॲन्ड टी कंपनी आली. स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून गावातील तरुणांना रोजगार आणि व्यवसाय उपलब्ध व्हावा, यासाठी कंपनीकडे मागणी केली. अखेर कंपनीने रोजगार देण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार, तरुणांना कंपनीत घेण्याचे ठरले. मात्र, आमदार थोरवे यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर करीत तरुणांचा रोजगार अडविण्याचे काम केले आहे. – संतोष बैलमारे, जिल्हा परिषद सदस्य

शिक्षकाला पावणे तीन लाखांचा गंडा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबागमधील एका माध्यमिक शिक्षकाला २ लाख ७१ हजार ५०० रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. फॉरेक्समधील गुंतवणकीवर दर महिन्याला सात ते आठ टक्के मासिक परताव्याचे अमिष दाखवून आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मागील तीन वर्षांपासून ते अलिबागमध्ये नोकरीनिमित्त राहत आहेत.

याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अंबरनाथ येथील प्रमोद जैसवाल यांच्याविरोधात लेखी तक्रार देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२४ मध्ये अलिबाग येथील हॉटेल रविकिरण येथे आयोजित बैठकीत प्रमोद जैसवाल याने शिक्षकांना फॉरेक्स (फॉरेन एक्सचेंज) गुंतवणूक योजनेची माहिती दिली होती. बॉट ब्रो नावाची कंपनी •➤पान २ वर

तरुणाच्या अकस्मात मृत्यूने खळबळ

शवविच्छेदन अहवालानंतर चित्र होणार स्पष्ट

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

अलिबागमधील वरसोली येथील एका लॉजवर २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तरुणाच्या आकस्मात मृत्यूनंतर अलिबागमध्ये खळबळ उडाली आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मात्र, शवविच्छेदन अहवालानंतर खरे चित्र स्पष्ट होणार असुन, आता सर्वांनाचा अहवालाची प्रतिक्षा लागून राहिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पवन वासूदेव कोटकर असे या मृत तरुणाचे नाव आहे. हा तरुण मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील रहिवासी आहे. तो अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील लोटस कॉटेजमध्ये मुंबईतील ३१ वर्षीय एका विवाहीत महिलेसोबत आला होता. त्याने दुपारी रुम बुक केली. मात्र, •➤पान २ वर

व्हीसेरा कलिनामध्ये पाठविणार

पवन कोटकर या तरुणाच्या मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी हालचाल सुरु केली आहे. मृत व्यक्तीच्या शरीरातील अंतर्गत अवयव गोळा करून त्याचे नमुने अर्थात व्हिसेरा सिलबंद करून मुंबईतील कलिनामधील न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविले जाणार आहेत. दिल्या जाणार का, याबाबत स्पष्टता मागण्यात आली आहे.



टोरंटवरून सरकारला घरचा आहेर!

भाजप किसान मोर्चाचा प्रकल्पाला तीव्र विरोध
मंजुरी न देण्याची मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

राज्यात भाजपची सत्ता असताना कर्जतमधील टोरंट प्रकल्पाला शेतकऱ्यांकडून विरोध होत असतानाच आता भाजप किसान मोर्चानेही या प्रकल्पाच्या पर्यावरणीय परिणामांवरून सरकारला घरचा आहेर दिला आहे. पश्चिम घाटातील जैवविविधता, वनसंपदा आणि नैसर्गिक जलस्रोत धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त करत जलविद्युत व पंप्ड स्टोरेज प्रकल्पांना मंजुरी देऊ नये, अशी मागणी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव सुनील गोगटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. •➤पान २ वर

अभिजीत दिपकेंना जामीन मंजूर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांना शनिवारी (दि.१६) शांततेचा भंग होण्याची शक्यता असल्याच्या कारणावरून अटक करण्यात आली होती. 'लेहरा दो तिरंगा' आंदोलनापूर्वी कारवाईकनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये 'लेहरा दो तिरंगा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार•➤पान२ वर

चारा वाहतूक, विक्रीवर बंदी

- राज्याबाहेर होणारी विक्री रोखणार
- जिल्हाधिकारी यांच्याकडून आदेश जारी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्ह्यात पावसाअभावी चाऱ्याचा दुष्काळ मोठ्या प्रमाणात निर्माण होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातून इतर जिल्ह्यांसह गुजरात राज्यात होणाऱ्या चाऱ्याच्या वाहतूक व विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध राहावा आणि संभाव्य चारा टंचाई टाळता यावी, यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आदेश जारी केले आहेत. मात्र, शासकीय योजना, पशुसंवर्धन विभाग किंवा जिल्हा प्रशासनाकडून अधिकृत मंजुरी मिळालेल्या चारा वाहतुकीला या आदेशातून सूट देण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये यावर्षी पावसाने उशीरा हजेरी लावली. मात्र, सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यानंतर पावसाने दडी मारली. ऐन भात पिकांच्या हंगामात पावसाने दडी मारल्याने भात पिक पिवळे पडू लागले आहेत. त्यामुळे भात पिकांसह चाऱ्याचाही तुटवडा निर्माण होण्याची भिती अनेकांनी व्यक्त केली आहे. जिल्ह्यातील चारा साधारपणे गुजरात राज्यासह अन्य जिल्ह्यात पाठविला जातो. २०१९ च्या पशुगणनेनुसार, रायगड जिल्ह्यात •➤पान २ वर



सुंदर, निरोगी व प्रकाशमान डोळ्यांसाठी

K-Veda®

KHOJATI Over 175 Years SINCE 1847 TRADITION MOVING WITH TIME ORIGINAL

डोळ्यांना थंडावा देऊन दृष्टी स्वच्छ व निरोगी ठेवते.

खोजाती® त्रि-फलांजन®
शहद युक्त एकमात्र स्टराईल अंजन
दृष्टि वाढ़वण्या मध्ये मददगार


३५ वर्षाच्या वयानंतर दररोज वापर करो

खोजाती® ट्विंकल® आय ड्रोपस
असली गुलाबच्या अर्क युक्त


१२ वर्षाच्या वयानंतर दररोज वापर करो



डोळयांचा ताण जळजळणं कमी करून आराम

खोजाती® तूप अंजन®
नो जलन,नो थकन


आयुर्वेदिक युनानी पद्दतीने गाईच्या शुद्द तुपापासून बनवलेले अंजन

खोजाती® ट्रॉय-वॉश®
हर्बल त्रिफला ऑय वॉश


डोळयांना त्वरीत थंडावा देणारा

खोजाती® नीम अंजन®
आय ड्रोपस


नाजूक व दमलेल्या डोळयांना त्वरीत थंडावा देणारा

मोतियाबिंद आणि चश्मयाचे वाढते नंबरसाठी आयुर्वेदिक-युनानी पुस्तकात त्रिफलाचे वापर करण्याची सल्ला दिली गेली आहे.
टि.व्ही.-कॉम्प्यूटर-मोबायलने होणारा डोळयांना त्रास व प्रदुषणाने होणारी डोळयांची जळजळ ह्या पासून डोळयांचे संरक्षण.

KHOJATI® SINCE 1847

खोजाती आयुर्वेद फार्मा

प्रमुख मेडिकल आणि आयुर्वेदिक स्टोर्समध्ये उपलब्ध

022-23462600/01/02 | www.kveda.in @kvedabykhojati @kvedacare

सेझबाधितांचा प्रांत कार्यालयावर ठिय्या

सातबारा कोरा करण्याची मागणी



| पेण | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील पेण, उरण, पनवेल येथील ४५ गावांच्या जमिनी शासनाने सेझ प्रकल्पासाठी २००६ मध्ये भूसंपादित केल्या होत्या. मात्र, या जमिनींवर प्रकल्प झाला नसल्याने या जमिनींवरील सातबारावर लावण्यात आलेला सेझ शिक्का काढून सातबारा कोरा करावा, या मागणीसाठी सेझ बाधित शेतकरी संघर्ष समितीचा नुकताच प्रांत कार्यालय येथे ठिय्या आंदोलन करण्यात आला.

महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) प्रकल्पासाठी सन २००६ रोजी शासनाने सार्वजनिक प्रयोजनाच्या भूमिकेवर आणि राष्ट्राच्या विकासासाठी येथील जमिनी मागणीच्या आवाहनाला शेतकऱ्यांनी विश्वास ठेवून या सुपीक जमिनी प्रकल्पासाठी देऊ केल्या आहेत. त्यात रायगड जिल्ह्यातील पेण, उरण आणि पनवेल तालुक्यातील जवळपास ४५ गावांकडून ४ हजार ६८५ एकर जमिनी प्रकल्पासाठी भूसंपादित करण्यात आल्या परंतु गेली कित्येक वर्ष या जमिनींवर कोणत्याही प्रकारचा प्रकल्प उभा राहत नसल्याने संपादित करण्यात आलेल्या जमिनींचे सातबारा उतारे मूळ शेतकऱ्यांच्या नावे पूर्ववत करावेत या मागणीसाठी रायगडमधील सेझबाधित शेतकऱ्यांनी अनेकदा आंदोलने केली. परंतु, शासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने अखेर पुन्हा एकदा दि.१२ ऑक्टोबर रोजी सेझ बाधित शेतकरी हक्क संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली प्रति कार्यालय येथे सेझ बाधित शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा यासाठी असंख्य शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत याबाबतचे निवेदन प्रांत कार्यालयातील नायब तहसीलदार यांना देण्यात आले.

या आंदोलनाला राजन झेमसे, अभिमन्यू म्हात्रे, दिलीप म्हात्रे, अजित पाटील, विजय पाटील, राजेंद्र म्हात्रे, अशोक मोकल, तुषार पाटील, राजकीरण पाटील, सुनील पाटील, सचिन पाटील, संजय पाटील, प्रदीप पाटील, रविकांत म्हात्रे, गणेश पाटील, नीलेश ठाकूर आदिंसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

४ हजार ६८५ एकर क्षेत्राचे संपादन

महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) प्रकल्पासाठी सन २००६ रोजी शासनाने सार्वजनिक प्रयोजनाच्या भूमिकेवर आणि राष्ट्राच्या विकासासाठी येथील जमिनी मागणीच्या आवाहनाला शेतकऱ्यांनी विश्वास ठेवून या सुपीक जमिनी प्रकल्पासाठी दिल्या आहेत. त्यात रायगड जिल्हातील पेण, उरण आणि पनवेल तालुक्यातील जवळपास ४५ गावांकडून ४ हजार ६८५ एकर जमिनी प्रकल्पासाठी भूसंपादित करण्यात आलेल्या आहेत.



वाचन प्रेरणा दिवस साजरा

| माथेरान | प्रतिनिधी |

देशाचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त माथेरानच्या प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिरात वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड व गोडी निर्माण व्हावी यासाठी १३० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या माथेरानच्या करसनदास मुळशी वाचनालयात विद्यार्थ्यांची भेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांना वाचनालयात चार हजारच्या आसपास असणाऱ्या पुस्तकांची ओळख करून देण्यात आली. ग्रंथालयाच्या प्रभारी ग्रंथपाल स्वप्नाली जाबरे-सातपुते आणि संघपाल वाठोरे यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची आणि पुस्तकांची ओळख करून दिली. अनेक विद्यार्थ्यांनी वाचनालयात आणि आवारात बसून वाचन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रमेश ढोले, शिक्षिका विदुला गोसावी आणि कर्मचारी उपस्थित होते.

चित्रांच्या माध्यमातून समानतेचा संदेश



| रसायनी | प्रतिनिधी |

चौक येथील सरनोबत नेताजी पालकर विद्या मंदिरात मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्यावतीने 'लिंगभेद समानता' या महत्त्वपूर्ण सामाजिक विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील एकूण ९२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि रंगांच्या माध्यमातून मुलगा-मुलगी समानता, स्त्री-पुरुषांचे समान हक्क, शिक्षणातील समान संधी आणि समाजातील लिंगभेद दूर करण्याचा प्रभावी संदेश दिला.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये लिंगभेदाबाबत जागरूकता निर्माण करणे, मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव न करता दोघांनाही समान संधी मिळण्याची जाणीव करून देणे, तसेच समानतेवर आधारित समाजनिर्मितीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे हा होता. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्नांवरील आपले विचार सर्जनशील पद्धतीने मांडले. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शोभा, समितीचे सेक्रेटरी योगेंद्र शहा, मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक तसेच खालापूर पंचायत समितीच्या सदस्या पाटील या उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण विषयावर त्यांनी चित्रांच्या माध्यमातून व्यक्त केलेल्या विचारांचे विशेष कौतुक केले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, मुलगा आणि मुलगी हे दोघेही समान असून शिक्षण, खेळ, करिअर आणि जीवनातील प्रत्येक क्षेत्रात दोघांनाही समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येक व्यक्तीचा आदर करणे, एकमेकांच्या हक्कांचा सन्मान राखणे आणि समानतेची भावना दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पर्यटन बचाव संघर्ष समिती निद्रावस्थेत

| माथेरान | प्रतिनिधी |

प्रशासकीय राजवटीपासून माथेरानचा सर्वांगीण विकास खुंटला आहे. दहा महिन्यांपूर्वी नगरपरिषदेच्या सभागृहात लोकप्रतिनिधी कार्यरत आहेत. परंतु, ज्यांना निवडून सत्तेत विराजमान केलेले आहे त्यांच्याकडून महत्वाकांक्षी कामांबाबत काहीएक ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत. यासाठी प्रशासनाच्यावतीने लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून माथेरानची विकास कामे पूर्ण करून घेण्यासाठी पर्यटन बचाव संघर्ष समितीच्या पुढाकाराची गरज असल्याची स्थानिकांकडून मागणी केली जात आहे.

पर्वतीय स्थळ म्हणून नावलौकिक असणाऱ्या माथेरान पर्यटन स्थळावर संपूर्ण भूभाग हा



बिनशेतीचा असल्याने केवळ पर्यटन शेती हाच एकमेव व्यावसायिक आधार आहे. त्यावर स्थानिक लोकांसह तालुक्यातील जवळपास २५ हजार लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असतात. माथेरान हे पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यापासून बहुतेक विकास कामे पूर्ण करण्यासाठी स्थानिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. सनियंत्रण समिती, हेरिटेज कमिटी यांना माथेरानच्या मानगुटीवर बसविण्यात आल्याने येथील विकास कामे खोळंबली आहेत. त्यांच्या परवानगी शिवाय कामे केली जात नाहीत. गावातील महत्वपूर्ण कामे मार्गी लावण्यासाठी अनेकदा शर्थीचे प्रयत्न करावे लागत आहेत. त्यामुळेच राज्यातील अन्य स्थळांच्या तुलनेत माथेरान त्यामानाने खूपच पिछाडीवर पडले आहे.सद्यस्थितीत येथील जी काही विकास कामे आहेत किंवा अन्य काही पर्यटन वाढीच्या दृष्टीने महत्वपूर्ण कामे आहेत ही तडीस जाण्यासाठी मोठा कालावधी लागत आहे. एकीकडे प्रशासन सत्ताधाऱ्यांच्या पाठींब्यामुळे 'हम करे सो कायदा' प्रमाणे वावरताना दिसत असून प्रशासनावर अंकुश नसल्याने अनावश्यक कामे पूर्ण करून घेतली जात असल्याने जनतेच्या पैशाची उधळपट्टी स्थानिक उघड्या डोळ्यांनी पहात आहेत. त्यामुळे प्रशासनासोबतच लोकप्रतिनिधी सुद्धा हतबल दिसत असल्याने यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी पर्यटन बचाव संघर्ष समितीच्या पुढाकाराची गरज आहे. परंतु, काही महिन्यांपासून ही समिती निद्रावस्थेत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

मराठा समाजाचा दसरा मेळावा

| पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुका मराठा समाजाच्यावतीने पारंपरिक पद्धतीने आयोजित करण्यात येणारा दसरा मेळावा यंदा मंगळवारी (दि.२०) होणार आहे. पालीशिळोशी रोडवरील मराठा समाज भवनातील स्व. स.स. साजेकर सभागृहात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्याचे हे ३६वे वर्ष असून, संस्थेचे अध्यक्ष धनंजय सटूराम साजेकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडणार आहे.

दसरा मेळाव्याचे औचित्य साधून सुधागड तालुक्यातील मराठा समाजासाठी योगदान दिलेल्या समाजबांधव आणि भगिनींचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना 'समाजगौरव पुरस्कार' व 'समाजगौरव स्मृती पुरस्कार' प्रदान करण्याचे आयोजकांनी नियोजित केले आहे. समाजासाठी केलेल्या कार्याचा गौरव हा या सोहळ्याचा महत्त्वाचा भाग असणार आहे. पारंपरिक दसरा मेळाव्याच्या माध्यमातून समाजबांधवांना एकत्र येण्याची आणि परस्परांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. समाजाच्या उन्नतीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची ओळख इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठीही हा सन्मान सोहळा उपयुक्त ठरणार आहे. सामाजिक बांधिलकी आणि समाजातील आपुलकीचे नाते दृढ करण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला महत्त्व आहे.

जखमेवर मीठ सोडण्याचा धंदा बंद करा

| मुंबई | प्रतिनिधी |

■ **महेश तपासे यांचा सरकारला इशारा**

महाराष्ट्र शासन शिष्टाचार विभागाचा नवीन वाहन खरेदी करण्याचा जीआर तात्काळ रद्द करून हे पैसे दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या मदतीसाठी वापरण्यात यावा. उगाच महागड्या गाड्या घेऊन शेतकऱ्यांच्या दुखावलेल्या जखमेवर मीठ सोडण्याचा धंदा बंद करा, असा इशारा राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रवक्ते महेश तपासे यांनी केली.

महेश तपासे म्हणाले की, महाराष्ट्र दुष्काळग्रस्त झालेला आहे शेतकरी अश्रू ढाळत आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या शिष्टाचार विभागाच्या माध्यमातून १२ कोटींच्या ४४ नवीन गाड्या घेण्याचा निर्णय झालेला आहे. त्याचा जीआर शासनाने प्रसिद्ध केला आहे. ४ कोटींची महागडी लँड क्रूजर, १२ इनोव्हा क्रिस्टा कार, फॉर्च्यूनर गाड्या आणि इतर काही गाड्या अशा एकूण ४४ गाड्या किमान साडेबारा कोटी रुपयांच्या आहेत. अशी तरतूद वित्त विभागाने केलेली आहे. आणि त्याच माध्यमातून राज्य शिष्टाचार विभागाने जीआर काढला आहे. ते पुढे म्हणाले की, तो जीआर तात्काळ रद्द करा आणि ते साडेबारा कोटी रुपये पिण्याच्या पाण्यासाठी तसेच जनावरांची छावणी असेल किंवा शेतकऱ्यांसाठी जी काही आर्थिक मदत करता येईल त्याच्यासाठी खर्च करावा. उगाच महागड्या गाड्या घेऊन शेतकऱ्यांच्या दुखावलेल्या जखमेवर मीठ सोडण्याचा धंदा बंद करा, असा इशाराही तपासे यांनी यावेळी सरकारला दिला आहे.

पोलादपूरचे वसतिगृह आता खारघरमध्ये

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई परिसरातील शैक्षणिक संस्थांचे जाळे पाहता मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी खारघर येथे सरकारी वसतिगृह उभारणे पूरक ठरणार आहे. त्यामुळे पोलादपूर येथे मंजूर झालेले मुलांचे सरकारी वसतिगृह आता खारघर सेक्टर ५ मधील १,१७७ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर उभारण्यात येणार आहे. हा भूखंड १ कोटी ३८ लाख २९ हजार ७९९ रुपयांना खरेदी करण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील दुर्गम तालुक्यात मंजूर झालेले वसतिगृह शैक्षणिक सुविधांची अधिक उपलब्धता असलेल्या परिसरात स्थलांतरित होणार आहे.

पोलादपूर येथे मुलांचे शासकीय वसतिगृह उभारण्यास २८ जून २००७ रोजी मान्यता देण्यात आली होती. मात्र, या तालुक्यात शाळा आणि महाविद्यालयांची संख्या कमी असून एकही व्यावसायिक महाविद्यालय नसल्याने वसतिगृहातील सर्व जागा भरल्या जाण्याची शक्यता कमी होती. त्यामुळे हे वसतिगृह अद्याप सुरू झालेले नव्हते. दुसरीकडे, खारघर, पनवेल आणि नवी मुंबई परिसरात व्यावसायिक तसेच बिगरव्यावसायिक महाविद्यालये आणि अन्य शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात असल्याने येथे वसतिगृहाची गरज अधिक होती. कारण शैक्षणिक संस्थांची उपलब्धता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणासाठी शहरात येणाऱ्या विद्यार्थ्यांना निवासाची अडचण भेडसावू शकते. आता खारघरमध्ये जमीन खरेदीला मान्यता मिळाल्याने बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे.

मागासवर्गीय मुला-मुलींच्या सरकारी वसतिगृहांमध्ये एकूण प्रवेशक्षमतेपैकी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी ८५ टक्के जागा राखीव असतील. २०१८ पासून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी रिक्त राहिलेल्या जागांवर अन्य प्रवर्गांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देता येत नाही. त्यामुळे पोलादपूरसारख्या ठिकाणी वसतिगृहातील सर्व जागा भरण्यात अडचणी येण्याची शक्यता होती.

खारघर, बेलापूर व नेरूळ या तीन भागात मिळून अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन इत्यादी अभ्यासक्रमांच्या ५० हून अधिक नामांकित उच्च शिक्षण संस्था आहेत. यात सरस्वती महाविद्यालय, भारती विद्यापीठ, अण्णासाहेब चुडामण पाटील, पिल्लई, महाविद्यालय, भारती विद्यापीठ, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, तेरणा महाविद्यालय, राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्था, एनएमआयएमएस, एसआयईएस, आयटीएम इत्यादी संस्थांचा समावेश आहे.

पोलादपूरसाठी मंजूर असलेले वसतिगृह पनवेल येथे सुरू करण्याचा विचार झाला होता. मात्र, तेथे सरकारी इमारत उपलब्ध नसल्याने खारघरमधील भूखंडावर वसतिगृह उभारण्याचा पर्याय पुढे आला.

पान १ वरुन

महायुतीत पुन्हा ठिणगी

परंतु, त्या आश्वासनाची पुर्तता कंपनीने मुदतीत केली नाही. त्यामुळे १३ ऑक्टोबरला पुन्हा उपोषण करण्याचा इशारा दिला. अखेर महसूल प्रशासनाने परत मध्यस्थी करीत तहसील कार्यालयात १९ ऑक्टोबरला दुपारी बैठक घेतली जाईल, असे आश्वासन दिले.

दरम्यान, बैलमारे यांना आमदार थोरवे यांनी फोन करून ''कंपनी मी आणली आहे, कंपनीत जायाचे नाही. अन्यथा तंगड्या तोडून ठार मारू,'' अशी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. सध्या खालापूर येथील एल ॲन्ड टी कंपनीच्या कामगारांच्या प्रश्नावरून आणि श्रेयवादातून संतोष बैलमारे आणि आमदार थोरवे यांच्यामध्ये राजकीय वाद पेटू लागले आहे. त्यामुळे आता बैलमारे काय भुमिका घेणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

तरुणाच्या अकस्मात मृत्यूने खळबळ

दुपारनंतर अचानक त्याची प्रकृती बिघडली. त्यामुळे त्याला अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील अपघात विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासून तो अगोदरच मृत असल्याचे घोषित केले. यावेळी कोणाचीही तक्रार नसल्याने मृतदेह शवविच्छेदन न करता, नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला होता. परंतु, या तरुणाचा मृत्यू संशयास्पद असल्याचा आरोप झाल्यावर पोलीस आणि आरोग्य प्रशासन खडबडून जागे आणि नातेवाईकांच्या ताब्यात दिलेला मृतदेह पुन्हा रुग्णालयात आणण्यास सांगितले. त्यानंतर डॉक्टरांनी रात्री पावणेदहा वाजता तरूण उपचारापुर्वी मयत झाल्याचे घोषित केले आणि मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.

त्यामुळे तरुणाच्या आकस्मात मृत्यूने अलिबागमध्ये खळबळ उडाली असून, शवविच्छेदनाच्या अहवालानंतर खरे चित्र स्पष्ट होणार असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस हवालदार राकेश जोशी अधिक तपास करीत आहेत. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी जाऊन रुमची तपासणी केली असून, त्याठिकाणी सापडलेल्या वस्तू ताब्यात घेतल्या आहेत.

यापुर्वीदेखील लॉजमध्ये आल्याची चर्चा

वरसोली येथील लोटस लॉजमध्ये आलेल्या तरुणासोबत आलेली त्याची मैत्रिण विवाहीत असून, ती दोन मुलांची आई आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्याच्यासोबत तिची मैत्री होती. यापुर्वीदेखील ते दोघेजण याच ठिकाणी फिरण्यासाठी आले होते, अशी चर्चा सुरु आहे.

शिक्षकाला पावणे तीन लाखांचा गंडा

स्थापन केली असून, कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित सॉफ्टवेअरच्या माध्यमातून दरमहा सात ते आठ टक्के परतावा मिळेल, असे आश्वासन त्याने दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या आश्वासनावर विश्वास ठेवून शिक्षकांनी ऑक्टोबर २०२४ मध्ये टप्प्याटप्प्याने गुगल पेच्या माध्यमातून २ लाख १० हजार रुपये जैसवाल याला पाठवले. सुरुवातीचे सहा महिने त्यांना नियमित परतावा मिळाला. त्यानंतर संबंधित योजनेचे नाव बदलून अल्फा बॉट आणि पुढे कॉस मार्केट असे करण्यात आले. तसेच, परतावा अमेरिकी डॉलरमध्ये देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर जून्या योजनेत बदल करून क्रॉस मार्केट असे कंपनीचे नाव ठेवण्यात आले. ऑक्टोबर २०२५ मध्ये त्यांनी पुन्हा ५० हजार रुपयांची गुंतवणूक केली. योजनेच्या नूतनीकरणासाठी त्यांनी आणखी ११ हजार ५०० रुपये दिले. अशा प्रकारे त्यांनी एकूण २ लाख ७१ हजार ५०० रुपयांची गुंतवणूक केली. मात्र, नोव्हेंबर २०२५ पासून त्यांना मिळणारा परतावा अचानक बंद झाला. परतावा बंद झाल्याबाबत जाब विचारल्यानंतर जैसवाल याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यानंतर त्याने त्यांचा मोबाईल क्रमांक ब्लॉक करून संपर्क तोडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी आर्थिक व्यवहारांचे पुरावे सादर करत अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी अलिबाग पोलीस पुढील तपास करत आहेत.

चारा वाहतूक, विक्रीवर बंदी

१ लाख ७६ हजार ९०६ गायी, ९० हजार १८८ शेळी, ६२ हजार २२५ म्हैस आणि २ हजार २०३ मेंढी इतके पशूधन आहे. मात्र, यावर्षी चाऱ्याची वाहतूक व विक्री अन्य जिल्ह्यासह राज्यात न करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे.

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात उत्पादित होणारा चारा मोठ्या प्रमाणावर इतर जिल्ह्यांत विक्रीसाठी पाठविला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात जिल्ह्यात चारा टंचाई निर्माण होऊन पशुधनाच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जिल्ह्याच्या हद्दीतून इतर कोणत्याही जिल्ह्यात किंवा राज्याबाहेर कडबा, कुट्टी, पेंढा यांसह सर्व प्रकारच्या ओल्या व सुक्या चाऱ्याची वाहतूक आणि विक्री करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि संभाव्य चारा टंचाईवर नियंत्रण ठेवणे असेही आदेश पशुधन विभागाला देण्यात आले आहेत.

अभिजीत दिपकेंना जामीन मंजुर

यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ आंदोलन केले जाणार होते. या कार्यक्रमासाठी परवानगी नसल्याचे सांगत दिल्ली पोलिसांनी कारवाई केली. त्यानंतर शनिवारी (दि.१७) त्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना सशर्त जामीन मंजूर करत शांतता राखण्याचा बाँड भरण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर त्यांची सुटका होणार असल्याची माहिती मिळाली आहे. तसेच, जामीन मंजूर झाल्यामुळे त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवले जाणार नाही. यावेळी दिपके यांच्यासह ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या अध्यक्ष नेहा बोरा यांनाही ताब्यात घेण्यात आले होते. त्यांना देखील शनिवारी सकाळी ताब्यात घेण्यासंबंधीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोडण्यात आले. त्यांनी पोलिसांच्या कारवाईवर टीका करत सर्व आंदोलकांची सुटका करण्याची मागणी केली होती.

टोरंटवरून सरकारला घरचा आहेर!

पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने २७ जुलै २०२६ रोजी पश्चिम घाट पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रासंदर्भात प्रसिद्ध केलेल्या प्रारूप अधिसूचनेचा अभ्यास करून गोगटे यांनी ही भूमिका मांडली आहे. रायगड आणि पुणे जिल्ह्यांतील पश्चिम घाट परिसरात प्रस्तावित धरणे, जलविद्युत आणि पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमुळे जंगलतोड, डोंगरकपात, वन्यजीवांचे अधिवास आणि नैसर्गिक जलप्रवाहांवर गंभीर परिणाम होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

कर्जत तालुक्यातील टोरंट प्रकल्पामुळे पेज नदीचे पर्यावरणीय आरोग्य, जैवविविधता, मासेमारी, शेती आणि स्थानिक पाणीपुरवठा प्रभावित होण्याची शक्यताही त्यांनी अधोरेखित केली आहे. त्यामुळे रायगड आणि पुणे जिल्ह्यांतील सर्व प्रस्तावित प्रकल्पांचा एकत्रित पर्यावरणीय परिणाम अभ्यास करूनच निर्णय घ्यावा, तसेच स्थानिक ग्रामसभा, नागरिक आणि पर्यावरणतज्ज्ञांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकल्पाला अंतिम मंजुरी देऊ नये, अशी मागणी गोगटे यांनी केली आहे.

बी. फार्मसीचा निकाल १०० टक्के

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासंकुलातील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजचा बी. फार्मसी अंतिम वर्षाच्या (सेमिस्टर ८) पहिल्याच बॅचचा निकाल १०० टक्के लागला आहे. महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय आणि उत्कृष्ट यशाबद्दल फार्मसी महाविद्यालयात आनंदाचे वातावरण असून पालक वर्गांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील या अंतिम वर्षाच्या निकालात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. परीक्षेत यश संपादन केलेल्या बी फार्मसी कॉलेजच्या या पहिल्या बॅचमधील सिद्धी पाटील, अर्शी साखरेकर व स्वरंगी वडकर हे तीन विद्यार्थी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. बिमलेश यादव हा विद्यार्थी द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला तर श्रावणी धुंद्रे, सानिका म्हात्रे व अतिया मुजावर हे तीन विद्यार्थी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. तसेच रिद्धी चाफे, सिद्धी पाटील व साक्षी काटे या विद्यार्थ्यांनी ही विशेष प्राविण्य मिळविले आहे.

कळंबोलीच्या पाणीप्रश्नावर ॲड. निशा ठाकूर आक्रमक

| पनवेल | प्रतिनिधी |

कळंबोली वसाहतीतील तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर महागौरी फाऊंडेशनच्या अध्यक्षा ॲड. निशा ठाकूर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. कळंबोलीकरांना नियमित पाणीपुरवठा मिळावा, या मागणीसाठी सुरू असलेल्या उपोषणस्थळी भेट देत त्यांनी उपोषणकर्ते स्वप्नील घाडगे यांच्याशी संवाद साधला. तसेच, कळंबोलीच्या पाणीप्रश्नावर सिडकोविरोधात न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

कळंबोली वसाहतीतील विविध भागांमध्ये पाणीपुरवठ्याची समस्या कायम असून, नागरिकांना नियमित पाणी मिळण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर स्वप्नील घाडगे यांनी सिडको कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाला ॲड. निशा ठाकूर यांनी भेट देत पाणीटंचाईच्या प्रश्नाची दखल घेतली.

पाणी हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित मूलभूत प्रश्न आहे. त्यामुळे कळंबोलीकरांना नियमित पाणीपुरवठा मिळावा, यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सिडको प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही न झाल्यास न्यायालयीन मार्गाचा अवलंब केला जाईल, अशी भूमिका ॲड. ठाकूर यांनी मांडली.

दरम्यान, कळंबोलीतील पाणीप्रश्नावर सुरू असलेले उपोषण शुक्रवारी स्थगित करण्यात आले आहे. मात्र, पाणीटंचाईचा प्रश्न अद्याप कायम असल्याने नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा कधी होणार, याकडे लक्ष लागले आहे. आता या प्रश्नावर सिडको प्रशासन काय भूमिका घेते आणि प्रस्तावित न्यायालयीन याचिकेबाबत पुढे काय घडते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पाली नगरपंचायतीचा पाणी साठवणुकीवर भर

आंबा नदीवर दोन लघु बंधाऱ्यांची उभारणी पूर्ण; केटी बंधाऱ्यावर प्लेट लावण्याचे काम सुरु

। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याच्या पार्श्वभूमीवर आगामी उन्हाळ्यात पाली शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी पाली नगरपंचायतीने पाणी साठवणूक आणि पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर भर दिला आहे. उपलब्ध पाणीसाठा अधिक काळ टिकवून ठेवण्यासाठी आंबा नदीवर दोन ठिकाणी लघु बंधाऱ्यांची उभारणी पूर्ण करण्यात आली आहे. तसेच दरवर्षी डिसेंबर महिन्यात पाणी अडवण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या केटी बंधाऱ्यावर प्लेट लावण्यात येतात; मात्र यंदा हे काम ऑक्टोबर महिन्यातच सुरू झाले आहे. यासाठी नगरपंचायतीने पाटबंधारे विभागाकडे पत्रव्यवहार करून लवकर काम सुरू करण्याची



मागणी केली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने प्लेट लावण्याचे काम सुरू झाले आहे. यासोबतच पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाइनमधील गळती रोखण्यावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

दरवर्षी डिसेंबर महिन्यात पाटबंधारे विभागामार्फत केटी बंधाऱ्यावर प्लेट लावून नदीतील पाणी अडवले जाते. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने उपलब्ध पाण्याचे नियोजन वेळेत करणे आवश्यक बनले आहे. ही बाब लक्षात घेऊन पाली नगरपंचायतीने केटी बंधाऱ्यावर प्लेट लावण्याची प्रक्रिया नेहमीपेक्षा लवकर सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला.

नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी यासंदर्भात पाटबंधारे विभागाकडे पत्रव्यवहार करून ऑक्टोबर महिन्यातच प्लेट लावण्याचे काम सुरू करण्याची मागणी केली. या मागणीला पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

वेळेत पाणी अडवण्याची व्यवस्था झाल्याने नदीतील उपलब्ध पाणीसाठा टिकवून ठेवण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य परिस्थितीचा विचार करून आधीपासूनच नियोजन करण्यावर नगरपंचायतीने भर दिला आहे.

आंबा नदीतील पाणी अधिक काळ उपलब्ध राहावे, यासाठी पाली नगरपंचायतीने नदीवर दोन ठिकाणी लघु बंधारे उभारले आहेत. त्यापैकी एक बंधारा जॅकवेलजवळ, तर दुसरा पेठे परिसरात बांधण्यात आला असून दोन्ही बंधाऱ्यांची उभारणी पूर्ण झाली आहे.

या बंधाऱ्यांमुळे नदीतील उपलब्ध पाणी अडवून त्याचा साठा टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते. केटी बंधाऱ्यावर प्लेट लावण्याचे काम आणि दोन लघु बंधाऱ्यांची उभारणी या माध्यमांतून पाणी साठवणुकीसाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. आगामी काळात शहराच्या पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण होऊ नये आणि उपलब्ध पाण्याचा अधिक काळ उपयोग करता यावा, हा या उपाययोजनांमागील प्रमुख उद्देश आहे.

पाणीसाठा वाढवणे, नदीतील पाणी अडवणे आणि पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती रोखणे, अशा विविध उपाययोजनांमुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यास मदत होणार आहे. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि भविष्यातील संभाव्य टंचाईचा धोका कमी करण्यासाठी या कामांना महत्त्व आहे.

गळती रोखण्यावर भर

पाणी साठवणुकीबरोबरच उपलब्ध पाण्याचा अपव्यय टाळणेही महत्त्वाचे आहे. यासाठी पाली नगरपंचायतीने पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनच्या दुरुस्तीवर लक्ष केंद्रित केले आहे. ज्या ठिकाणी पाइपलाइन खराब झाल्या होत्या किंवा पाण्याची गळती होत होती, त्या ठिकाणी दुरुस्तीची कामे हाती घेऊन गळती रोखण्यात आली आहे.

निवडक

तळोजा कारागृहात चरस तस्करीचा प्रयत्न

पनवेल : तळोजा मध्यवर्ती कारागृहाच्या कडेकोट सुरक्षाव्यवस्थेतही अमली पदार्थ पोहोचवण्याचा प्रयत्न होत असल्याचे समोर आले आहे. कारागृहातील मुलाखत प्रतीक्षालयाच्या पत्र्यावर चरस असलेली पुडी आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या पुडीत १९.४ ग्रॅम चरस असून, त्याची अंदाजे किंमत ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. कारागृहाच्या आतील बाजूस असलेल्या मुलाखत प्रतीक्षालयाच्या पत्र्यावर एक संशयास्पद पारदर्शक प्लास्टिकची पुडी आढळली. कारागृहातील पोलिसांनी तपासणी केली असता, या पुडीत तपकिरी रंगाचा चिकट चरस असल्याचे निष्पन्न झाले. चरस कागदामध्ये गुंडाळून त्यावर सुरक्षिततेसाठी पिवळ्या रंगाची सेलो टेप लावण्यात आली होती. प्राथमिक तपासानुसार, कारागृहात बंदिस्त असलेल्या एखाद्या कैद्याला अमली पदार्थ पुरवण्याच्या उद्देशाने अज्ञात व्यक्तीने ही पुडी बाहेरून फेकली असावी, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, हा प्रकार नेमका कोणी केला आणि त्यामागे कोणाचा सहभाग आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारागृहाच्या परिसरात अमली पदार्थ पोहोचवण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती बाहेरील आहे की तिला कारागृहातील कोणाची मदत मिळाली, याचा तपास पोलीस करीत आहेत. तळोजा मध्यवर्ती कारागृहात सुरक्षा व्यवस्था कडक असतानाही अशा प्रकारे अमली पदार्थ आढळल्याने सुरक्षा यंत्रणांसमोर प्रश्न निर्माण झाला आहे. या घटनेमागील सूत्रधाराचा शोध घेऊन कारागृहात अमली पदार्थांचा पुरवठा करण्याचे संभाव्य मार्ग उघड करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.



दोन अनोळखी इसमांची हातचलाखी

पनवेल : ओळखीचे असल्याचे भासवून बोलण्यात गुंतवत एका ६४ वर्षीय इसमाची सोन्याची चैन आणि रोख रक्कम असलेले पाकीट चोरून नेल्याची घटना पनवेलमधील टपाल नाका परिसरात घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकनाथ परशुराम पाटील (रा.वेश्वी, उरण) हे दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास टपाल नाका परिसरात आले होते. त्यावेळी दोन अनोळखी इसमांनी 'मला ओळखले का?'असे विचारत त्यांना बोलण्यात गुंतवले. त्यानंतर हातचलाखीने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि खिशातील पैसे असलेले पाकीट चोरून ते पसार झाले. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

पनवेल पोलिसांकडून चोरीच्या गुन्ह्यांचा छडा

पनवेल : चोरीच्या विविध गुन्ह्यांचा छडा लावत पनवेल परिमंडळातील पोलिसांनी नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. पोलिसांनी ४८ गुन्ह्यांची उकल करून तब्बल १ कोटी २२ लाख ९४ हजार २६७ रुपये किमतीचा जप्त मुद्देमाल मूळ मालकांना परत केला. यामध्ये १४० मोबाईल फोन, १२९ ग्रॅम सोने, ४७ तोळे चांदी, आठ वाहने आणि १७ लाख ३४ हजार ७०० रुपयांच्या रोख रकमेसह अन्य मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ-३ अंतर्गत येणाऱ्या पनवेल शहर, पनवेल तालुका, खांदेश्वर, कामोठे, कळंबोली, खारघर आणि तळोजा या सात पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चोरीचे विविध गुन्हे दाखल झाले होते. या गुन्ह्यांतील चोरीस गेलेला मुद्देमाल शोधून तो संबंधित तक्रारदारांना परत मिळवून देण्यासाठी पोलिसांनी विशेष प्रयत्न केले. तपासादरम्यान मिळालेल्या यशामुळे अनेक नागरिकांना आपला मौल्यवान मुद्देमाल पुन्हा मिळवता आला. या कारवाईत मोबाईल फोन, सोन्या-चांदीचे दागिने, वाहने, रोख रक्कम आणि अन्य वस्तूंचा समावेश आहे. चोरीस गेलेल्या वस्तू पुन्हा मिळाल्याने तक्रारदारांना मोठा दिलासा मिळाला. अनेक दिवसांपासून हरवलेल्या किंवा चोरीस गेलेल्या मौल्यवान वस्तू परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३, पनवेल तसेच पनवेल आणि खारघर विभागांच्या सहायक पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. संबंधित पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या तपासामुळे चोरीच्या गुन्ह्यांची उकल करून मुद्देमाल हस्तगत करण्यात यश आले.

ऐतिहासिक प्रतापगडावर शिवशौर्याचा जागर

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

प्रतापगड हिंदवी स्वराज्याच्या देदीप्यमान इतिहासाचा साक्षीदार असलेला ऐतिहासिक किल्ले प्रतापगड शुक्रवारी रात्री ३६७ मशालींच्या तेजस्वी प्रकाशाने उजळून निघाला. हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत पार पडलेल्या १७ व्या मशाल महोत्सवाने संपूर्ण गड परिसरात शिवशौर्याचा जागर घडवून आणला. मशालींचा लखलखता प्रकाश, भगव्या ध्वजाची शान, ढोल-ताशांचा निनाद आणि शिवरायांच्या जयघोषाने प्रतापगडाचे वातावरण शिवमय झाले. स्वराज्याच्या इतिहासाची आठवण जागविणारा हा सोहळा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

छत्रपती श्रीमंत उदयनराजे भोसले यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित



करून महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. यानंतर एकामागून एक ३६७ मशाली प्रज्वलित करण्यात आल्या. रात्रीच्या अंधारात मशालींच्या प्रकाशाने उजळलेले गडाचे बुरूज आणि परिसराचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती. आकाशातील आतषबाजी आणि ढोल-ताशांच्या गजरामुळे सोहळ्याच्या उत्साहात आणखी भर पडली.

मशालींच्या प्रकाशात उजळलेला प्रतापगड, भगव्या ध्वजाची डौलदार शान आणि हजारो शिवभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण परिसरात चैतन्य निर्माण झाले. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी गडाचा परिसर दुमदुमून गेला. तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच शिवप्रेमी या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी झाले होते. मशालींच्या उजेडात उजळलेला भवानी माता मंदिर परिसर आणि ऐतिहासिक गडाची पार्श्वभूमी यामुळे महोत्सवाचे दृश्य विशेष लक्षवेधी ठरला.

- **३६७ मशालींच्या तेजाने उजळला गड परिसर**
- **शिवभक्तांच्या उपस्थितीत मशाल महोत्सव दिमाखात**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याच्या आठवणींनी भारलेल्या या वातावरणात उपस्थितांना स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाची अनुभूती मिळाली. केवळ उत्सव साजरा करणे एवढाच या महोत्सवाचा उद्देश नसून, इतिहासाविषयी अभिमान आणि पुढील पिढीमध्ये स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा निर्माण करणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा हेतू आहे.

चंदू अप्पा उतेकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेली ही ऐतिहासिक परंपरा भविष्यातही अखंड सुरू राहावी आणि शिवरायांच्या विचारांची प्रेरणा नव्या पिढीला मिळावी, हीच या महोत्सवामागील भावना आहे. ३६७ मशालींच्या प्रकाशाने उजळलेला प्रतापगड, शिवभक्तांचा उत्साह आणि स्वराज्याच्या इतिहासाचा जागर यामुळे यंदाचा मशाल महोत्सव संस्मरणीय ठरला.



शेतीचे पंचनामे करून भरपाई द्या

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या भातशेतीच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सह्याद्री आदिवासी ठाकूर-ठाकर समाज उन्नती मंडळ संचलित,आदिवासी ठाकूर समाज संघटना कर्जत तालुकाच्या वतीने जिल्हाधिकारी रायगड तसेच तहसीलदार कर्जत, यांना लेखी निवेदन देण्यात आले. सदर निवेदनावर संबंधित महसूल अधिकारी, तलाठी, कृषी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश द्यावेत. तसेच पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देता वेळी आदिवासी ठाकूर समाज संघटना कर्जत तालुकाचे अध्यक्ष, सचिव, उपाध्यक्ष, खजिनदार, महिला अध्यक्षा, तसेच आदिवसी संघटनेचे सर्व पदाधिकारी आदी उपस्थित होते.

खारघरमध्ये अतिक्रमणांवर कारवाई

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर नोडमधील अनधिकृत बांधकामांविरोधात सिडकोच्या नियंत्रक तथा अनधिकृत बांधकामे विभागाने निष्कासन मोहीम राबविली. या कारवाईत सेक्टर ५, १०, १३, १४ आणि १९ मधील झोपड्या, भंगार व बांधकाम साहित्याची गोडाऊन, गॅरेज, व्यावसायिक स्टॉल आणि अनधिकृत गोशाळा हटविण्यात आली. सेक्टर १० मधील भूखंड क्रमांक १ वरील भंगार सामानाचे गोडाऊन निष्कासित करण्यात आले. सेक्टर १४ मधील मोकळ्या भूखंडावर उभारलेल्या २० झोपड्या, एक गॅरेज, बांधकाम साहित्याची दोन गोडाऊन आणि व्यावसायिक स्टॉल हटविण्यात आले. सेक्टर १९ मध्ये प्रस्तावित १५ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या मार्गात येणारी व्यावसायिक बांधकामे आणि भंगार सामानाची गोडाऊन हटविण्यात आली. तसेच सेक्टर ५ मधील सर्वे क्रमांक २४५ वरील लोखंडी पत्र्याच्या शेडमध्ये उभारण्यात आलेली अनधिकृत गोशाळाही जमीनदोस्त करण्यात आली. संबंधित बांधकामे आवश्यक परवानगी न घेता उभारण्यात आल्याने नियमानुसार ही निष्कासन मोहीम राबविण्यात आल्याचे सिडकोकडून सांगण्यात आले.

संविधानाचा मूलभूत गाभा अबाधित राखणे लोकशाहीची ताकद

। अलिबाग । प्रतिनिधी ।

भारतीय संविधानाचा मूलभूत गाभा, ऐतिहासिक न्यायनिर्णय आणि मूलभूत अधिकारांचे संरक्षण हे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन कामगार न्यायालय, अलिबाग येथील न्यायाधीश जी. एस. हांगे यांनी केले. विधी व्यवसायात यशस्वी होण्यासाठी कायद्याचे सखोल ज्ञान, व्यावहारिक कौशल्ये आणि सत्यनिष्ठा यांची सांगड घालणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. जनता शिक्षण मंडळाच्या ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ अलिबाग येथे आयोजित मार्गदर्शनपर सेमिनारमध्ये ते बोलत होते.



युवकांमध्ये सामाजिक जाणीव, राष्ट्रनिर्मितीची भावना आणि जबाबदार नागरिकत्व विकसित करणे, तसेच विद्यार्थ्यांना कायदेविषयक ज्ञानासोबतच करिअरविषयक योग्य दिशा देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमातील प्रश्नोत्तरांच्या सत्रात विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या विविध कायदेविषयक प्रश्नांना हांगे यांनी मार्गदर्शन केले. कायद्याच्या तरतुदी, मूलभूत अधिकार, न्यायालयीन प्रक्रिया आणि प्रत्यक्ष व्यवहारातील कायदेशीर बाबी यांविषयी त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. नीलम हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. नीलम म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर प्रा. सूरज पुरी यांनी उपस्थितांचे आभार मानले. सेमिनारच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. कौशिक बोडस, प्रा. सूरज पुरी यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा. डॉ. संदीप घाडगे, प्रा. पियुषा पाटील, प्रा. चिन्मय राणे, प्रा. स्वराली साईकर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- **न्यायाधीश हांगे यांचे प्रतिपादन**

सोसायटीच्या चेअरमनपदी संजय पाटील

अलिबागमधील सहयोग पतसंस्थेतर्फे गौरव

। रायगड। जिल्हा प्रतिनिधी ।

नागाव येथील गणेश कृषक सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी संजय हरिश्चंद्र पाटील यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबागच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या मासिक सभेत अध्यक्ष योगेश मगर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

बेलकडे येथील रहिवासी असणारे पाटील यांचे राजकीय, सामाजिक, सहकार क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. गेली अनेक वर्षे बेलकडे ग्रामपंचायतीचे सरपंच पद भूषवले आहे. अलिबाग तालुका पंचायत समितीच उपसभापती म्हणूनही त्यांनी काम केले आहे. सध्या सहयोग व्यापारी नागरी सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील त्यांचा



प्रदीर्घ अनुभव, जनसंपर्क आणि कार्यतत्परता यांची दखल घेत त्यांची गणेश कृषक सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाली आहे.

पाटील यांनी वडिलांकडून मिळालेला सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत पाटील यांनीही आपल्या कार्याच्या जोरावर स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकार क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

महिलेकडून गांजा जप्त

पनवेल : बंबावीपाडा येथील झोपडपट्टीत गांजा विक्री होत असल्याच्या माहितीवरून पनवेल शहर पोलिसांनीकारवाई केली. या कारवाईत पार्वती जाधव हिच्या झोपडीतून ४५४ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. महिला गांजा विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करून गांजा जप्त केला. याप्रकरणी संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रंगीबेरंगी कमळांची रेलचेल

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

नवरात्रोत्सवातील अष्टमीच्या पूजेची तयारी आता सुरू झाली असून, पनवेलच्या जुन्या भाजी मार्केटमध्ये विविध रंगांच्या कमळांची रेलचेल पाहायला मिळत आहे. देवीच्या पूजेसाठी कमळाला विशेष महत्त्व असल्याने बाजारात रंगीबेरंगी कमळे विक्रीसाठी दाखल झाली आहेत. आकर्षक कमळे खरेदी करण्यासाठी महिला वर्गासह नागरिकांची बाजारात वर्दळ वाढू लागली आहे.

नवरात्रोत्सवातील आठवा दिवस म्हणजेच अष्टमी हा देवीच्या



उपासनेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी अनेक भाविक देवीची विशेष पूजा-अर्चा करतात. पूजेसाठी लागणारी फुले, हार आणि अन्य साहित्य खरेदी करण्याची लगबग सध्या बाजारपेठेत सुरू झाली आहे. त्यातच विविध रंगांची कमळे नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

जुन्या भाजी मार्केटमध्ये कमळांची खरेदी करण्यासाठी महिला आवर्जून येत आहेत. अष्टमीच्या दिवशी देवीला कमळ अर्पण करण्यासाठी अनेक भाविकांकडून या फुलांना पसंती दिली जाते. त्यामुळे अष्टमीच्या आधीच कमळांची खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल दिसून येत आहे. बाजारात उपलब्ध असलेल्या विविध रंगांच्या कमळांमुळे फुलविक्रेत्यांच्या दुकानांना आकर्षक स्वरूप प्राप्त झाले आहे.

कठीण परिस्थितीत जगण्याचा संघर्ष | २०२१ मध्ये 'पद्मश्री' देऊन गौरव

अनाथांची माता 'वात्सल्य दुर्गा' : सिंधूताई सपकाळ

मिलिंद मधुकर जाधव
श्रीवर्धन

स्वतःचे दुःख विसरून दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंद फुलवणारी लोकं दुर्मिळ असतात. ही लोकं आपल्या वेदनांचे रूपांतर इतरांसाठी मायेच्या सावलीत करतात. अनाथ, निराधार आणि वंचित मुलांसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या सिंधूताई सपकाळ या अशाच असामान्य स्त्रीशक्तीचे नाव. हजारो लेकरांची 'माय' बनलेल्या सिंधूताईंचा जीवनप्रवास संघर्ष, त्याग आणि माणुसकीची जिवंत कहाणी आहे.

१४ नोव्हेंबर १९४७ साली वर्धा जिल्ह्यातल्या पिंपरी मेघे गावात एका सामान्य कुटुंबात तिचा जन्म झाला. इच्छेविरुद्ध मुलगी जन्माला आली म्हणून तिचं नाव 'चिंधी' ठेवण्यात आले. इथूनच तिच्या दुर्दैवाचे दशावतार सुरू झाले. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने हुशार असूनही शिक्षण चौथीपर्यंतच झाले. बाल वयातच विवाह झाला. वयाच्या विसाव्या वर्षी, गर्भवती असताना घर सोडावे लागले.

समाजाने अगोदरच बहिष्कृत केले होते. आधारासाठी माहेरी गेली. पण आईनेसुद्धा दरवाजा बंद केला.

हातात नुकतीच जन्माला आलेली मुलगी आणि समोर भविष्याचा काळाकुट्ट अंधार. अशा कठीण परिस्थितीत टिचभर पोटाची खळगी भरण्याचा आणि एकंदरीतच जगण्याचा संघर्ष सुरू झाला.

रेल्वे स्थानकांवर, मंदिरांच्या परिसरात आणि सार्वजनिक ठिकाणी भटकून,तीची नजर कुणी अर्धवट खाऊन फेकलेल्या अन्नाचा शोध घेऊ लागली. उदरनिर्वाहासाठी अनेक यातना सहन कराव्या लागल्या. आधाराच्या शोधात भटकत असताना तिला रस्त्यावर आणि आदिवासी भागात, निराधार मुले दिसली. खपाटीला गेलेली त्यांची पोटं आणि डोळ्यातली भयाण उद्विग्नता दिसली. यातूनच तीने लेकरांच्या आयुष्यात आनंद फुलवण्याचा निर्धार केला.

अनाथ मुलांच्या गरजा भागवण्यासाठी तीला गावोगावी फिरावे लागले. व्याख्याने देऊन लोकांच्या मनातले समाजभान तीने जागृत केले. इतकच काय तर मी निधी मिळवण्यासाठी त्यांना परदेशातही जावे लागले तिथे सुद्धा त्यांनी आपल्या ओघवत्या वाणीने सर्वांना प्रभावित केले.

परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाऊंडेशन संस्थेची स्थापना केली. यातूनच त्यांनी पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण गावात 'ममता बालसदन' केंद्राची स्थापना केली. या केंद्रात अनाथ मुलांना घर शिक्षण आणि सुरक्षित भविष्य मिळू लागले. अशा प्रकारे समाजाने झिडकारलेल्या 'चिंधी'ची सिंधुताई अनाथांची 'माय' झाली.

सिंधूताईंच्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली. त्यांना २०१७ मध्ये 'नारी शक्ती' पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्याच्या योगदानाबद्दल २०२१ मध्ये त्यांना भारताचा चौथा सर्वोच्च नागरी सन्मान 'पद्मश्री' देऊन गौरविण्यात आले होते.

४ जानेवारी २०२२ रोजी सिंधूताईंचे निधन झाले; परंतु त्यांनी निर्माण केलेले मायेचे विश्व आणि अनाथ मुलांसाठी सुरू केलेले कार्य आजही त्यांच्या विचारांची आठवण करून देते. स्वतःच्या झोळीला ठिगळं लागलेली असताना, कित्येक अनाथ मुलांवर मायेचा पदर पांघरणारी, अनाथांची माता साडे सातशे पुरस्कारांची गाथा, मवात्सल्य दुर्गाफ सिंधुताई सपकाळ यांच्या चरणी नवरात्रीची आठवी माळ कृतज्ञतापूर्वक अर्पण.



नवदुर्गा भाग ८

दुष्काळात वनराई बंधाऱ्यांचा आधार

• कणघर आदिवासी वाडीवर जलसंधारणाला प्राधान्य; भविष्यातील पाणीटंचाईवर मात

। म्हसळा । प्रतिनिधी ।

पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून त्याचा उपयोग भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी करण्याच्या उद्देशाने म्हसळा तालुक्यात वनराई बंधारा उभारणीच्या उपक्रमाला महत्त्व प्राप्त होत आहे. तालुक्यातील कणघर आदिवासी वाडी येथे बांधण्यात आलेला वनराई बंधारा हा जलसंवर्धनाच्या दृष्टीने सर्वांसमोर एक आदर्श निर्माण करणारा उपक्रम ठरत आहे.



बदलत्या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची गरज असून, अशा लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते.

कणघर आदिवासी वाडीवरील वनराई बंधाऱ्याच्या कामाच्या निमित्ताने गटविकास अधिकारी मंगेश साळी आणि पंचायत समिती सभापती बबन मनवे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून मानवी जीवन, शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. त्यामुळे पाण्याचे नियोजन, संवर्धन आणि उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

भविष्यात उन्हाळ्यामध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, प्रत्येक गावाने आतापासूनच जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. वनराई बंधारे उभारल्यामुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी अडविण्यास मदत होते. स्थानिक परिस्थितीनुसार अशा बंधाऱ्यांची उभारणी केल्यास पाण्याची उपलब्धता वाढविण्यास आणि परिसरातील जलस्रोतांचे संवर्धन करण्यास हातभार लागू शकतो.

केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून न राहता ग्रामस्थ, युवक, सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन वनराई बंधारा चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सभापती बबन मनवे यांनी केले. प्रत्येक गावाने पाण्याचे महत्त्व ओळखून सामूहिक प्रयत्नांतून जलसंवर्धनाची कामे हाती घेतल्यास भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी निश्चितच मदत होईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कणघर आदिवासी वाडीवरील वनराई बंधारा हा केवळ पाणी अडविण्याचा उपक्रम नसून, सामूहिक प्रयत्नांतून गावाच्या भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन केलेल्या नियोजनाचे उदाहरण आहे. तालुक्यातील इतर गावांनीही या उपक्रमापासून प्रेरणा घेऊन वनराई बंधाऱ्यांची उभारणी करावी. पावसाचे पाणी अडवा, पाणी जिरवा आणि उपलब्ध जलसंपत्तीचे जतन करा, हा संदेश प्रत्येक गावापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

आज जलसंवर्धनासाठी उचललेले छोटेसे पाऊल उद्याच्या मोठ्या पाणीटंचाईपासून संरक्षण देण्यास उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे वनराई बंधारा चळवळ ही केवळ एक योजना न राहता लोकचळवळ बनली पाहिजे, हाच कणघर आदिवासी वाडीवरील उपक्रमाचा महत्त्वपूर्ण संदेश आहे.

अलिबाग येथे मोफत आरोग्य शिबीर



। कोर्लई । प्रतिनिधी ।

सेवा संकल्प अभियानांतर्गत उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था, माणुसकी प्रतिष्ठान व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुका पंचायत समिती विभागांतर्गत मार्गदर्शनाखाली मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे तसेच महिलांमध्ये आरोग्य आणि मासिक पाळीतील स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या शिबिरामध्ये उमेद अभियानांतर्गत कार्यरत एकूण ६४ महिला उमेद ताई, बँक सखी, कृषी सखी तसेच पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. शिबिरामध्ये ३४ जणांची नेत्रतपासणी, तर १० जणांची ईसीजी तपासणी करण्यात आली. यावेळी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या वतीने महिलांना ऑरगॅनिक अँड इको-फ्रेंडली प्रीमियम सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.

बागमळा येथे रंगणार डबलबारीचा सामना

। चौल । प्रतिनिधी ।

नवरात्रोत्सवाच्या निमित्त बागमळा येथील मंदिरात जागर सुरू आहे. त्यानिमित्ताने मंदिर ट्रस्टच्या वतीने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, रविवार, दि.१८ ऑक्टोबर रोजी दुपारी दोन वाजता महालक्ष्मीच्या मंदिरात डबलबारी भजनांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवसाला पावणाऱ्या आणि हाकेला धावणाऱ्या महालक्ष्मीवर चौलमळा येथील महालक्ष्मीचे भक्त अनंत लक्ष्मण घरत यांची खूप श्रद्धा आहे. दरवर्षी नवरात्रोत्सवात ते डबलबारी भजन व अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करून नवरात्रोत्सवात रंगत आणत असतात. यावर्षीसुद्धा डबलबारी भजनाचे



जंगी सामने आयोजित करण्यात आले आहेत.

यंदा जय हनुमान प्रासादिक भजन खारीकवाडा, नांदगाव आणि श्री गोकुळेश्वर प्रासादिक भजन मंडळ, वेश्वी, ता. अलिबाग यांच्यात डबलबारी भजनांचा सामना रंगणार आहे. जय हनुमान प्रासादिक भजन खारीकवाडा, नांदगाव यांच्याकडून बुवा अजय दामोदर राऊत, पखवाजासाठी सागर राऊत आणि तबला वादक म्हणून केशव राऊत साथ देणार आहेत.

अजय दामोदर राऊत हे गुरुवर्य भगवान लोकेरे, कृष्णा देशमुख आणि शंकर राऊत यांचे शिष्य आहेत. तर श्री गोकुळेश्वर प्रासादिक भजन मंडळाच्या वतीने रायगड भूषण निलेशबुवा जंगम बुवांच्या भूमिकेत असतील. त्यांना वादनकार म्हणून महेश ठाकूर आणि विजय घरत यांची साथ लाभणार आहे. तर मगर गुरुजी व्यवस्थापक म्हणून काम पाहणार आहेत. या मंडळाचे संस्थापक दामोदर सिताराम मगर आहेत.

अनंत लक्ष्मण घरत यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बागमळा-चौलमळा मित्रमंडळ जोरदार तयारी करीत आहे.

या कार्यक्रमास जास्तीत जास्त भजनप्रेमींनी, भाविकांनी उपस्थित राहून भजनांचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

- **रविवारी महालक्ष्मी मंदिरात भजनांचे आयोजन**
- **नामवंत भजन मंडळांची उपस्थिती**

नूतन पाटील यांचे निधन

वाघ्रण : अलिबाग तालुक्यातील मांडवरवार या गांवांतील जेष्ठ महीला नूतन नागेश पाटील यांचे बुधवारी (दि.७) निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा सुधीर, सून व नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचे दिवसकार्य दि.१८ ऑक्टोबर रोजी होणार आहेत.



श्रमदानातून बंधारा बांधत जलसंधारणाचा संदेश

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

राज्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे. याच पार्श्वभूमीवर वावडुंगी ग्रामपंचायतीच्या वतीने 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या उपक्रमांतर्गत वावडुंगी येथील गणपती विसर्जन घाट, धोबी घाट आणि नदीपात्रात श्रमदानातून बंधारा बांधण्यात आला. या उपक्रमातून पाणी संवर्धनाचा संदेश देत ग्रामस्थांनी जलसंधारणाच्या कामात सक्रिय सहभाग नोंदविला.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

''पाणी अडवा, पाणी जिरवा हा केवळ एक उपक्रम नसून भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी आवश्यक असलेली सामूहिक जबाबदारी आहे. पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता ते अडवून जमिनीत जिरविणे गरजेचे आहे. गावातील पाण्याची उपलब्धता टिकवून ठेवण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन जलसंधारणाच्या कामांत सहभागी व्हावे,'' असे आवाहन वावडुंगीच्या सरपंच ऋतुजा वरणकर यांनी केले.

या उपक्रमांतर्गत २००हून अधिक पिशव्यांमध्ये माती व रेती भरून नदीपात्रात पाणी अडविण्यासाठी बंधारा उभारण्यात आला. या कामात ग्रामपंचायत सदस्य, महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, सामाजिक वनीकरण विभाग तसेच मुरूड तालुका कृषी विभागाच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य जयंता कासार यांनीही जलसंधारणाबाबत जनजागृती करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

- **वावडुंगी ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम**

रक्तदान शिबीर

भाकरवड : अलिबाग तालुक्यातील भाकरवड येथे नवरात्री उत्सवानिमित्त विघ्नेश पाटील, सागर पाटील ग्रामस्थ मंडळ भाकरवड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.११) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोफत रक्तगट तपासणी करण्यात आली. अनेकांनी रक्त देऊन हॉस्पिटलमधील गरीब गरजूंना या रक्ताचा कसा फायदा होईल, यासाठी भाकरवड, पोयनाड, पेझारी एकत्रित येऊन एक सामाजिक बांधिलकी जोपासली.



शाळेला चौदा सीलिंग फॅन भेट

तळा : श्री गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर, तळा येथील माजी विद्यार्थी प्रतीक नंदकुमार सुतार याच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्याच्या दहावीच्या बॅचमधील मित्रपरिवाराने शाळेला १४ सीलिंग फॅन भेट देऊन सामाजिक बांधिलकी जपली. मित्राच्या स्मृती जपत शाळेच्या गरजेसाठी दिलेल्या या भेटीमुळे शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या ऋणानुबंधांचे भावस्पर्शी दर्शन घडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रतीक सुतार याच्या प्रतिमेला संस्थेचे उपाध्यक्ष तथा पत्रकार पुरुषोत्तम मुळे, संस्थेचे सचिव महेंद्र कजबजे, मुख्याध्यापक लोकरे आणि उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर शाळेच्या संगीत विभागाच्या वतीने स्वागतगीत सादर करण्यात आले. शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवर व माजी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

माथेरानच्या निसर्गाला कमी पर्जन्यमानाची धग

पर्यटन हंगामामध्ये पाणीटंचाईची भीती

। माथेरान । प्रतिनिधी ।

दरवर्षीप्रमाणे मुळधार कोसळणाऱ्या पावसाचे प्रमाण कमी झाल्यानंतर त्याचे विपरीत परिणाम येथील निसर्गावरती दिसून आले. तर यावर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये उच्चांकी गर्मी पहावयास मिळाली. त्याचबरोबर दसऱ्याच्या अगोदर येथील डोंगर रांगांवर फुलणारे जंगली फुलांचे प्रमाण यावेळी अत्यल्प असल्याचे दिसून येत आहे.

माथेरान म्हणजे पावसाचे माहेरघर. दरवर्षी या ठिकाणी पाच ते सहा हजार मिलिमीटर इतका पाऊस होत असतो. परंतु, यावेळी ३० सप्टेंबरपर्यंत ५९५० मिमी इतक्या पावसाची नोंद झाली



होती, तर यावर्षी ४८९२ मिमी इतक्याच पावसाची नोंद झालेली आहे. म्हणजेच जवळजवळ एक हजार मिमी कमी पाऊस माथेरानला झालेला आहे. त्यामुळेच येणारे वर्ष माथेरानकरिता धोक्याचे असणार हे निश्चित आहे. कमी पावसामुळे मे महिन्यातील पर्यटन हंगामामध्ये पाणीटंचाईला सामोरे जाण्याचे लक्षणे आत्ताच दिसू लागली आहे. कारण जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत वाहणारे झरे आत्ताच कमी कमी होऊ लागले आहे. वाढत्या गर्मीमुळे येथील शार्लेट लेक तलावाचे बाष्पीकरण ही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये येथील परिस्थिती गंभीर असणार आहे हे निश्चित आहे.

दसऱ्याच्या पंधरावड्यामध्ये माथेरानच्या निसर्गाला बहर येत असतो. परंतु, यावर्षी कमी झालेला पाऊस व वाढलेला उकाडा यामुळे फुलांचा बहर हवा तसा झालेलाच नाही. यामुळे डोंगरही उघडे पडू लागले असेल त्यामुळे गर्मी ही जाणवू लागली आहे. त्यामुळेच येणारा काळ माथेरानकरांची परीक्षा पाहणारा असणार असून स्थानिकांना आतापासूनच या संभाव्य धोक्याचा विचार करिता तयारी करण्याची गरज असल्याची चर्चा सुरु झाली आहे.

पथनाट्य सादरीकरणातून जनजागृती | **शिक्षणातून मिळणाऱ्या संधींबाबत मार्गदर्शन**

गुंडगे येथे आंतरराष्ट्रीय बालिका दिन उत्साहात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरातील गुंडगे येथे असलेल्या गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कुलमध्ये आंतरराष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून कर्जत पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस निरीक्षक मीनल शिंदे, ठाणे येथील वकील कोमल कुलकर्णी, सीएसएच्या फील्ड सुपरवायझर मनीष भालेराव, पोलीस कॉन्स्टेबल खोतले, भिसेगावचे पोलीस पाटील संजय हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेच्या संस्थाचालक सिस्टर रेसी, गुड शेफर्ड शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर अमला



तसेच विद्यार्थी आणि परिसरातील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले होते. तसेच इतर सिस्टर्स उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विनी चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत विलास जाधव यांनी केला. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा वाघमारे यांनी केले.

बालिका दिनाच्या निमित्ताने कर्जत शहर परिसरातील आदिवासी वाड्यांमधील मुलांना घेण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी पथनाट्य सादर करण्यात आली. त्यानंतर आदिवासी वाड्यांमधील मुलींनी बालिकांचे अधिकार, शिक्षणाचे महत्त्व आणि मुलींवरील अत्याचाराविरोधात जनजागृती या विषयांवर भाषणे केली. तसेच मुलींच्या शिक्षणाचा हक्क आणि मुलींवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात जनजागृती करणारे प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले. मुलींनी आपल्या हक्कांविषयी व्यक्त केलेले विचार, सादर केलेले पथनाट्य आणि कार्यक्रमातील उत्स्फूर्त सहभाग यामुळे आंतरराष्ट्रीय बालिका दिनाचा उद्देश प्रभावीपणे अधोरेखित झाला. मुलींना शिक्षण, सुरक्षितता, समान संधी आणि त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देत त्यांना सक्षम बनविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

महिला पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे यांनी मुलींना मार्गदर्शन करताना त्यांच्या सुरक्षिततेबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी ११२ हा आपत्कालीन क्रमांक वापरण्याचे आवाहन त्यांनी केले. ॲड. कोमल कुलकर्णी यांनी मुलींना त्यांच्या कायदेशीर हक्कांबाबत मार्गदर्शन केले, तर मनीष भालेराव यांनी मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व आणि शिक्षणातून मिळणाऱ्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

निवडक



पेण नगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे चित्रकला स्पर्धा

पेण : सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत पेण नगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'विकसित भारत' या विषयावर घेण्यात आलेल्या या स्पर्धेत सुमारे १५० च्या आसपास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ही स्पर्धा पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन गटांत घेण्यात आली. लहान गटात तन्वी कृष्णा म्हात्रे (सौ.म.ना. नेने कन्या विद्यालय) हिने प्रथम क्रमांक, हर्षिता भरत ढवळे (गुरुकुल शाळा) हिने द्वितीय क्रमांक, तर शिवम दिनेश कुमार मौर्य (नगरपालिका शाळा क्र.७) याने तृतीय क्रमांक पटकावला. मोठ्या गटात गार्गी अमित पाध्ये (सौ. म.ना. नेने कन्या विद्यालय) हिने प्रथम क्रमांक, तीर्था पवन भोईर (गुरुकुल विद्यालय) हिने द्वितीय क्रमांक, तर रिद्धी रंजित पाटील (गुरुकुल विद्यालय) हिने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना रोख रक्कम, आकर्षक सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागाचे प्रमुख दयानंद गावंड, ओएस गणेश ठाकूर व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता पाटील यांनी केले.



सायबर सुरक्षा जनजागृती, मार्गदर्शन

उरण : कोकण ज्ञानपीठ उरण, वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण, जिल्हा रायगड सायबर सिक्युरिटी जनजागृती आणि समस्या या विषयावर विशेष मार्गदर्शनपर सेमिनार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ धर्मेंद्र नलावडे (कल्याण) यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया, ई-मेल, ऑनलाइन बँकिंग व्यवहार तसेच आर्थिक व इतर ऑनलाइन व्यवहार करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. सायबर फसवणुकीचे विविध प्रकार, त्यापासून बचाव करण्याचे उपाय आणि इंटरनेटचा सुरक्षित वापर याविषयी नलावडे यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली. विद्यार्थ्यांनी कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, तसेच ऑनलाइन व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी हर्षाली जाधव (कल्याण) यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना विविध उपयुक्त अभ्यासक्रमांची माहिती दिली. सायबर फसवणूक टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी आणि करिअरच्या दृष्टीने कोणते अभ्यासक्रम निवडावेत, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. गर्जे यांनी भूषविले. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता अभ्यास, ज्ञानवृद्धी, नोकरी आणि व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी योग्य पद्धतीने करावा, असे प्रतिपादन त्यांनी केले.



डॉ. स्नेहा उपाध्ये यांची निवड

वेणगाव : महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक व माध्यमिक मंडळ पुणे यांच्यातर्फे, नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत अभ्यासक्रम बदल होणार आहे. त्यासाठी इयत्ता नववी ते बारावी व्यावसायिक शिक्षण या विषयाकरता अभ्यास मंडळ तज्ञ सदस्य म्हणून अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालय कर्जत येथे सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत असलेल्या डॉ. स्नेहा गजानन उपाध्ये यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.स्नेहा उपाध्ये यांच्या झालेल्या निवडीने कर्जत तालुक्यात शिक्षक वर्ग व त्यांच्या चाहत्यांकडून अभिनंदन केले जात आहे. अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाची पालक शिक्षक संघाची शनिवारी (दि.१७) सभा पार पडली. या सभेमध्ये डॉ. स्नेहा उपाध्ये यांची अभ्यास मंडळ तज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती झाली. ही निवड कर्जत तालुक्याची व अभिनव महाविद्यालयाची अभिमानस्पथ असल्याने यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. स्नेहा उपाध्ये यांचा सत्कार करण्यात आला.

'गौरव नवदुर्गाचा' सोहळा उत्साहात

रसायनी : रीस-मोहोपाडा येथील मातोश्री संकुलातील दुर्गामाता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेला 'गौरव नवदुर्गाचा' हा विशेष सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आठ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. भक्तिमय वातावरणात महिलांच्या कार्याचा गौरव, समाजसेवेचा सन्मान आणि नारीशक्तीला सलाम अशा उत्साही वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. दांड-रसायनी रोडवरील रीस-मोहोपाडा येथील दुर्गामाता मंदिरात स्वर्गीय बहिणाबाई उकर्डाजी दुधे यांच्या स्मरणार्थ नवरात्रोत्सव साजरा केला जातो. दुधे परिवाराच्या वतीने गेल्या २६ वर्षांपासून ही धार्मिक आणि सामाजिक परंपरा अखंडपणे जपली जात आहे. दुधे बिल्डर आणि साहस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. यामध्ये शिक्षण क्षेत्रातील प्रोफेसर डॉ. अंगळ सुंदर, वैद्यकीय सेवेसाठी डॉ. सीमा नारायण पाईकराव, वारकरी संप्रदायातील पूनम पांडुरंग राऊत, कृषी क्षेत्रातील सुजाता किरण माळी यांच्यासह जनाबाई विठ्ठल मुंढे, शेवंता दत्तात्रय ठोंबरे, ललिता अनंत दळवी आणि सुमा सिल्वाराजन या आठ महिलांचा सन्मान करण्यात आला. महिलांनी विविध क्षेत्रांत केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या सामाजिक योगदानाला प्रोत्साहन देणे, तसेच त्यांच्या कर्तृत्वातून इतर महिलांना प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. महिलांच्या कार्याचा सन्मान करून समाजात नारीशक्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ सप्टेंबर

१) श्रीम.भारती दिनानाथ तरे
चेंढरे-अलिबाग,
दि.१८-१०-१९३९

२)श्रीम.वसुधा भास्कर भोसले
श्रीबाग-२, अलिबाग,
दि.१८-१०-१९३९

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते
विमल सॉ मिल उचेडे पेण

धुंडीराज रामकृष्ण लेले, स्मरणार्थ अलिबाग

४० वर्षीय व्यक्ती बेपत्ता

पनवेल : खारघर येथील घामोळे कातकरवाडी परिसरातून लक्ष्मण वाघे (वय ४०) हे बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी खारघर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. वाघे हे मूळचे अंबरनाथ येथील शिरवलीवाडीचे रहिवासी असून मजुरी करतात.

वडखळ-अलिबाग मार्गावर अंधाराचे साम्राज्य

पथदिव्यांच्या अभावामुळे रात्री प्रवास धोकादायक

नागरिकांकडून उपाययोजनांची मागणी

। पोयनाड । प्रतिनिधी ।

अलिबागला जोडणाऱ्या वडखळ-अलिबाग राज्य मार्गावर रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असते. अनेक ठिकाणी पथदिवे नसल्याने वाहनचालक, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. अपघातांचा धोका लक्षात घेता संबंधित विभागांनी प्रकाशव्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



जिल्ह्यातील महत्त्वाच्या या राज्य मार्गावर दिवसाबरोबरच रात्रीही वाहनांची वर्दळ वाढत आहे. हा मार्ग अलिबागसह रामराज, नागाव, रेवदंडा आणि पुढे मुरूड तालुक्याला जोडतो. धरमतर पुलापासून शहाबाज, पांडवादेवी, पोयनाड, पेझारी, पळी, तिनवीरा, मनुशेठ वाडा आणि कार्लेखिंड ही महत्त्वाची ठिकाणे या मार्गावर आहेत. मात्र, अनेक ठिकाणी पथदिवे नसल्याने अंधारात प्रवास करावा लागतो.

रस्त्यालगत पथदिवे नसणे आणि रिफ्लेक्टरच्या अभावामुळे साईडपट्टी स्पष्टपणे न दिसणे, यामुळे दुचाकीस्वार व सायकलस्वारांना त्रास सहन करावा लागतो. स्थानिकांसह पर्यटकांची वाहने आणि अवजड वाहनांचीही या मार्गावर मोठी वर्दळ असते. पादचाऱ्यांनाही अंधारातून वाट काढावी लागते.

लोकवस्ती नसलेल्या भागांत अंधाराचा फायदा घेऊन चोरी किंवा दरोड्याच्या घटना घडण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेषतः रात्री ११ नंतर पोयनाड ते अलिबाग प्रवास दुचाकीस्वारांसाठी कठीण ठरत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या समस्येकडे लक्ष देऊन पथदिवे बसवावेत किंवा आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक लावावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

धरण, मंदिर परिसरात प्रकाशित करा

तिनवीरा धरण हे अलिबाग तालुक्यातील महत्त्वाचे धरण असून, या परिसरात रात्री अंधार असतो. सुरक्षेच्या दृष्टीने येथे वीजपुरवठ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच कार्लेखिंडीत पाताळेश्वराचे मंदिर असून, या ठिकाणीही पथदिवे बसवावेत किंवा पुरेसा प्रकाश उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

खानाव येथे केंद्रस्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन



। अलिबाग । प्रतिनिधी ।

समूह साधन केंद्र खानाव यांच्या वतीने शुक्रवारी (दि. १६) ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली होती. 'देवीचा जागर, वारसा संस्कृतीचा' ही केंद्रस्तरीय नृत्य स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पारंपरिक नृत्यकलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रमोद भोपी आणि संजय पोईलकर यांनी परीक्षण केले. या स्पर्धेच्या आयोजनासाठी केंद्रप्रमुख रवींद्र थळे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच लोककला व सांस्कृतिक परंपरांचे जतन करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. स्पर्धेत प्रथम क्रमांक राजिप शाळा खानाव, द्वितीय क्रमांक राजिप शाळा कुणे, तृतीय क्रमांक राजिप शाळा देऊळभेरसे, उत्तेजनार्थ राजिप शाळा तळकावीर, तसेच राजिप शाळा बामणगाव यांना देण्यात आला. या कार्यक्रमास समीर भगत, दीपश्री टोपले तसेच पालक, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

आगरी समाज संस्थेच्या 'रूढी-परंपरा परिसंवाद' मालिकेचा शुभारंभ

। अलिबाग । प्रतिनिधी ।

आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्या वतीने समाजातील रूढी, परंपरा आणि प्रथा यांची माहिती संकलित करून त्यांचे दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'रूढी-परंपरा परिसंवाद' मालिकेतील पहिला परिसंवाद श्री क्षेत्र भुवनेश्वर, नारंगी येथील सभामंडपात, शनिवारी (दि. १०) ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. या पहिल्या परिसंवादासाठी चरी ते शिरवली-माणकुळे परिसरातील एकूण २२ गावांतील प्रतिनिधी उपस्थित होते. समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याच्या दृष्टीने संस्थेने सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमाचे



उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या पहिल्या परिसंवादाचा विषय अंतिम कार्य आणि त्यानंतरचे विधी असा होता.

गावागावांमध्ये प्रचलित असलेल्या प्रथा, परंपरा आणि त्यांचे वेगवेगळे स्वरूप समजून घेणे, त्यांची माहिती संकलित करणे आणि हा सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या कार्यक्रमास उदय म्हात्रे, दत्तात्रेय भोपी, हिराबाई पाटील, धनंजय पाटील, प्रभाकर ठाकूर, सचिन पाटील, अनंत म्हात्रे, मिलिंद धोदरे, शशिकांत मिठाग्री, सुभाष गुडदे, अंकुश पाटील, वैभव पाटील, शुभांगी म्हात्रे, सूर्यकांत म्हात्रे, जयवंत पाटील, दिपश्री पाटील, दर्शना पाटील, जागृती पाटील, जयवंत थळे, डॉ. जगन्नाथ पाटील यांच्यासह विविध गावांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

सम्राट डाकी याचा गौरव

पनवेल : पनवेल शहर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अंमलदार सम्राट डाकी यांची सप्टेंबर २०२६ महिन्यासाठी कॉप ऑफ द मंथ म्हणून निवड करण्यात आली आहे. विविध गुन्ह्यांतील आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना हे प्रशंसापत्र देण्यात आले. पनवेल शहर पोलीस ठाण्यातील तीन गुन्ह्यांच्या तपासात आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी सम्राट डाकी यांनी केली. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत पनवेल विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांनी प्रशंसापत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले.

साखर येथे पाककला स्पर्धा उत्साहात

। अलिबाग । प्रतिनिधी ।



रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त नुकतीच पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सध्याच्या फास्ट फूडच्या युगात विद्यार्थ्यांना पारंपरिक आणि पौष्टिक पदार्थांचे महत्त्व कळावे तसेच जंक फूड चे दुष्परिणाम समजावेत या दृष्टीकोनातून पौष्टिक अशा पाककृतींचे आयोजन करण्यात आले होते.सर्व माता पालकांनी उत्तम असा सहभाग नोंदवून पदार्थां विषयी माहिती सादरीकरण केले. स्पर्धेमध्ये बावीस प्रकारच्या पदार्थांची मांडणी करण्यात आली होती. स्पर्धेमध्ये नाचणीचे विविध पदार्थ, पौष्टिक लाडू, तसेच इतर पौष्टिक पदार्थांची मांडणी केली होती. कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून आक्षी ग्रामपंचायत सरपंच रश्मी पाटील, ग्रामपंचायत सदस्य निरजा नाईक, कुंजल गुरव उपस्थित होते. परीक्षक म्हणून अलिबाग पंचायत समिती साधन व्यक्ती नेहा मगर, निलिमा वर्तक यांनी उत्तम कामगिरी बजावली. स्पर्धेत प्रथम क्रमांक अंकिता भुकवार, द्वितीय क्रमांक भावना जगू, तृतीय क्रमांक सुचिता बानकर, चौथा क्रमांक सुनिता गोतकर आणि पाचवा क्रमांक दर्शना बुरांडे यांनी पटकावला. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, शिक्षिका स्मिता चिखले, मनिषा गुरव, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष अंकिता भुकवार, सदस्य भावना जगू, रेश्मा तांडेल, करिश्मा भुकवार, दर्शना बुरांडे, उमा तांडेल, अमोली साटविलकर, राजश्री गण, नुतन तांडेल तसेच सर्व माता पालकांनी मेहनत घेतली.कार्यक्रमाचे चित्रीकरण जयेंद्र बुरांडे यांनी केले.

साप्ताहिक राशिभविष्य दि. १८ ते २४ ऑक्टोबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

घरातील वरिष्ठांचा सल्ला घ्या

मेष : राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीतील जातक खूप कल्पनाशील नसतात आणि खूप विचार करणारे नसतात. बेधक स्वभावामुळे यांच्या जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती असते. परंतु, बऱ्याच वेळा हे लोक विचार न करण्यामुळे हे आपला वेळ खराब करून बसतात. बऱ्याच वेळा तुमच्या चांगल्या कामाच्या कारणाने काही लोक तुमच्या कार्य क्षेत्रात तुमचे शत्रू बनू शकतात. तुमच्या पाठीमागे कारस्थान रचू शकतात. म्हणून, आपल्याला कार्यक्षेत्रात खूप विचार करून चालण्याचा सल्ला दिला जातो. कौटुंबिक जीवनात या सप्ताहात हालचाल होऊ शकते. जमिनीच्या वाटणीला घेऊन तुम्ही घरातील वरिष्ठ लोक आणि आपल्या भाऊ बहिणींसोबत वाद करू शकतात. **महिलांना :** तुमच्यामुळे कुटुंबात तणाव स्थिती बनू शकते. जर तुम्हाला वाटले की, या जमिनी वाटणी गरजेची आहे, तर, तुम्ही जो विचार करत आहे तो तर्क संगत आहे. तुम्हाला शांती आणि शालीनतेने सर्वांसोबत बसून बोलणी केली पाहिजे. तुम्हाला तुमच्या प्रत्येक गोष्टीचे समाधान मिळेल. **शुभ दिनांक :** १८,१९.

कौटुंबिक वाद होण्याची शक्यता

वृषभ : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीतील लोकांसाठी हा कालावधी शुभ फळदायी राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुम्ही आपल्या करिअरमध्ये सकारात्मक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला आहे ज्याचे उत्तम फळ तुम्हाला या वेळेत नक्कीच मिळेल. तुमच्या कार्यक्षेत्रात तुमची प्रगती होऊ शकते. त्याच सोबतच तुमच्या कमाईमध्ये वाढ होण्याचे पूर्ण अपेक्षा आहे. तुमच्या आर्थिक पक्षाची गोष्ट केली तर, या कालावधीत तुमचे लाभ भाव सक्रिय होण्यापेक्षा तुम्हाला परदेशी स्रोतांनी अधिक लाभ होऊ शकतो. कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली तर, हा कालावधी तुमच्यासाठी सुखद राहील. जर मोठ्या भाऊ बहिणींसोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद चालत आहे तर, हा वाद या काळात दूर होऊ शकतो. या राशीतील विद्यार्थी या सप्ताहात शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक चांगले प्रदर्शन करतील. प्रेम जीवनाची गोष्ट केली असता हा कालावधी तुमच्यासाठी उत्तम सिद्ध होऊ शकतो. **महिलांना :** तुमची आरोग्य संबंधित गोष्ट केली असता या सप्ताहात तुम्हाला शरीराच्या उजव्या भागात दुखू शकते म्हणजे उजव्या भागाच्या डोक्याची बाजू किंवा हात दुखण्याची शक्यता आहे. नियमित सुर्योदयाच्या वेळी ऊ नम: शिवायचा २१ वेळा जप करा. **शुभ दिनांक :** २०,२१.

आर्थिक स्थिती सुधारण्याची शक्यता

मिथुन : या सप्ताहाचे ग्रहमान पाहता राशीतील जातकांमध्ये उत्तम ऊर्जा आणि नेतृत्व क्षमता असते. आपल्या याच गुणांच्या कारणाने लोकांमध्ये या राशीतील वेगवेगळे दिसतात. या राशीतील त्या जातकांना या कालावधीत मेहनत करावी लागेल ज्याची अद्याप नोकरी लागलेली नाही. तुम्हाला या महिन्यात टीव्ही तसेच मोबाईलपासून दूर राहावे लागेल. तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळू शकते. या राशीतील जातकांच्या आर्थिक पक्षात नजर टाकली असता यात सुधारणा होण्याची पूर्ण शक्यता आहे. कौटुंबिक जीवनात या सप्ताहात हालचाल होऊ शकते. जर तुम्ही कुणाला उधारी दिलेली आहे तर, या काळात तुम्हाला तुमची उधारी परत मिळू शकते. यामुळे तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात मोठ्या भाऊ बहिणींचे पूर्ण सहयोग मिळेल. **महिलांना :** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. तुम्हाला घरातील लहान सदस्यांना ही वेळ दिला पाहिजे. त्यांच्या सोबत खेळून आणि त्यांना वेळ देऊन जवळीकता वाढवली पाहिजे. **शुभ दिनांक :** २२,२३.

धार्मिक कार्यात खर्च होईल

कर्क : राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या राशीतील जातकांच्या डोक्यात या आठवड्यात टीव्ही, मोबाइल, मित्र सोडून इतर जीवनाची सार्थकता, जीवनात कशी चांगल्या प्रकारे व्यतीत करू शकतात. आपल्या करिअरला उज्वल बनवण्यासाठी लागोपाठ आपली योग्यता पाहत राहणे खूप गरजेचे आहे. या काळात तुम्ही ही या गोष्टीला उत्तम रित्या समजू शकतात. तुमचा नवम भाव सक्रिय असण्याने या महिन्यात धार्मिक कार्यात तुमचा खर्च होऊ शकतो. तथापि, यामुळे तुम्हाला जास्त फरक पडणार नाही तर, यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. या काळात तुम्ही आपल्या नातेवाईकांसोबत मिळून कुठल्या धार्मिक स्थळी काही आयोजन करू शकतात. हे आयोजन तुम्हाला समाजात सन्मान देईल. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी थोडा प्रतिकूल राहू शकतो. **महिलांना :** आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची उठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका.
शुभ दिनांक :१८,२४.

उधार देणे टाळा

सिंह : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता जगामध्ये आपली वेगळी ओळख बनवण्यासाठी या आठवड्यात तुम्ही कठीण मेहनत करा. तुम्ही आपली मेहनत कायम ठेवली तर, तुम्हाला यश मिळवण्यात कुणी थांबवू शकणार नाही. या राशीतील जातकाच्या करिअर क्षेत्रात या सप्ताहात काही चढ-उतार येऊ शकतात. तुमच्या खर्चात होणारी वाढ या काळात तुम्हाला मानसिक तणाव देऊ शकते. या दिवसांत कुणाला उधार देणे टाळले पाहिजे कारण, या सप्ताहात तुमच्या कुटुंबातील खर्च वाढतील. तुम्ही आपल्या कुणी जवळच्या नातेवाइकांकडून उधार मागू शकतात तथापि, तुम्हाला हाच सल्ला असेल की, उधार मागू नका. आपल्या गरजांवर प्रतिबंध आणा. **महिलांना :** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला. त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. भाग्याचा बळावर तुम्ही कुठल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकतात. **शुभ दिनांक :** १९,२२.

विचारात अडकू नका

कन्या : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीतील जातक खूप भावुक असतात आणि बऱ्याच वेळा यांच्या भावना यांच्यासाठी त्रासाचे कारण बनू शकते. कार्य क्षेत्रात होणाऱ्या राजकारणाच्या कारणाने किंवा आपल्या कमी कमाईच्या कारणाने समस्या आहे तर, या महिन्यात तुमच्या जीवनसाथी कडून तुम्हाला सल्ला दिला जाऊ शकतो. तुमचा जीवनसाथी या कालावधीत एक मार्गदर्शक म्हणून तुम्हाला दिशा दाखवेल. या राशीतील जातकांना या वेळी धन हानी होऊ शकते. या काळात तुम्हाला देवाण-घेवाणीच्या बाबतीत थोडी सावधानी ठेवावी लागेल. प्रत्येक घरात जितके लोक असतात तितकेच वेगवेगळे विचार ही असतात. बऱ्याच वेळा असे होते की, तुम्हाला दुसऱ्यांच्या विचार आवडत नाही. परंतु, तरी ही त्यांच्या गोष्टी मानाव्या लागतात. **महिलांना :** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** २०,२१.

मैत्रीमध्ये वहात जाऊ नका

तुळ : राशीसाठी या सप्ताहात या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी खूप चांगला राहण्याची शक्यता आहे. या राशीतील विवाहित जातकांना या महिन्यात आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. जीवनसाथीची आरोग्य या दिवसात खराब होऊ शकते. गृह नक्षत्रांची चाल पाहिल्यास या काळात तुमच्या आरोग्याची स्थिती खूप चांगली सांगितली जात नाही. या दिवसांत तुम्हाला डोळे, डोके आणि कानामध्ये समस्या होऊ शकतात. नियमित सुर्योदयाच्या वेळी श्री अष्टलक्ष्मी पाठ करा. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. या कालावधीत तुमचे वैवाहिक जीवन आणि प्रेम जीवन सामान्य राहीले तरी या राशीतील जे जातक प्रेम संबंधात पडलेले आहे. **महिलांना :** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा काळजी घेणे आपले काम आहे मैत्रीमध्ये वहात जाऊ नका. **शुभ दिनांक :** २२,२३.

कामाची प्रशंसा होईल

वृश्चिक : राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. या काळात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. तुमची आई या साप्ताहात तुम्हाला शिक्षणाच्या क्षेत्रात बरीच मदत करू शकते. त्यांची मदत मिळवून तुम्ही मोठ्यातील मोठी समस्या शिक्षणाच्या क्षेत्रात खूप सहजरित्या पार पडाल. या राशीतील विवाहित जातकाचे जीवनसाथी या कालावधीत एक मित्रासारखे त्यांच्याशी व्यवहार करू शकतात. या राशीतील जातकांना या कालावधीत खांदेदुखीची समस्या होऊ शकते. याचे कारण खूप जास्त वेळ काम करणे असू शकते. तुम्हाला आपल्या कामामध्ये काही वेळ काढून आराम नक्कीच केला पाहिजे. **महिलांना :** नियमित सुर्योदयाच्या वेळी ऊँ नम: नरायणचा १०८ वेळा जप करा. यावेळी तुम्हाला शिक्षणक्षेत्रात यशस्वी फळ मिळण्यासाठी कठीण मेहनत करण्याची आवश्यकता आहे. **शुभ दिनांक :** २१,२४.

वडिलांसोबत वेळ व्यतीत करा

धनु : राशीसाठी या सप्ताहात आपण व्यवहारातिल लालचीपणापासून लांब राहा. तुम्ही घरातील लोकांसोबत याच मुद्याला घेऊन वाद विवाद करू शकतात. या राशीतील काही जातक शाळा किंवा कॉलेजमध्ये आपल्या कुणी प्रिय मित्र, मैत्रिणी सोबत वाद करू शकतात. यामुळे त्यांच्या शिक्षणात समस्या येऊ शकतात म्हणजे त्यांचे लक्ष सारखे सारखे विचलित होऊ शकते. या वेळेत तुमचा सप्तम भाव सक्रिय अवस्थेत राहील म्हणून, तुम्हाला वैवाहिक जीवनात या दिवसांत चांगल्या फळांची प्राप्ती होईल. या काळात या राशीतील जातकांना गुप्तांग संबंधित समस्या होऊ शकते. तुम्हाला अंघोळीच्या वेळी आपल्या शरीराला चांगल्या प्रकारे साफ सफाई केली पाहिजे. या सोबतच डोकेदुखी समस्या ही होऊ शकते. **महिलांना :** या राशीतील जातकांना नियमित ऊँ गम गणपते नम: मंत्राचा १०८ वेळा जप केला पाहिजे. कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली असता या महिन्यात तुमच्या वडिलांचे मन कुठल्या गोष्टीला घेऊन चिंतीत होऊ शकते. अशा वेळेत तुम्हाला आपल्या वडिलांसोबत वेळ व्यतीत केला पाहिजे. **शुभ दिनांक :** १९,२३.

ध्येयासाठी प्रयत्नशील राहा

मकर : हा साप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता या राशीतील लोकांचे अवस्था थोडी कडू थोडी गोड राहील. करिअरच्या दृष्टीने पहिले असता या राशीतील लोकांचा कालावधी शुभ राहील. निजी आयुष्यात तुम्ही बरेच आनंदी राहाल म्हणून, तुम्ही कार्य क्षेत्रात ही चांगले प्रदर्शन करू सकाल. तुम्ही प्रत्येक कार्यात आपले सर्वश्रेष्ठ देण्याचा या काळात प्रयत्न कराल. जर तुम्ही नोकरी पेशा करत असाल तर, या महिन्यात त्यांना चांगल्या सॅलरीवर कुठल्या नवीन नोकरीचा प्रस्ताव मिळू शकतो. तसेच या राशीतील काही जातकांच्या आईच्या कमाईमध्ये वृद्धी होण्याने घरातील आर्थिक स्थिती सुधारू शकते. तुमच्या आईचे आरोग्य या दिवसात खूप चांगले राहील यामुळे तुम्ही बऱ्याच चिंतांनी मुक्त व्हाल. तुमच्या आई वडिलांच्या आरोग्यात ही सकारात्मक बदल होण्याची पूर्ण शक्यता आहे. या दिवसात तुम्ही घरचांच्या सल्ल्याने नवीन गाडी खरेदी करू शकतात. या राशीतील विद्यार्थी विद्यार्थीनींना शिक्षणाच्या क्षेत्रात या सप्ताहात आपल्या कुटुंबाचे पूर्ण सहयोग मिळेल. महिलांना- नियमित सुर्योदयाच्या वेळी हनुमान चालीसाचे पाठ करा. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभ दिनांक :** १९,२१.

व्यवहारात नम्रता आणणे आवश्यक

कुंभ : राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या साप्ताहात तुम्हाला भाग्याची पूर्ण साथ मिळेल. भाग्याचा बळावर तुम्ही कुठल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकतात. प्रेम जीवनात यश मिळवण्यासाठी तुम्हाला आपल्या व्यवहारात विनम्रता आणण्याची आवश्यकता असेल. जर तुम्ही प्रत्येक गोष्टीला घेऊन राग करत असाल तर तुमचा लवमेट या काळात तुम च्यापासून दूर होऊ शकतो आणि वादाची स्थिती ब्रेकअपपर्यंत पोहचू शकते. घरातील स्थितीला उत्तम बनवण्यासाठी तुम्हाला आपल्या जीवनसाथीची प्रत्येक गरजेच्या गोष्टीवर सल्ला घेतला पाहिजे. या राशीतील ते जातक जे कुठल्या लांब आजाराने चिंतीत आहे त्यांनी नियमितपणे आपले चेकअप डॉक्टरांकडून केले पाहिजे. नियमित औषधांचे सेवन केले पाहिजे. नियमित सुर्योदयाच्या वेळी श्री गणेश वंदनाचा जप करा. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक :** २०,२१.

जास्त जबाबदाऱ्या स्वीकारू नका

मीन : राशीसाठी आपले ग्रहमान पाहता कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तीचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. यामुळे तुम्ही ज्यांच्यावर प्रेम करतात त्यांच्या आईकडून या काळात तुम्हाला समर्थन मिळू शकते. काही गोष्टींना घेऊन ते तुमच्या जोडीदारापेक्षा तुमच्यावर विश्वास दाखवू शकते. या साप्ताहात तुम्हाला छातीदुखीची समस्या होऊ शकते. खासकरून, छातीच्या उजव्या बाजूच्या हिश्यामध्ये अधिक दुखापत होईल. तसेच, कंबरेच्या डाव्या बाजूला ही दुखणे असू शकते. नियमित एक ठरलेल्या वेळी महामृत्युंजय मंत्राचा १०८ वेळा जप करा. मित्रांच्या समस्यांना जाणून त्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहून ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. **शुभ दिनांक :** २३,२४.

भारतीय एज्युकेशनच्या बी. फार्मसीचा निकाल १०० टक्के

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासंकुलातील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजचा बी. फार्मसी अंतिम वर्षाच्या (सेमिस्टर ८) पहिल्याच बॅचचा निकाल १०० टक्के लागला आहे.

महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय आणि उत्कृष्ट यशाबद्दल फार्मसी महाविद्यालयात आनंदाचे वातावरण असून पालक वर्गांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील या अंतिम वर्षाच्या निकालात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. परीक्षेत यश संपादन केलेल्या बी फार्मसी कॉलेजच्या या पहिल्या बॅचमधील सिद्धी जनार्दन पाटील, अर्शी अरफाक साखरेकर व स्वरंगी जगन्नाथ वडकर हे तीन विद्यार्थी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. बिमलेश रामजित यादव हा विद्यार्थी द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला तर श्रावणी भास्कर धुंद्रे, सानिका अमोल म्हात्रे व अतिया लियाकत मुजावर हे तीन विद्यार्थी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. तसेच रिद्धी अनिल चाफे, सिद्धी सुहास पाटील व साक्षी गणेश काटे या विद्यार्थ्यांनी ही विशेष प्राविण्य मिळविले आहे. या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून गुणवंत म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे

बी फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष किशोर जैन, सीईओ कार्तिक जैन, सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ.आशिष पगारिया तसेच सर्व प्राध्यापक वर्गानी सर्व यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाला या पहिल्याच बॅचने मिळवलेल्या घवघवीत यशाने मोठी प्रेरणा दिली आहे.

सुचिता रिकामे यांचे निधन

। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।

सुचिता प्रकाश रिकामे यांचे गुरुवारी (दि. ८) मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने रिकामे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



सुचिता रिकामे यांच्या पश्चात त्यांचे पती प्रकाश रिकामे, एक मुलगी, दोन मुलगे, जावई, सुना, नातवंडे, आणि दिर, जावा असा मोठा आप्तपरिवार आहे. सुचिता रिकामे यांच्या निधनाची बातमी समजताच वडघर गाव, तसेच गवळी समाजात, तसेच महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्टचे विश्वस्त मंडळ, ट्रस्टच्या पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सभासद तसेच गवळी समाजबांधव, पंचक्रोशीतील बांधव शोक व्यक्त केला. शुक्रवारी (दि.९) सकाळी ११ वाजता त्यांच्यावर त्यांच्या मूळ गावी वडघर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील ज्ञातीबांधव उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे. दहीवलीतर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील निवासी सदनिका (फ्लॅट) ची खालील वर्णनाची मिळकत आमचे अशील १) अवधुत शरद हर्णे व २) व्यंकटेश अवधुत हर्णे, दोघेही रा. दहीवली, यांनी गजानन दिगंबर मुळे, रा. कोथरुड पुणे यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर निवासी सदनिका (फ्लॅट) मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे. दहीवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील सि.टी. सर्व्हे नंबर ७४९, ७५० व ७५१ ज्याचे क्षेत्रफळ-५२२.६ चौ. मी. यावरील चैतन्य छाया या इमारतीमधील निवासी फ्लॅट नं. १०६, पहिला मजला, क्षेत्र-८०५ चौ.फुट बिल्टअप (७४.८७ चौ.मी.), ६०३.७५ चौ. फुट कारपेट, असे आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही व्यक्तीचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास सदर व्यवहार होण्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसात नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्दोष व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक १८/१०/२०२६

ॲड. वसंत गोविंद रवणे
रा. माऊली को. ह. सो. फ्लॅट नं. १०४, पहिला मजला, ए विंग, विठ्ठल नगर, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो.नं. ९८८१६३७३८३

जा. क्र.१९६४/२६

सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे कार्यालय
मालमत्ता क्रमांक ६२५, मारुती मंदिराजवळ, मु.पो.चेंढरे, अलिबाग जि.रायगड
दि. १६-१०-२६

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड विभाग, अलिबाग
मालमत्ता क्र. ६२५, तळमजला मारुती मंदिराजवळ, मु.चेंढरे, पो.ता.अलिबाग, जि.रायगड पिन कोड: ४०२ २०१

चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक :- १३९/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :-अय्यप्पा उलवे मिशन पब्लिक ट्रस्ट

अर्जदार :- श्री. के. एस. उन्नीथन,

सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग, अलिबाग वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे की, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून/विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे/विश्वस्तांचे पद बदलण्यात आले आहे.

१) श्री.श्रीकुमार वासुदेवन नायर प्रेसिडंट
२) श्री. अशोक कुमार नायर - व्हाईस प्रेसिडंट
३) श्री. रमेसन चंद्ररन पानीकर - सेक्रेटरी
४) श्री. के एस उन्नीथन - जॉईंट सेक्रेटरी
५) श्री. बोस राजप्पन - ट्रेझरर
६) श्री.अजिथ कुमार नायर- जॉईंड ट्रेझरर
७) श्री. अभिलाश दिनेश वेटते - ट्रस्टी
८) श्री.अनिश मोन सुरेंन्द्रन- ट्रस्टी
९) सौ. दिपा मनोज - ट्रस्टी
१०) सौ. स्मिता साबु - ट्रस्टी
११) श्री.विजया राजलक्ष्मी कुमार राजेश- ट्रस्टी
१२) श्री. श्रीकुमार जी - ट्रस्टी
१३) श्री.पी शिवसंकरन नायर-ट्रस्टी
१४) श्री. करुणाकरन नायर- ट्रस्टी
१५) रामचंद्रन नायर - ट्रस्टी

तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये/विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आले आहे.

१) श्री. के एस उन्नीथन - प्रेसिडंट
२) सौ. स्मिता साबु - व्हाईस प्रेसिडंट
३) श्री. पी शिवसंकरन नायर- सेक्रेटरी
४) श्री. अजिथ कुमार नायर - जॉईंट सेक्रेटरी
५) श्री. अभिलाश दिनेश वेटते - ट्रेझरर
६) श्री. अशोक कुमार नायर - जॉईंड ट्रेझरर
७) श्री. श्रीकुमार जी- ट्रस्टी
८) श्री. अनिश मोन सुरेंन्द्रन- ट्रस्टी
९) सौ. दिपा मनोज- ट्रस्टी
१०) श्री. श्रीकुमार वासुदेवन नायर- ट्रस्टी
११) श्री. विजया कुमार राजलक्ष्मी राजेश - ट्रस्टी
१२) श्री. रमेसन चंद्ररन पानीकर- ट्रस्टी
१३) श्री. बोस राजप्पन - ट्रस्टी
१४) श्री. करुणाकरन नायर -ट्रस्टी
१५) श्री.रामचंद्रन नायर - ट्रस्टी

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६/१०/२०२६ रोजी दिली.

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग, अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे हालीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथे असलेल्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे -

जमिन मालक	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे. आर.	आकार रु. पै.
विजय शांताराम तवळे, राजेश शांताराम तवळे	१५	५	०-१०-९०	०-४२
धनेश संभाजी श्रीखंडे, राजेश शांताराम तवळे	१५	४	०-०९-६०	०-३९

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/१०/२०२६

ॲड. संदिप मसणे
बी.ए. एल. एल. बी.
पत्ता - ऑफीस नं. १०१,कोर्ट व्हयू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९६०४५४५७७७

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १५२/२०२६

श्रीमती शोभना चंद्रकांत भाये वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीस द्वारेअसे कळविणेत येते की,

श्रीमती शोभना चंद्रकांत भाये, श्री. उल्हास चंद्रकांत भाये आणि श्री.भाग्येश चंद्रकांत भाये हे कै. चंद्रकांत नारायण भाये यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये अर्ज केला आहे.

सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही कै. चंद्रकांत नारायण भाये यांना कायदेशीर वारस नाहीत असे अर्जदार यांचे कथन आहे.

अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी कै. चंद्रकांत नारायण भाये यांचे अन्य कोणीही कायदेशीर वारस असल्यास त्यांनी या न्यायालयांत दिनांक २०/११/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता समक्ष अगर योग्य ते अधिकार व माहिती दिलेल्या प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक २०/११/२०२६ रोजी या जाहीर नोटीसला अनुसरुन अन्य कोणीही कायदेशीर वारस असल्याबाबतचे कळविले नाही तर हे न्यायालय अर्जदार याचे लाभात वारस दाखल जारी करणेची पुढील कार्यवाही करेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी जाहीर केले.

अलिबाग

कोर्टाचा शिक्का

अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,
वरिष्ठ स्तर, अलिबाग

जाहीर नोटीस

सुचिता प्रकाश रिकामे यांचे गुरुवारी (दि. ८) मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने रिकामे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सुचिता रिकामे यांच्या पश्चात त्यांचे पती प्रकाश रिकामे, एक मुलगी, दोन मुलगे, जावई, सुना, नातवंडे, आणि दिर, जावा असा मोठा आप्तपरिवार आहे. सुचिता रिकामे यांच्या निधनाची बातमी समजताच वडघर गाव, तसेच गवळी समाजात, तसेच महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्टचे विश्वस्त मंडळ, ट्रस्टच्या पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सभासद तसेच गवळी समाजबांधव, पंचक्रोशीतील बांधव शोक व्यक्त केला. शुक्रवारी (दि.९) सकाळी ११ वाजता त्यांच्यावर त्यांच्या मूळ गावी वडघर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील ज्ञातीबांधव उपस्थित होते.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे आशिल यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. विजय श्रीचंद छाब्रिया. रा.२७/बी/४, नवजीवन सोसायटी, एम.जी.नगर माहूल रोड, चेंबूर, मुंबई, महाराष्ट्र,४०००७४ यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

गावाचे नाव	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी	पो.ख	आकार रू.पै
मौजे पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड	३/१/अ	०.८८.८०	०.०८.१०	३.५०
	४/१/अ	०.३७.२०	०.०४.८०	३.४४

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. १८.१०.२०२६

ॲड. यज्ञेश अनंत भागवत
रा.शॉप नं.२ पाल टॉवर भिसेगाव
ता. कर्जत जि. रायगड. मो.९३०७८८५७११

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत जमीन मालक एक्सपॅट प्रॉपर्टीज इंडिया लि. यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे-नालधे, ता. कर्जत, जि. रायगड.

सर्व्हे नं./हिस्सा नं./प्लॉट नं.	क्षेत्रफळ (चौ.मी.)	आकार (रू.पै.)
७९/२०७	४७६.००	४७.६०

तरी वरील बिनशेती जमीन मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १८/१०/२०२६

सही/-
ॲड. निता नरेश बैलमारे
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट, कचेरी रोड, कर्जत, जि. रायगड - ४१०२०१

नि : १२९/ड

नि.नं. — अपिलार्थीतर्फे वकील, श्री. सुरेंद्र नारायण जोशी,

जाहीर नोटीस

अलिबाग येथील प्रमुख जिल्हा न्यायाधिश, रायगड यांचे न्यायालयात.
दिवाणी अपील नं. ३४५/२०१२

रामचंद्र नथू धुमाळ ... अपिलार्थी
विरूद्ध
पांडुरंग खंडागळे वगैरे ... उत्तरार्थी

प्रति,

१/३/१. श्री. अशोक हाशा पाटील,
रा. घोटवडे, पो. उसर,
ता. अलिबाग, जि. रायगड.

४/२/३. वैभवी विनायक घडशी,
रा. बेलवाडी, भोईघर, फणसाड डॅम,
बोर्ली मांडला, ता. मुरूड, जि. रायगड.

ज्याअर्थी, अपिलार्थींनी या न्यायालयात, रे.मु.नं. ३६२/२०१२ या दाव्यातील दिनांक १७.०७.२०१२ रोजीच्या निकाल व हुकूमनाम्याविरुद्ध अपील दाखल केलेले आहे व सदर अपिलामध्ये तुम्हांस उत्तरार्थी नं.१/३/१ व ४/२/३ म्हणून पक्षकार केले आहे.

आणि ज्याअर्थी, तुम्हांस या न्यायालयाने सदर अपिलाचे कामी नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे सदर नोटीसची बजावणी जाहीर नोटीशीद्वारे करण्याचा आदेश मा. न्यायालयाने केला आहे.

त्याअर्थी, तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविवणेत येते की, या अपिलाचे कामी आपण नेमल्या तारखेस म्हणजे दिनांक १८/११/२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सकाळी ११ वाजता हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. सदर नेमल्या तारखेस आपण या न्यायालयात गैरहजर राहिल्यास तुमचेविरूद्ध सदर अपिलाचे कामी एकतर्फी सुनावणीचा आदेश करण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा. न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

अलिबाग,
तारीख : १५.१०.२०२६.

सही/-
क. लिपीक
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग

सही/-
अधिक्षक,
जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग

जाहीर नोटीस

आमचे अशिल सौ. समिता राजेंद्र पाटील, रा. सुलभा सदन, प्रभु आळी, पेण, ता.पेण, जि. रायगड, यांनी यांचेतर्फे तमाम लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी श्री. बशीर उल्लाह जान मोहम्मद खान, वगैरे ४ यांचेविरूद्ध पनवेल येथील दिवाणी न्यायालयात रेग्युलर मुकदमा नं. ६३६/२०१२ चा दावा मौजे घोट, ता. पनवेल येथील यांनी गट नं. ४३/५, ५९/५, ६४/२, ५८/१३, ४३/८ आणि ४३/३ (१) या मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा १/४ अविभक्त हिस्सा आहे, असे जाहीर करून, सदर मिळकतीचे सरस-निरस वाटप करावे व आमचे अशिलांचा हिस्सा निर्तुटक करून तेवढ्या हिश्श्याची मिळकत आमचे अशिलांचे ताबेकब्जात द्यावी असा आदेश करणेकरीता आणि कै. प्रकाश द्वारकानाथ प्रधान, श्री. अरुण द्वारकानाथ प्रधान आणि कै. मधुकर शिवराम प्रधान यांनी तुमचेपैकी नं. १ यांचे लाभात करून दिलेली सदर मिळकतींसंदर्भातील दिनांक ०२.०३.२००३ रोजीची अनुक्रमांक २२०२ व २२०३ ची खरेदीखते ही बेकायदेशीर असून, ती आमचे अशिलांवर त्यांच्या हिश्श्यापुरते बंधनकारक नाहीत असा ठराव करून मिळणेकरीता व मनाई हुकूमाकरीता व तद्नुषंगिक मागण्यांकरीता दाखल केला आहे. सदर दावा अद्याप प्रलंबित असून, आमचे अशिलांचा पुरावा नोंदविणेचे काम चालू आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना श्री. बशीर उल्लाह जान मोहम्मद खान वर नमूद मिळकतीं तिऱ्हाईत इसमांस विक्री करीत आहेत असे आमचे अशिलांस खात्रीपूर्वक समजले आहे. सदरचे कृत्य पूर्णपणे बेकायदेशीर आहे. सबब या जाहीर नोटीसने असे कळविणेत येते की, सदर मौजे घोट, ता. पनवेल येथील यांनी गट नं. ४३/५, ५९/५, ६४/२, ५८/१३, ४३/८ आणि ४३/३(१) या मिळकतीसंदर्भात हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. याउपरही कोणीही तसा हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास, तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व तो न्यायालयीन कारवाईस पात्र राहील, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग.
तारीख : १८.१०.२०२६.

(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड, अलिबाग, जिल्हा रायगड.

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. वैभव चंद्रकांत कडव, श्री. गणेश दिलीप देवघरे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

शेतजमिन मिळकतीचे वर्णन
मौजे मार्केवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं १२०/४/अ एकुण ०.८५.२० गुंठे क्षेत्र, पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.२०.०० गुंठे क्षेत्र विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक : १८/१०/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री. वैभव मारुती पाटील रा. चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड. व श्री. योगेश नरेंद्र मेहता रा. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले असून त्या मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पैसे)
गोपाळवट, ता.रोहा, जि. रायगड.	१४/१/क	१.५५.०० पो.ख.०.४५.०० एकुण २.००.००	०.४०

तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, बयाणापावती, लीन, चार्ज, बक्षीस, मृत्यूपत्रांकीत दान वगैरे असल्यास अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती संबंधीच्या लेखी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १५/१०/२०२६.

ॲड. संपदा मनोज पाटील
शॉप नं.११, भास्कर को.ऑप.हौसि.सोसा., रामनाथ रोड, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो. ९२२५५६६०४३.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले असून त्या मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	मालकाचे नांव व उपविभाग	भुमापन क्रमांक	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
कांटी, ता.रोहा, जि. रायगड.	श्री.वैभव मारुती पाटील	२१	४.१५.५० पो.ख.२.२०.०० एकुण ६.३५.५०	१.७२
कांटी, ता.रोहा, जि.रायगड.	सौ. संगिता वैभव पाटील	२१	२.६१.४० पो.ख.५.६५.०० एकुण ८.२६.४०	२.०२
कांटी, ता.रोहा, जि.रायगड.	श्री.योगेश नरेंद्र मेहता	२१	३.७७.६० पो.ख.०.१२.०० एकुण ३.८९.६०	१.५६
कांटी, ता. रोहा, जि.रायगड.	सौ. रसिका विवेक भोईर श्री.विवेक पांडुरंग भोईर	२१	३.८०.०० पो.ख. २.२०.०० एकुण ६.००.००	१.५७

तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, बयाणापावती, लीन, चार्ज, बक्षीस, मृत्यूपत्रांकीत दान वगैरे असल्यास अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती संबंधीच्या लेखी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आणून द्यावी. ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि.१५/१०/२०२६.

ॲड. मनोज प्रभाकर पाटील
शॉप नं. ११ भास्कर को. ऑप. हौसि. सोसा., रामनाथ रोड, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो. ९७६३३१९७००

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. अबू खालिक जैनुल आबेदिन शेख यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकती

मालकांचे नाव	अ. क्र	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू. पै.
१) श्री.लक्ष्मण रघुनाथ ताम्हाणे	१	१४०	१	०-६४-३०	९-५७
२) श्री.मारुती पांडुरंग ठाकरे	२	१४०	२	०-२८-३०	०-३७

सदरील जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती तद्नुंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतींमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडु



राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक वादावर तोडगा निघेल. प्रवासाचे बेत लांबणीवर पडतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **वृषभ** : जुनी येणी पुन्हा रखडतील. व्यवसायात पुरेशी सावधगिरी बाळगावी. विद्यार्थ्यांना संधी लाभतील.
- **मिथुन** : खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. अकारण अधिक चिंता करू नका. अपेक्षित साध्य करता येईल.
- **कर्क** : जुन्या ओळखीतून लाभ होईल. अपेक्षित भेटी समाधान देतील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **सिंह** : आर्थिक बाबतीत ताण राहील. इतरांच्या वादात मध्यस्थी नको. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या** : व्यवसायात चिंता राहील. महत्त्वाच्या भेटी प्रलंबित राहतील. वाहन, यंत्राचा वापर जपून करावा.
- **तूळ** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. स्वमताग्रह टाळायला हवा. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत.
- **वृश्चिक** : इतरांच्या सूचनांकडे दुर्लक्ष नको. आर्थिक व्यवहारात हानी संभवते. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **धनु** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. आर्थिकदृष्ट्या उन्नती होईल. कला, क्रीडा क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : मनाविरूध्द घटना संभवतात. सरकारी कामं विलंबानं होतील. अनपेक्षित घटनांमुळे दिलासा मिळेल.
- **कुंभ** : सांधेदुखीबाबत काळजी घ्यावी. भागीदारी व्यवसायात मतभेद टाळावे. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **मीन** : अपेक्षित वार्ता कानी येईल. विवाहाची बोलणी सफल होतील. बेरोजगारांना उत्तम संधी लाभतील.

१८ ऑक्टोबर

दिन विशेष

१९३१ : अमेरिकन संशोधक आणि उद्योजक थॉमस अल्वा एडिसन यांचे निधन.
१९८३ : क्रिकेटपटू विजय मांजरेकर यांचे निधन.
१९८४ : अभिनेत्री फ्रीडा पिंटो यांचा जन्म.
२००४ : कुख्यात चंदनचोर आणि तस्कर वीरप्पन याचा मृत्यू.
२०१३ : 'ज्ञानपीठ' पुरस्कारविजेते प्रसिद्ध तेलगू साहित्यिक रावुरी भारद्वाज यांचं निधन.

आरोग्यमंत्र — धोका त्वचाविकारांचा

पावसाळ्यात भिजण्याचे प्रसंग वारंवार येतात. या काळात कपडेही खडखडीत वाळत नाहीत. त्यामुळे बरेचदा ओलसर कपडे अंगावर चढवले जातात. भिजलेले कपडे तसेच अंगावर वाळवले जातात. भिजून घरी परतल्यावर अंग कोरडे करण्याचे कष्ट घेतले जात नाहीत. पण हीच बाब त्वचेचं आरोग्य१ धोक्यात आणू शकते. बरेच दिवस हे प्रकार सुरू राहिले तर त्वचाविकार उद्भवण्याचा धोका असतो. पावसाळ्यात नायटा, गजकर्ण यासारख्या विकारांची शक्यता वाढते. अर्थात बॅक्टेरियाविरोधी मलम लावल्यास हा त्रास बरा होऊ शकतो.



सोरायसिससारख्या विकारात अंगावर लालसर पुरळ उठतं. हा आजार बरा करण्यासाठी कोरफडीचा गर तसंच जंतूनाशक साबण आणि पावडरचा वापर करायला हवा. या दिवसांमध्ये चेहऱ्यावर, त्यातही कपाळावर लालसर पुरळ उठतं. याला फे शियल फॉलिक्युलिटिस असं म्हटलं जातं. जीवाणू आणि फंगसमुळे ही समस्या निर्माण होते. या विकारात त्वचाविकार तज्ज्ञाचा सल्ला घ्यायला हवा. मान्सूनकाळात घामामुळे शरीरावर लालसर पुरळ उठतं. यामुळे खूप अस्वस्थ वाटतं. हे टाळण्यासाठी अंगावर पावडर लावा. तसंच घट्ट कपडे घालू नका. कॉटन किंवा लिननचे कपडे घाला. त्वचाविकार टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या, संतुलित आहार घ्या. तेलकट, मसालेदार पदार्थांचं सेवन कमी करा. त्वचाविकार तज्ज्ञांचा सल्ला घ्या. वेळेत औषधं घ्या.

स्मार्ट टिप्स — फोटो काढण्याचं स्मार्ट तंत्र

दोस्तांनो, स्मार्टफोनने फोटो काढण्याचं वेगळंच तंत्र आहे. फोनमध्ये वेगवेगळे मोड असतात. या मोड्सचा वापर करून तुम्ही छान छान फोटो काढू शकता. मग आता स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याने फोटो काढण्याचं तंत्र जाणून घेऊ.

❊ दोस्तांनो, तुमच्या फोनमध्ये बोकेह नावाचा मोड असतो. या मोडमध्ये फोटोची पार्श्वभूमी फिकट म्हणजे ब्लर करता येते. म्हणजे या फोटोत व्यक्ती अगदी स्पष्ट दिसते. तुम्ही या मोडचा वापर करू शकता. बोकेह मोडचा कौशल्याने वापर करून छान फोटो काढता येतील.

❊ रात्रीच्या वेळी फोटो काढायचे असतील तर नाईट स्केप मोड वापरा. या मोडमुळे रात्रीच्या अंधूक प्रकाशात तुम्ही छान फोटो काढू शकाल.

❊ काही स्मार्टफोनमध्ये अल्ट्रा वाइड अँगल कॅमेरा असतो. यामुळे सगळ्या ग्रूपचा फोटो येऊ शकतो. तुमच्या स्मार्टफोनमध्ये असा अँगल असेल तर त्याचा वापर करा. एखाद्या ठिकाणी फिरायला गेल्यावर संपूर्ण परिसराचा फोटो काढायचा असेल तर या वाईट अँगल लेन्सचा वापर करता येईल.

ब्युटी टॉक — अँटी एजिंग उत्पादनं वापरताना...

❊ कोणतंही सौंदर्यप्रसाधन खरेदी करताना त्यातल्या घटकांवर एक नजर टाका. काही उत्पादनांमध्ये घातक रसायनं असू शकतात. पेराबेन्स हा घटकही त्वचेसाठी हानिकारक ठरतो. काही घटकांमुळे त्वचेची रोमछिद्र बंद होऊ शकतात. त्यामुळे नैसर्गिक घटकांनी युक्त उत्पादनांचा वापर करा.

❊ त्वचेलाही अँटी ऑक्सिडंट्सची गरज असते. त्यामुळे अँटी ऑक्सिडंट्सयुक्त अँटी एजिंग उत्पादनांचा वापर करा. यामुळे त्वचेला नवतजेला मिळेल.

❊ बाजारात अँटी एजिंग क्रीम्स आणि सीरम्स मिळतात. या दोहोंमधला फरक आधी समजून घ्यायला हवा. अँटी एजिंग सीरम्स थेट त्वचेच्या आता प्रवेश करून एजिंगची प्रक्रिया मंदावण्याचं काम सुरू करतात. रात्रीच्या वेळी त्वचेची नीट देखभाल होते. त्यामुळे सीरम रात्री लावायला हवं. अँटी एजिंग क्रीम्स किंवा लोशन्स त्वचेला ओलावा देतात. त्वचेवरचे डाग कमी करतात. त्यामुळे क्रीमचा वापर सकाळी करावा.

पंचांग

रविवार, १८ ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन शु. ७, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : पूर्वाषाढा, योग : सुकर्मा, सूर्योदय ६.३६, सूर्यास्त ६.१२

फॉरवर्डस

यूँ ना छोड़ ज़िन्दग़ी क़ी क़िताब क़ो खुला...

बेवक़्त क़ी हवा ना जानें कौनसा पन्ना पलट दे...!

फॅशन पॅशन

दोस्तांनो, एक डेनिम शर्ट तुमचा लूक पूर्णपणे बदलू शकतो. तुम्ही हा शर्ट वेगवेगळ्या पद्धतीने कॅरी करू शकता. चला तर मग डेनिमचा हा शर्ट कसा कॅरी करायचा ते पाहु या.

❊ नेहमीचा पांढरा शर्ट ठेवा बाजूला आणि डेनिम शर्टने कूल लूक मिळवा. कोणत्याही रंगाच्या चिनोजवर हा शर्ट कॅरी करता येईल. यासोबत व्हाईट स्नीकर्स घाला. स्टार्ट अपचे मालक कॅज्युअल मिटिंगला हा लूक कॅरी करू शकतात. यासोबतच डिनर किंवा कॅज्युअल पार्टीलाही तुम्ही डेनिम शर्ट घालू शकता. **(क्रमश:)**

करिअरवाटा — नवीन जॉब शोधताना...

प्रत्येक कार्यालयातलं वातावरण वेगळं असतं. ते तणावपूर्ण असेल तर मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. अशा गढूळ वातावरणात प्रगती आणि कार्यशक्ती खुंटते. मात्र ते बदलण्याचा विचार करत असाल तर दुसरं क्षेत्र निवडतानाही काळजी घ्या. नव्या सेक्टरमध्ये प्रवेश करताना अनेक बाबींची शहानिशा करणं आवश्यक आहे. यासाठी तुम्ही सध्या पेलत असणाऱ्या जबाबदारीशी मिळतीजुळती संधी देणारा जॉब शोधा. या व्यतिरिक्त



तुमच्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्लाही महत्त्वाचा ठरतो. सुरूवातीला पाच-सहा क्षेत्रांची चौकशी करा. या क्षेत्रांमध्ये पैसा कुठून येतो, त्यांचे ग्राहक कोण, या इंडस्ट्रीवर बाजारातील बदलांचा किती आणि कसा प्रभाव पडतो, त्यांचे स्पर्धक कोण, त्यांच्या पैशाचा विनियोग कसा होतो आदी मुद्दे लक्षात घेणं आवश्यक आहे. त्यासाठी शॉर्टलिस्ट बनवा. उपलब्ध यादीतील तुमच्यासाठी पर्याप्त ठरणाऱ्या कंपन्या शॉर्टलिस्ट करा आणि त्यांची अधिक माहिती मिळवा. तिथं आवश्यक असणाऱ्या कौशल्याची माहिती घ्या. यासाठी नव्या सेक्टरच्या गरजेप्रमाणे रिझ्युमेमध्ये बदल करावा लागेल. आताच्या क्षेत्रातील प्रचलित भाषा आणि नव्या क्षेत्रातील भाषा यात फरक असू शकतो. याची जाण ठेवा.

खेचाखेची — देणगी

संतासिंगचा मुलगा : बाबा, आपल्याकडे कोणीतरी स्विमिंग पूलसाठी देणगी मागायला आला आहे.

.
.
.
.
.

संतासिंग : ठीक आहे. त्याला एक तांब्या पाणी देऊन टाक.

वेगळं काही

शास्त्रज्ञांनी जगातल्या सर्वात जलद चालणाऱ्या मुंगीचा शोध लावला आहे. ही मुंगी सहारा वाळवंटात सापडली आहे. ट्युनिशियाच्या दक्षिण भागात या मुंग्या सापडल्या आहेत. या मुंग्यांना 'सिल्व्हर अँट' असं नाव देण्यात आलं आहे. शरीराच्या आकारापेक्षा १०८ पट अंतर अवघ्या एका सेकंदात कापणं त्यांना शक्य होतं. या मुंग्या इथल्या रणरणत्या उन्हातही अगदी सहज जिवंत रहातात. त्यांच्या शरीरावरच्या केसांमुळे सूर्याची किरणं परिवर्तित होतात. यामुळे या मुंग्यांना उन्हाच्या झळा लागत नाहीत. या मुंग्या चंदेरी रंगाच्या आहेत. म्हणूनच त्यांना सिल्व्हर अँट असं म्हटलं जातं. या मुंग्या ८५५ मीटर प्रतिसेकंद या वेगाने धावू शकतात.

महिलायन — अविचाराने वागू नकोस

मी २८ वर्षांची विवाहिता आहे. माझ्या वडिलांच्या अपघाती निधनानंतर आईने दुसरं लग्न केलं होतं. पण मतं न जुळल्याने माझे सावत्र वडिलांशी सतत वाद होत राहिले. त्यामुळे लग्नानंतर मी फक्त आईशीच नातं ठेवून होते. पण महिन्याभरापूर्वी आईचं आकस्मिक निधन झालं. रात्री चक्कर येऊन पडली आणि जागीच गतप्राण झाली असं सांगणारा फोन आला तेव्हा माझा विश्वासच बसला नाही. शिवाय शक्य असूनही मी येईपर्यंत वाट न पाहता तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याने मनात संशय निर्माण झाला आहे. हा संशय कसा दूर करु?



– सखी, आधीपासून मनात आकस असताना अशी एखादी धक्कादायक घटना समोर येते तेव्हा सैरभैर होणं स्वाभाविक आहे. पण परिस्थितीचा साकल्याने विचार कर. पोस्ट मार्टमच्या रिपोर्टची माहिती घे. शेजाऱ्या-पाजाऱ्यांशी चर्चा करुन त्या दोघांमध्ये काही भांडण झालं होतं का ते तपास. डेथ सर्टिफिकेट देणाऱ्या डॉक्टरांची भेट घे. या सगळ्यावरुन तुला वस्तुस्थितीची नेमकी कल्पना येऊ शकेल. केवळ तर्क बांधू नकोस.

सुडोकू १६३

		५			१		४	६
		४	५					
९					३		७	
८		६			५			३
४			२	१	८			७
२			६			८		१
	९		३					२
					७	५		
३	२		१			६		

टीप -

❊ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


❊ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

❊ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १६२ चे उत्तर

१	३	८	४	६	७	९	२	५
७	९	६	३	५	२	१	४	८
२	५	४	१	९	८	७	३	६
८	१	७	६	३	५	४	९	२
९	२	३	७	८	४	५	६	१
६	४	५	२	१	९	३	८	७
३	८	१	९	७	६	२	५	४
४	६	९	५	२	१	८	७	३
५	७	२	८	४	३	६	१	९

शब्दकोडे क्रमांक १६३



आडवे शब्द :-

१) अतिशय श्रीमंत मनुष्य
६) झाडाभोवतीचा कट्टा
८) पडदा
१०) फळातील खाद्यभाग
११) पंख
१२) वेळ घालविणे
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) नोंदण्यासारखा गुन्हा
१७) आयुष्य
१९) बाई
२१) बोजा, भार
२४) देखावा, सजावट
२६) मत्स्य
२७) जास्तीतजास्त व कमीत कमी
२९) योग्यवेळी
३०) घबराटीमुळे होणारी धावपळ
३२) ईर्षा, बळ शक्ती, जोर
३३) फूल, पुष्प
३५) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
३७) सापाने सोडलेली त्वचा
३८) गळ्यामागचा अवयव
३९) शेवट
४०) फोक, छडी
४१) लहान
४२) हात
४४) दक्षतेचा इशारा
४५) पक्ष, बाजू, काठ
४६) आरडाओरड, गोंधळ
४८) अलमारी
४९) पतिपत्नी
५१) केर
५३) हिन्दुस्थान
५५) गोष्ट विचारात घेणे (वा.प्र.)
५७) हत्तीचा शिक्षक
५८) उंच सखल नसलेले
६०) लाखाचा आकडा
६२) रतिचा पती

उभे शब्द :-

१) दरिद्री माणूस
२) वरपांगी ३) गाडीचे छत
४) कळलाव्या मुनी
५) जावळा
६) भिंतीवर सरपटणारा प्राणी
७) गूढ
८) आजीची आई
९) छोटा
१२) पुण्याजवळचा एक घाट
१५) व्यय
१६) पर्जन्यकाळ
१८) नवरदेवाची आई
२०) विश्रांती
२२) चुकून, अजाणता
२३) कोकणी भाषेतील एक पोटभाषा
२४) आजूबाजूचा प्रदेश
२५) पुरापुरा अंदाज
२६) माप घेणे, मोजणे
२८) खून करणे (वा.प्र.), मारून रक्त पिणे
३१) तसराळे
३४) अंत:करण
३६) कमळासारखे सुंदर डोळे
३७) कर्णेंद्रिय
४०) सोने
४१) चीजवस्तू
४२) ज्वारीची वाळलेली ताटे, जनावरांचे खाद्य
४३) स्वत:ला
४५) युक्ती
४६) एक सुगंधी उष्ण पेय
४७) शस्त्र
५०) यमाचे घर
५२) सुकुमार व सुंदर
५३) स्तुती करणारा
५४) समशेर
५६) मंदिर
५९) पर्ण
६१) ऱ्हास, उतरती कळा नाश
६२) पुष्परस
६३) बशीचा जोडीदार
६४) अंधार
६५) बंधन, फास, फासा

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

ज	मी	न	म	ह	सू	ल	■	नि	रो	प	■	वि	जे	ता
ल.	■	य	म	न	■	हा	द	रा	■	र	य	त	■	ज
नि	ध	न	■	न	वी	न	■	धा	ड	स	■	र	क्क	म
थी	र	■	न	■	र	स	दा	र	■	दा	भ	ण	■	हा
■	व	हि	वा	ट	■	हा	र	■	मा	र	वा	■	क	ल
गो	णी	■	र	म	जा	न	■	भा	क	■	नी	र	द	■
ठा	■	सो	■	ट	■	■	मो	■	क	ल	मा	■	म	स
■	ट	म	ट	म	न	ग	री	■	■	स	ता	र	■	ट
ऋ	ण	■	पा	■	र	ग	■	ह	मा	ल	■	म	ग	र
■	क	मा	ल	कि	मा	न	■	म	■	स	हा	रा	■	फ
भा	■	त्र	■	रा	ई	■	प	खा	ल	■	व	ट	व	ट
न	ख	■	क	णा	■	गो	र	स	■	क	रा	■	न	र
■	स	व	ड	■	ग	ड	वा	■	खा	स	■	ना	च	■
रा	ख	■	व	हा	ण	■	न	ज	र	बा	ज	■	र	सा
वा	स	क	ट	■	क	ल	गी	■	ट	■	ग	र्व	■	य

माणूस म्हणून जगताना

आयुष्य शिस्तीत जगावं, मस्तीत नाही.

माणूस म्हणून जन्म मिळाला आहे, तर माणूस म्हणूनच जगावं. निसर्गाने माणसाला एक विलक्षण देणगी दिली आहे विचार करण्याची, चूक ओळखण्याची, बदलण्याची आणि दुसऱ्याच्या वेदना समजून घेण्याची क्षमता. वाघ जगतो, सिंह जगतो, पक्षी जगतात, मुंग्या जगतात. प्रत्येक जीव आपापल्या स्वभावानुसार जीवन जगतो. पण माणसाला निसर्गाने केवळ जगण्यासाठी नव्हे, तर समजून, जाणून आणि मानवतेने जगण्यासाठी बुद्धी आणि विवेक दिला आहे. म्हणूनच मला वाटतं, माणसाने आयुष्य केवळ स्वतःभोवती केंद्रित करू नये. स्वतःकडे पाहण्याची हिंमत असावी, आयुष्यात अधूनमधून थांबून स्वतःलाच काही प्रश्न विचारले पाहिजेत.

मी चुकतोय का?

माझ्या वागण्यामुळे कुणाला विनाकारण दुःख होतंय का?

माझ्या शब्दांनी कुणाच्या मनाला जखम होतेय का?

मी माझ्या जबाबदाऱ्यांपासून पळतोय का?

मी फक्त माझ्या सुखाचा आणि गरजांचा विचार करतोय का?

माझ्यात बदल करण्यासारखं काही आहे का?

हे प्रश्न दुसऱ्याला विचारण्यापेक्षा स्वतःला विचारण्याची प्रामाणिकता माणसामध्ये असली पाहिजे. स्वतःचं परीक्षण करणं म्हणजे स्वतःला कमी लेखणं नाही. उलट, स्वतःच्या चुका स्वीकारण्याइतका मोठेपणा मिळवणं होय. जमिनीवर राहणं हीच खरी उंची आयुष्यात यश मिळालं, पैसा मिळाला, पद मिळालं, प्रसिद्धी मिळाली, अधिकार मिळाला म्हणून माणसाने स्वतःला इतरांपेक्षा मोठं समजू नये.

माणूस किती उंच गेला यापेक्षा, तो किती जमिनीवर राहिला हे महत्त्वाचं आहे. अहंकार माणसाला इतरांपासून दूर करतो; नम्रता माणसाला माणसांशी जोडते.

आपण कितीही मोठे झालो तरी आपल्या आयुष्यात आपल्याला साथ देणाऱ्या माणसांची, कुटुंबाची, समाजाची आणि निसर्गाची जाणीव ठेवली पाहिजे.

पाय जमिनीवर आणि विचार आकाशाएवढे हीच खरी उंची.

फक्त स्वतःसाठी जगणं पुरेसं नाही.

स्वतःच्या गरजा पूर्ण करणं चुकीचं नाही. स्वतःच्या आनंदाचा विचार करणंही चुकीचं नाही. पण संपूर्ण आयुष्य फक्त ''माझ्यासाठी'' जगणं हळूहळू माणसाला आतून रिकामं करू शकतं.

आपल्या आयुष्यात काही जबाबदाऱ्या असतात. कुटुंबाप्रती, मुलांप्रती, जोडीदाराप्रती, आई-वडिलांप्रती, मित्रांप्रती आणि समाजाप्रती.

या जबाबदाऱ्या ओझं म्हणून नव्हे, तर आपल्या अस्तित्वाचा एक भाग म्हणून स्वीकारायला हव्यात.

सगळ्यांसाठी स्वतःला विसरून जगणं आवश्यक नाही; पण स्वतःपुरतं जगणंही पुरेसं नाही.

आपल्या आनंदात दुसऱ्याच्या आनंदाचा वाटा असावा आणि आपल्या यशात दुसऱ्याच्या जीवनाला थोडी तरी उभारी मिळावी.

व्यसन नव्हे, विवेक हवा

संजय कचरे

माणूस दुःखापासून पळण्यासाठी अनेक मार्ग शोधतो. काही जण व्यसनांच्या आहारी जातात, काही रागात जगतात, काही स्वतःच्या जगात इतके हरवून जातात की त्यांच्या आसपासच्या माणसांना काय वाटतंय, याची जाणीवच राहत नाही.

पण दुःख विसरण्यासाठी केलेली प्रत्येक गोष्ट दुःख संपवतेच असं नाही.

व्यसन क्षणभर विसरायला लावू शकतं; पण जबाबदारीपासून मुक्त करत नाही.

खरं धैर्य म्हणजे स्वतःच्या वेदनांकडे पाहणं, त्या स्वीकारणं आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करणं.

काळानुसार स्वतःमध्ये बदल करायला हवा.

''मी असाच आहे'' हे वाक्य अनेकदा आपल्या विकासाचा अडथळा बनतं.

काळ बदलतो. परिस्थिती बदलते. नाती बदलतात. आपल्या जबाबदाऱ्या बदलतात. त्यामुळे आपली मानसिकता, विचार आणि वर्तनही आवश्यकतेनुसार बदलण्याची तयारी असली पाहिजे.

पूर्वी आपण एखाद्या गोष्टीकडे ज्या पद्धतीने पाहत होतो, तीच पद्धत आयुष्यभर योग्य असेलच असं नाही.

चूक लक्षात आली तर बदलणं ही कमजोरी नाही.

बदल स्वीकारण्याची तयारी हीच मानसिक परिपक्वतेची खूण आहे.

सहानुभूती ही माणसाची खरी ओळख. समोरचा माणूस काय अनुभवतोय, हे समजून घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सहानुभूती.

प्रत्येकाच्या आयुष्यात काही न दिसणाऱ्या लढाया असतात. म्हणून कोणावर लगेच निर्णय देण्यापूर्वी एक क्षण थांबून विचार करावा.

''कदाचित हा माणूसही काहीतरी सहन करत असेल.''

आपण प्रत्येकाची समस्या सोडवू शकत नाही. पण आपल्या शब्दांनी एखाद्याला आणखी दुखावण्यापासून स्वतःला थांबवू शकतो.

कधी कधी मोठी मदत म्हणजे पैसा देणं नसतं.

कधी शांतपणे ऐकून घेणं,

कधी दोन प्रेमाचे शब्द बोलणं,

कधी चुका माफ करणं,

आणि कधी फक्त ''मी तुझ्यासोबत आहे'' असं म्हणणं ही सुद्धा मानवता आहे.

माझ्या आयुष्यातून मिळालेली एक शिकवण माझ्या आयुष्यातील काही अनुभवांनी मला एक गोष्ट खूप खोलवर शिकवली. एका व्यक्तीचं जगणं केवळ त्या व्यक्तीपुरतं मर्यादित नसतं.

आपण ज्या पद्धतीने जगतो, त्याचा परिणाम आपल्या जवळच्या माणसांवर होतो. आपल्या सवयी, आपली व्यसनं, आपला राग, आपली बेफिकिरी, आपली उदासीनता किंवा स्वतःपुरतं जगण्याची वृत्ती यांच्या सावल्या अनेकदा कुटुंबातील इतरांच्या आयुष्यावर पडतात.

बालपणात किंवा आयुष्याच्या एखाद्या टप्प्यावर मिळालेल्या काही अनुभवांमुळे मनावर खोल जखमा निर्माण होऊ शकतात. आत्मविश्वास कमी होऊ शकतो. स्वतःबद्दल कमीपणाची भावना निर्माण होऊ शकते.

पण त्या वेदनांमध्ये आयुष्यभर अडकून राहण्यापेक्षा त्यातून एक शिकवण घेता येते. ''माझ्यामुळे माझ्या जवळच्या माणसांना अशी वेदना मिळू नये.''

भूतकाळ बदलता येत नाही. पण त्या भूतकाळातून आपण आपल्या पुढच्या आयुष्याची दिशा नक्की बदलू शकतो.

हीच कदाचित वेदनेची सर्वात सकारात्मक परिणती आहे.

मानवतेचा अर्थ काय?

माझ्यासाठी मानवता म्हणजे मोठमोठ्या गोष्टी करणं नाही.

मानवता म्हणजे आपल्या माणसांची काळजी घेणं. आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे निभावणं. चूक झाली तर ती मान्य करणं. अहंकार कमी करणं. व्यसनांपासून दूर राहणं. दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव ठेवणं. गरज असेल तेव्हा मदतीचा हात देणं. स्वतःच्या विचारांमध्ये बदल करण्याची तयारी ठेवणं. आणि आपल्या अस्तित्वामुळे दुसऱ्याचं आयुष्य थोडं तरी चांगलं होईल याचा प्रयत्न करणं.

माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्याकडे काहीच नसतं. आयुष्यभर तो अनेक गोष्टी मिळवतो. पण शेवटी त्याच्या मागे राहतात त्या त्याने किती कमावलं यापेक्षा, त्याने किती जपलं आणि किती माणुसकी दिली याच्या आठवणी.

शेवटी

वाघाने वाघासारखं जगावं.

पक्ष्याने पक्ष्यासारखं जगावं.

मुंगीने मुंगीसारखं जगावं.

पण माणसाने माणूस म्हणून जगावं.

निसर्गाने आपल्याला बुद्धी दिली आहे ती अहंकारासाठी नव्हे, विवेकासाठी वापरूया.

निसर्गाने आपल्याला हृदय दिलं आहे ते केवळ स्वतःसाठी नव्हे, तर दुसऱ्याच्या वेदना जाणण्यासाठी वापरूया.

निसर्गाने आपल्याला आयुष्य दिलं आहेते केवळ उपभोगण्यासाठी नव्हे, तर अर्थपूर्णपणे जगण्यासाठी वापरूया.

आयुष्य मस्तीत नव्हे, शिस्तीत जगूया.


अहंकारात नव्हे, नम्रतेत जगूया.

फक्त स्वतःसाठी नव्हे, तर आपल्या माणसांसाठी जगूया.

आणि सर्वांत महत्त्वाचं

माणूस म्हणून जन्म मिळाला आहे, तर शेवटपर्यंत माणूस म्हणूनच जगू या.

कारण आयुष्याची खरी किंमत आपण किती जगलो यात नाही; तर आपल्या जगण्यामुळे किती माणसं जपली गेली, किती मनं दुखण्यापासून वाचली, आणि आपल्या अस्तित्वाने किती माणसांना आधार मिळाला यात आहे.



नव्वदीच्या दशकातील सरस्वती पूजन आणि चिमणीच्या उजेडातील सोनेरी साद

स्मृतींच्या हिंदोळ्यावर बसून भूतकाळाच्या धुरकट पायवाटेने मागे वळून पाहिलं, की काळजाचा ठोका चुकवणारा एक सुवर्णकाळ साद घालतो तो काळ होता साध्या, निगर्वी आणि समाधानाने ओथंबलेल्या नव्वदीच्या दशकाचा! आज घराघरांत हॅलोजन दिव्यांची लखलखणारी पांढरी विमाने धावतात, काचेच्या महालांत आधुनिकतेची चकचकीत झगमग आहे; पण त्याकाळी नळाच्या छपराखाली, एका साध्या रॉकेलच्या चिमणीतून पाझरणारा मायेचा, वात्सल्याचा आणि अथांग आत्मियतेचा तो उबदार प्रकाश आज या महागड्या दिव्यांच्या गर्दीत कुठेतरी हरवून बसला आहे.

त्या काळी पहाट ही नितांत देखणी आणि सात्त्विक असायची. कोंबड्याच्या पहिल्या बांगेबरोबर जाग यायची ती न्हाणीघरातल्या चुलीच्या लालबुंद जाळाने. त्या काजळी धरलेल्या भल्यामोठ्या रांजणाखाली ओल्या लाकडांची सरपणं धगधगायची. लाकडांचा आणि सुक्या पाल्यापाचोळ्याचा तो सुगंधी धूर कौलारू छपराच्या फटींमधून आभाळात विरून जायचा. त्याच धुरकट उबेत मडक्यातल्या वाफाळलेल्या पाण्याने आंघोळ करताना अंगात एक वेगळाच तरतरीत उत्साह भिनत असे.

आमच्या घरात विजेचा प्रकाश पोहोचायला १९९० साल उजाडावं लागलं होतं. खरंतर तो केवळ योगायोग नव्हता, तर नियतीचा एक मंगल संकेत होता कारण सरस्वती पूजनाच्याच पावन दिवशी आमच्या घरात पहिली वीज अवतरली होती! नुकतीच दहावीची परीक्षा पार पडून मी अकरावीच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवलं होतं. घरापासून तब्बल ३१ किलोमीटर दूर मालवणला कॉलेज... पहाटेच्या अंधारात, रॉकेलच्या दिव्याच्या मिणमिणत्या उजेडात पुस्तकांची आवराआवर करून बाहेर पडावं लागायचं. आणि त्याच दिवशी साक्षात विद्येची देवता सरस्वती घरात प्रकाशरूप घेऊन आली; घराच्या मातीच्या भिंतीवर विजेचे मीटर लागले.

त्या क्षणापर्यंतचा आमचा संपूर्ण जीवनप्रवास रॉकेलच्या चार साध्या बत्त्यांनीच उजळून काढला होता. एक बत्ती अन्नाची माया शिजवणाऱ्या आईच्या चुलीपाशी, एक घरातल्या मुख्य ओळयात, एक बाहेरील पडवीत आणि आमच्या अभ्यासाचा एकमेव साथीदार म्हणजे काचेचा काजळलेला कंदील! आम्ही भावंडं त्या मंद, पिवळसर प्रकाशाच्या कवेत तासन्तास पुस्तकांवर डोळे खिळवून बसायचो. डोळ्यांत आभाळाएवढी स्वप्ने आणि मनात दारिद्र्याला हरवण्याची अथांग जिद्द असायची.

घरामध्ये दारिद्र्य पाचवीला पुजलेलं होतं, पण अंतःकरणात तृप्तीची श्रीमंती भरून वाहत होती. पिण्याच्या पाण्यासाठी तब्बल एक किलोमीटरची खडतर पायपीट ठरलेली असायची. दिवसभर काबाडकष्ट करून, हाडांची काडं करून संध्याकाळी आई-वडील घराच्या अंगणात पाऊल ठेवायचे. त्यांच्या कपाळावरून घामाच्या धारा वाहत असायच्या; पण लेकरांची हसरी तोंडं पाहताच त्यांच्या सुकलेल्या ओठांवर जे स्वर्गीय समाधान फुलायचं, त्याची तुलना जगातल्या कोणत्याही वैभवाशी होऊ शकत नाही. मग आम्ही भावंडं आई-वडिलांच्या खांद्याला खांदा लावून पाण्याच्या विहिरीकडे धाव घ्यायचो. न्हाणीतलं ते महाकाय मडकं भरण्यासाठी अंधार पडण्याआधी पाण्याच्या सहा फेऱ्या आणि पुन्हा भल्या पहाटे सहा दुडी पाणी वाहून आणून घरचा रांजण तुडुंब भरणंहा नित्यक्रम होता.



धनंजय शेटये

इतक्या तीव्र टंचाईत आणि खडतर जगण्यातही माझ्या माऊलीचं काळीज मात्र एखाद्या वटवृक्षासारखं हिरवंगार होतं! घरातल्या पाण्याचा एकही थेंब तिने कधी वाया जाऊ दिला नाही. न्हाणीघरातून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या झुंबड उडायची; पण सरस्वती प्रत्येकाने स्वतःचीच आणायची, हा संस्कार होता. कोणाचा हात थरथरलेला, कोणाचे रंग रेषेबाहेर सांडलेले, तर कोणाची सरस्वती साक्षात जिवंत मूर्तीसारखी उमटलेली... त्या कागदांवर कलेपेक्षा त्या चिमुरड्या हृदयांमधील अथांग भक्तीचा महापूर लोटलेला असायचा.

पूजनाच्या मंगल प्रभाती अंगात स्वच्छ धुतलेले कपडे आणि हातात पांढराशुभ्र रुमाल असायचा. त्या रुमालाच्या कोपऱ्यात तांदूळ, सुपारी, हळद-कुंकू अशी मातेची पवित्र ओटी झेपावताना संपूर्ण वातावरण मनमोहक स्वर्गीय वाटायचं.

त्यानंतर लहानग्या कंठांतून जेव्हा सामूहिक आरतीचे सूर उमटायचे, तेव्हा शाळेच्या भिंतीही भक्तिभावाने थरथरून उठायच्या. अवघी एक-दोन रुपयांची ती चिमुकली वर्गणी; पण त्यातून गुरुजींनी शाळेच्या पडवीत स्वतःच्या हाताने बनवलेला तो गरमागरम गोड शिऱ्याचा प्रसाद... त्याची अमृततुल्य चव आजही जिभेवर जशीच्या तशी जिवंत आहे. दुपारच्या उन्हात मैदानात रंगणाऱ्या फुगड्या, भजनांच्या तालावर थिरकणारी पावले आणि बालसुलभ हास्याने आसमंत दणाणून जायचा.

दुपार कलतीला लागली की वेध लागायचे ते 'सांस्कृतिक कार्यक्रमां'चे! आमचे शिक्षक केवळ विद्यादान करणारे मास्तर नव्हते, तर पाषाणालाही पाझर फोडणारे मूर्तिकार होते. आदरणीय हरिश्चंद्र पवार गुरुजी, मालवदे गुरुजी, पार्टे गुरुजी आणि अरुण गोसावी गुरुजी... ही केवळ शिक्षकांची नावे नव्हती, तर आमच्यातल्या सुप्त कलागुणांना पैलू पाडणारे ते विद्यापीठाचे स्तंभ होते. भयाच्या अंधारात चाचपडणाऱ्या आम्हा पोरांना त्यांनी विश्वासाचा हात देऊन थेट रंगमंचावर उभं केलं.

इयत्ता चौथीत असताना याच सरस्वती पूजनाच्या व्यासपीठावर मी एका नाटुकल्यात 'भटजीं'ची विनोदी भूमिका वठवली होती. अंगावरचे ते सैल धोतर, काखेतली पोथी आणि संवादांमधील ती मिश्कील कोकणी ढब... मी रंगमंचावर पहिलं पाऊल टाकताच प्रेक्षागृहात हास्याचे कारंजे उडाले, टाळ्यांचा अखंड कडकडाट झाला! त्या टाळ्यांनी एका खेडूत मुलाच्या मनात आत्मविश्वासाचा पहिला दीप प्रज्वलित केला. जगासमोर छातीठोकपणे उभं राहण्याचं आणि न डगमगता बोलण्याचं बळ मला त्याच मातीच्या रंगमंचाने दिलं.

सरस्वती पूजन हा केवळ शालेय दिनदर्शिकेतील एक दिवस नव्हता; तो माझ्या संपूर्ण आयुष्याला दिशा देणारा मंगल संस्कार होता. आज माझ्या हातून जो काही चार ओळींचा शब्दप्रपंच घडतो, माझी लेखणी पांढऱ्या कागदावर जी काही भावपूर्ण अक्षरे उमटवू शकते, तो सारा माझ्या ज्ञानदात्री सरस्वती मातेच्या वरदहस्ताचाच असीम प्रसाद आहे.

दारिद्र्याच्या काटेरी पायवाटेवरून अनवाणी चालताना, वादळांना छातीचा कोट करून सामोरं जाण्याचं आणि अंधाराचे उंबरठे ओलांडून प्रकाशाकडे झेपावण्याचं सामर्थ्य मला त्या मातेच्या चरणांतूनच लाभलं. नव्वदीच्या दशकात रॉकेलच्या मिणमिणत्या चिमणीसमोर सरस्वतीच्या चित्रापुढे जोडलेले ते थरथरते हात... आजही माझ्या प्रत्येक श्वासात तीच पवित्र ऊर्जा, अढळ निष्ठा आणि कधीही न आटणारा मायेचा ओलावा कायम जागवून ठेवतात!

पुस्तकांकडे परतताना तंत्रज्ञानाला सोबत घेऊया

नुकताच वाचन प्रेरणा दिन साजरा झाला, त्या निमित्ताने पुस्तक आणि स्क्रीन यांतील फरक निश्चितच समजला असेल.

डिजिटल युगात शिक्षणाची दिशा बदलण्याची नव्हे, तर संतुलित करण्याची वेळ.

एक काळ असा होता की मुलाच्या हातात पुस्तक दिसले की घरातील मोठ्यांना समाधान वाटायचे. पुस्तक उघडलेले म्हणजे अभ्यास सुरू आहे, अशी साधी आणि सहज समजूत होती. नंतर काळ बदलला. पुस्तकाच्या जागी टॅबलेट आले, वहीच्या जागी स्क्रीन आली आणि वर्गाच्या भिंतींपलिकडचे जग एका छोट्याशा उपकरणात सामावले.

तंत्रज्ञानाने शिक्षणाला अभूतपूर्व वेग दिला. एका क्लिकवर माहिती उपलब्ध झाली. जगातील उत्तम व्याख्याने, प्रयोग, चित्रफिती आणि शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांच्या हातात आली. परंतु प्रत्येक वेगवान बदलाबरोबर एक प्रश्नही जन्माला येतो. आपण शिक्षण सुलभ करत आहोत की मुलांचे लक्ष सतत बदलण्याची सवय लावत आहोत?

आज जगातील काही शिक्षणव्यवस्था या प्रश्नाकडे गंभीरपणे पाहत आहेत. स्वीडनने डिजिटल साधनांचा व्यापक वापर केल्यानंतर पुन्हा एकदा छापील पुस्तके, वाचन, लेखन आणि कागद-पेन यांच्या महत्त्वाचा विचार सुरू केला आहे. हा निर्णय तंत्रज्ञानाविरोधातील घोषणा म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. त्यामागे एक मोठा शैक्षणिक विचार आहे. मुलांच्या मूलभूत शिकण्याच्या प्रक्रियेला कोणते साधन अधिक पोषक आहे?

यातून भारतानेही काही शिकण्यासारखे आहे. आपण अनेकदा आधुनिक शिक्षण म्हणजे अधिकाधिक डिजिटल शिक्षण, अशी व्याख्या करतो. शाळेत स्मार्ट बोर्ड आला, प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात टॅबलेट आले किंवा प्रत्येक वर्गात डिजिटल सामग्री पोहोचली की शाळा आधुनिक झाली, असे मानण्याची घाई होते. परंतु शिक्षणाची आधुनिकता उपकरणांच्या संख्येने ठरत नाही.

विद्यार्थी किती खोलवर विचार करतो, किती समजून वाचतो, स्वतःचे विचार किती स्पष्टपणे लिहितो आणि शिकलेल्या ज्ञानाचा जीवनात किती परिणामकारक वापर करतो.यावर शिक्षणाची गुणवत्ता ठरते.

पुस्तक वाचताना मुलाला थांबावे लागते. एखादे वाक्य पुन्हा वाचावे लागते. अर्थ समजून घ्यावा लागतो. काही वेळा



पुस्तक बंद करून विचार करावा लागतो. वहीत लिहिताना स्वतःच्या विचारांना शब्द द्यावे लागतात. या प्रक्रियेला वेळ लागतो आणि शिक्षणाला हाच वेळ आवश्यक असतो.

डिजिटल माध्यमाची ताकद वेगात आहे; पुस्तकाची ताकद खोलीत आहे. डिजिटल माध्यम आपल्याला असंख्य पर्याय देते; पुस्तक आपल्याला एका विचारासोबत काही काळ राहायला शिकवते. म्हणून प्रश्न तंत्रज्ञान चांगले की पुस्तक चांगले, हा नाही. प्रश्न असा आहे की कोणत्या वयात, कोणत्या विषयासाठी, किती प्रमाणात आणि कोणत्या उद्देशाने कोणते माध्यम वापरावे? ही समजूत शिक्षणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आली पाहिजे.

विशेषतः लहान मुलांच्या शिक्षणात स्पर्श, आवाज, हस्ताक्षर, चित्र, प्रत्यक्ष संवाद, खेळ, प्रयोग आणि पुस्तक यांना पुरेसा अवकाश मिळाला पाहिजे. मुलाने केवळ स्क्रीनवर उत्तर पाहू नये; त्याने स्वतः उत्तर शोधावे. केवळ टाइप करू नये; त्याने स्वतःच्या हाताने लिहावे. केवळ चित्रफित पाहू नये; त्याने प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. कारण शिक्षण म्हणजे माहिती डोक्यात भरणे नाही.

शिक्षण म्हणजे मनाची रचना घडविणे. आणि याच ठिकाणी पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. मुलाने मोबाईलवर शैक्षणिक व्हिडिओ पाहिला म्हणून तो अभ्यास झाला, असे समजणे जितके चुकीचे आहे, तितकेच मोबाईल म्हणजे नेहमीच वाईट, असे मानणेही योग्य नाही. पालकांनी मुलाला डिजिटल साधनापासून दूर करण्यापेक्षा त्याला डिजिटल शिस्त शिकवली पाहिजे.

कधी स्क्रीन वापरायची? कशासाठी वापरायची? किती वेळ वापरायची? वापरल्यानंतर काय करायचे? आणि सर्वांत महत्त्वाचे स्क्रीन बंद केल्यानंतर स्वतःशी आणि जगाशी कसे जोडून राहायचे? या प्रश्नांची उत्तरे घरातूनच मिळाली पाहिजेत.

शाळेनेही डिजिटल साधनांचा वापर बंद करण्याऐवजी त्याचा शैक्षणिक वापर अधिक बुद्धिमत्तेने निश्चित केला पाहिजे. काही संकल्पना ॲनिमेशनमधून अधिक चांगल्या समजतील, काही प्रयोग डिजिटल माध्यमातून दाखवता येतील, काही जागतिक व्याख्याने विद्यार्थ्यांना ऐकता येतील. परंतु त्यानंतर विद्यार्थ्याने पुस्तक उघडावे, प्रश्न सोडवावा, स्वतः लिहावे, चर्चा करावी आणि प्रत्यक्ष कृती करावी.

सुनील गवळी

डिजिटल अनुभवानंतर प्रत्यक्ष कृती हीच खरी शिकण्याची साखळी असू शकते.

याहून महत्त्वाची बाब म्हणजे भविष्यातील संकटांसाठी शिक्षणव्यवस्था तयार असणे. कोरोनाच्या काळाने आपल्याला एक गोष्ट स्पष्ट शिकवली की शाळेची इमारत बंद झाली तरी शिक्षण बंद होता कामा नये. त्या काळात डिजिटल माध्यमाने लाखो विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे काम केले. ऑनलाइन वर्ग, ई-पुस्तके, व्हिडिओ धडे आणि दूरस्थ शिक्षण यांचे महत्त्व तेव्हा प्रकर्षाने जाणवले.

म्हणून आज आपण पुस्तकांकडे वळताना डिजिटल माध्यम विसरून चालणार नाही. उलट, भविष्यातील शिक्षणव्यवस्था दुहेरी सक्षम असली पाहिजे. सामान्य परिस्थितीत पुस्तक, शिक्षक, प्रयोग, संवाद आणि प्रत्यक्ष शाळा; आणि परिस्थितीची गरज निर्माण झाली तर डिजिटल माध्यम, ऑनलाइन वर्ग आणि हायब्रीड शिक्षण. म्हणजेच, शाळा डिजिटल होण्यापेक्षा शिक्षणव्यवस्था लवचिक होणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज आपण मुलांना तंत्रज्ञान देत आहोत. उद्या कृत्रिम बुद्धिमत्ता त्यांच्यासमोर आणखी मोठे जग उघडेल. एका प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी काही सेकंदही लागणार नाहीत. पण त्या उत्तरावर विश्वास ठेवायचा की नाही, त्याचा अर्थ काय, त्याचा उपयोग कुठे करायचा आणि त्यातून स्वतःचा विचार कसा निर्माण करायचा, हे शिकवण्याची जबाबदारी शिक्षक आणि शिक्षणव्यवस्थेचीच राहणार आहे.

माहिती मिळविण्याची क्षमता यंत्रे देऊ शकतील. विवेक देणे मात्र शिक्षणालाच करावे लागेल.

म्हणूनच आज पुस्तकाचे पुनरागमन हे भूतकाळात परतण्याचे लक्षण नाही. ते भविष्यात जाण्यापूर्वी शिक्षणाच्या मुळांकडे पुन्हा पाहण्याची संधी आहे. पुस्तक मुलाला ज्ञानाशी जोडते. लेखन त्याला स्वतःशी जोडते. शिक्षक त्याला प्रश्न विचारायला शिकवतो. अनुभव त्याला जीवन समजावतो आणि तंत्रज्ञान त्याला जगाशी जोडते. या पाचही गोष्टींची सांगड घातली तर शिक्षण केवळ आधुनिक होणार नाही; ते मानवीही राहील.

आपल्याला अशी पिढी नको जी तंत्रज्ञानाशिवाय असहाय्य होईल. आपल्याला अशीही पिढी नको जी तंत्रज्ञानाला घाबरेल. आपल्याला अशी पिढी घडवायची आहे जी तंत्रज्ञान वापरेल, पण त्याची गुलाम होणार नाही; जी इंटरनेटवर माहिती शोधेल, पण पुस्तकात ज्ञान शोधण्याची सवयही जपेल; जी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करेल, पण स्वतःची बुद्धी वापरणे विसरणार नाही.

कारण भविष्यात सर्वात मोठी स्पर्धा उपकरणांमध्ये नसणार आहे. ती मानवी विवेक आणि यांत्रिक वेग यांच्यामध्ये असणार आहे.

त्या स्पर्धेत आपल्या मुलांनी जिंकायचे असेल, तर त्यांच्या हातात फक्त स्मार्ट उपकरणे देऊन चालणार नाही. त्यांच्या हातात पुस्तकही द्यावे लागेल. त्यांच्या मनात प्रश्न निर्माण करावे लागतील. त्यांना शांतपणे विचार करण्यासाठी वेळ द्यावा लागेल आणि गरज पडल्यास जगाशी डिजिटल माध्यमातून जोडण्याची क्षमता देखील द्यावी लागेल.

म्हणून आजची शिक्षणाची दिशा एकाच वाक्यात सांगायची झाली तर ती अशी की तंत्रज्ञानापासून पळायचे नाही आणि तंत्रज्ञानात हरवायचेही नाही; पुस्तक, शिक्षक, अनुभव आणि तंत्रज्ञान यांचा समतोल साधून पुढची पिढी घडवायची आहे.

ही केवळ शिक्षणाची दिशा नाही. ही पुढील पिढीच्या भवितव्याची जबाबदारी आहे.

शालीनता संस्कृतीचा आत्मा हरवत चाललाय का?

ॲड. पूनम जाधव

काल सहज एक व्हिडिओ पाहिला आणि मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. नवरात्रीच्या गरब्याच्या नावाखाली सध्या जे काही प्रकार पाहायला मिळतात, ते पाहून मनात खरोखर खेद निर्माण होतो.

पाठीचा बहुतांश भाग उघडा ठेवणारे ब्लाऊज, केवळ नावापुरता घेतलेला चण्याचोळीचा दुपट्टा, शरीरप्रदर्शनाला प्राधान्य देणारी वस्त्ररचना आणि त्यातून निर्माण होणारे आकर्षण हे सगळं पाहताना एक प्रश्न मनात येतो की, आपण उत्सव साजरे करत आहोत की उत्सवांच्या मूळ उद्देशालाच हळूहळू विसरत चाललो आहोत?

यापूर्वी गरब्यामध्ये वाजणाऱ्या गाण्यांबाबत हा प्रश्न पडायचा. देवीची स्तुती करणारी, भक्तिभाव जागवणारी आणि पारंपरिक संस्कृतीची ओळख करून देणारी सुंदर गाणी बाजूला पडून बॉलीवूडच्या गाण्यांनी गरब्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. परंतु आता प्रश्न केवळ गाण्यांचा राहिलेला नाही. उत्सवाच्या नावाखाली होणारे शरीरप्रदर्शन, अश्लीलतेची वाढती प्रवृत्ती आणि फॅशनच्या नावाखाली सादर होणारे विचित्र प्रकार पाहता, आपण आपल्या परंपरांपासून नेमके किती दूर जात आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

आपण नऊ दिवस ज्या आदिशक्तीची विविध रूपांत आराधना करतो, तीच देवी चंड-मुंड, शुंभ-निशुंभ आणि महिषासुर यांसारख्या असुरांचा संहार करणारी शक्तिस्वरूपा आहे. तिच्या रौद्र रूपामध्ये अन्यायाचा नाश करण्याचे सामर्थ्य आहे, तर तिच्या पूजनीय मूर्तीमध्ये सात्त्विकता, सौंदर्य, शांतता आणि दिव्य तेज यांचे दर्शन घडते.

तिच्या वस्त्रांमधून, अलंकारांमधून आणि मुखावरील प्रसन्न भावांतून तिचे दिव्य सौंदर्य प्रकट होते. ती एकाच वेळी माया आहे, करुणा आहे, शक्ती आहे आणि अन्यायाविरुद्ध उभी ठाकणारी दुर्गाही आहे. तिच्या अनेक हातांतून अनेक जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या स्त्रीशक्तीचे दर्शन घडते.

मग ज्या देवीची आपण शालीनता, सात्त्विकता आणि शक्तीचे प्रतीक म्हणून पूजा करतो, त्या देवीच्या उत्सवाचे स्वरूप ठरवताना आपण तिच्या आराधनेमागील भावनेचा विचार करायला नको का?

शालीनता म्हणजे स्त्रीने नेमके काय परिधान करावे, याचे बंधन घालणे नव्हे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आवडीने कपडे निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतु एखाद्या धार्मिक उत्सवाचे स्वरूप ठरवताना त्या उत्सवामागील श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक मूल्ये यांचाही विचार व्हायला हवा. फॅशन असावी, आनंद असावा, आधुनिकताही असावी; पण या सगळ्यांतून उत्सवाचा मूळ आत्माच हरवून जाऊ नये.

दहीहंडीच्या उत्सवाबाबतही असाच विचार मनात येतो.

लहानपणी दूरदर्शनवर दहीहंडी पाहताना मनात एक वेगळाच आनंद निर्माण व्हायचा. गोविंदांचे थर, त्यांचे कौशल्य, एकमेकांना दिलेली साथ, सामूहिक प्रयत्न आणि श्रीकृष्णाच्या बाललीलांची आठवण करून देणारा दहीकाला या सगळ्यांतून एक सुंदर सांस्कृतिक परंपरा अनुभवायला मिळायची. आज मात्र काही ठिकाणी दहीहंडीच्या मंचावर मनोरंजनाच्या नावाखाली सादर होणारे अश्लील नृत्यप्रकार आणि अनावश्यक दिखावा पाहून प्रश्न पडतो की, आपण श्रीकृष्णाच्या त्या सुंदर बाललीलेचा नेमका कोणता अर्थ पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवत आहोत? दहीहंडी असो किंवा गरबा, हे उत्सव केवळ मनोरंजनाचे साधन नाहीत. ते आपल्या संस्कृतीचे, सामूहिक आनंदाचे, भक्तीचे आणि परंपरेचे वाहक आहेत.

आपली हिंदू संस्कृती किती समृद्ध आहे! प्रत्येक सणामध्ये निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना आहे, ईश्वराविषयी श्रद्धा आहे, कुटुंबाला आणि समाजाला एकत्र आणण्याची शक्ती आहे. आपल्या परंपरांमध्ये सौंदर्य आहे, भक्ती आहे, कलात्मकता आहे आणि जीवन जगण्याचा एक सुंदर दृष्टिकोन आहे.

मात्र जेव्हा या परंपरांचा मूळ उद्देश मागे पडतो आणि त्यांची जागा केवळ प्रसिद्धी, दिखावा, शरीरप्रदर्शन किंवा बाजारूपण घेते, तेव्हा मनाला खरोखर वेदना होतात.

आणि अशा वेळी एक आई म्हणून माझ्या मनात सर्वांत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो.

जेव्हा मी माझ्या मुलीला गरबा दाखवण्यासाठी घेऊन जाते, तेव्हा तिला त्या उत्सवातील आनंद अनुभवायला मिळावा, तिने देवीची आराधना समजून घ्यावी, आपल्या परंपरांबद्दल तिच्या मनात अभिमान निर्माण व्हावा, अशी माझी इच्छा असते. तिला गरबा खेळायला आवडत असेल, तर तिने नक्की खेळावा. तिने आनंद घ्यावा, उत्सव साजरा करावा आणि आपल्या संस्कृतीशी जोडले जावे.

पण त्याच वेळी, तिथे तिला दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा अर्थ तिला कसा समजावून सांगायचा, हा प्रश्नही माझ्यासमोर उभा राहतो.

फॅशन शोच्या नावाखाली सादर होणारी विचित्र, भयावह वेशभूषा, भुतांचे किंवा आत्म्यांचे स्वरूप धारण करून केले जाणारे प्रदर्शन आणि धार्मिक उत्सवाच्या मूळ भावनेशी विसंगत वाटणारे प्रकार पाहिल्यानंतर तिला आपल्या नवरात्रीचे खरे महत्त्व कसे समजावून सांगायचे?

कारण लहान मुले केवळ आपण त्यांना जे सांगतो त्यातूनच शिकत नाहीत; ती आपल्या आजूबाजूला जे पाहतात, त्याचेही सहज अनुकरण करतात. त्यांच्या मनात संस्कारांची पायाभरणी होत असताना आपण त्यांच्यासमोर नेमके कोणते आदर्श ठेवतो, हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

माझा प्रश्न कोणाच्या वैयक्तिक स्वातंत्र्याला विरोध करण्याचा नाही. आधुनिकतेला विरोध करण्याचाही नाही. प्रश्न एवढाच आहे की, आपल्या सणांचे पावित्र्य, त्यामागील श्रद्धा आणि सांस्कृतिक ओळख जपण्याची जबाबदारी आपण विसरत तर नाही ना?

स्त्रीचे सौंदर्य केवळ तिच्या शरीरात नसते. तिच्या विचारांत, कर्तृत्वात, आत्मविश्वासात, संवेदनशीलतेत आणि स्वाभिमानातही तेवढेच सौंदर्य असते. शालीनता ही केवळ वस्त्रांमध्ये नसून ती व्यक्तीच्या वर्तनात, विचारांत आणि इतरांविषयीच्या आदरातही असते.

आपण देवीची पूजा करतो, स्त्रीशक्तीचा गौरव करतो, श्रीकृष्णाच्या लीला उत्साहाने साजऱ्या करतो. मग या उत्सवांतून पुढच्या पिढीपर्यंत भक्ती, एकोपा, सामर्थ्य, संस्कार आणि आपल्या परंपरांबद्दलचा अभिमान पोहोचवण्याचा प्रयत्न का करू नये?


आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणे म्हणजे बदलांना विरोध करणे नव्हे; तर बदल स्वीकारतानाही आपल्या परंपरांमधील चांगुलपणा जपणे होय. उत्सव आधुनिक असावेत, आनंदी असावेत, भव्य असावेत; पण त्यांचा आत्मा हरवलेला नसावा.

कारण सणांचे खरे सौंदर्य त्यांच्या झगमगाटात नसते, तर त्यामागील श्रद्धेत असते. त्यांचे खरे वैभव शरीरप्रदर्शनात नसते, तर संस्कारांच्या जपणुकीत असते. आणि त्यांचा खरा आनंद केवळ संगीताच्या तालात नसतो, तर भक्ती, एकोपा आणि आपल्या संस्कृतीशी जोडल्या गेलेल्या भावनेत असतो. शेवटी एकच प्रश्न स्वतःला विचारावासा वाटतोआपण आपल्या पुढच्या पिढीला केवळ उत्सव साजरे करायला शिकवत आहोत, की त्या उत्सवांमागील संस्कृती समजून घ्यायलाही शिकवत आहोत? कारण परंपरा केवळ साजऱ्या करायच्या नसतात; त्या समजून घ्यायच्या, जपायच्या आणि पुढच्या पिढीपर्यंत योग्य अर्थाने पोहोचवायच्या असतात.

शालीनता ही बंधन नसून एक संस्कार आहे; आणि संस्कृती ही केवळ अभिमानाची गोष्ट नसून जपण्याची जबाबदारी आहे. ●

अनोखा व्यंगचित्रसंग्रह

हसऱ्या रेषा, बोलक्या रेषा



प्रत्येकाला हसायला आणि विनोदाची मजा घेण्यात आनंद वाटतो. मात्र दुसऱ्यांना आपल्या व्यंगचित्रांद्वारे हसविण्याची क्षमता फारच थोड्यांना लाभलेली असते. महाराष्ट्रातील १४ व्यंगचित्रकारांची, त्यांच्या निवडक दहा व्यंगचित्रांसह, त्यांची मनोगते पुस्तकात वाचायला मिळतात. विशेष म्हणजे, मराठीतील आघाडीच्या व्यंगचित्रकारांनी आपली सर्वोत्कृष्ट व्यंगचित्रे स्वतःच निवडली आहेत. पुस्तकाचे समर्पक, रंगीत मुखपृष्ठ निलेश जाधव यांनी साकारले आहे.

वसंत सरवटे यांच्या हास्यनिर्मितीचा प्रवास, सत्तर वर्षांपेक्षा जास्त काळाचा होता. त्यांचे पहिले व्यंगचित्र १९४३ मध्ये प्रकाशित झाले होते. त्यांनी आपल्या व्यंगचित्रनिर्मितीच्या दीर्घ प्रवासामध्ये विविध प्रकार आणि विविध शैली हाताळल्या होत्या. अनेकांच्या सहवासातून त्यांच्या जीवनमूल्यांची, कलेची जाण जोपासली गेली. हास्यचित्रांमध्ये त्याचे प्रतिबिंब दिसते. त्यांच्या व्यंगचित्रांमध्ये मानवी पात्रांबरोबरच, पशुपक्षी, पाळीव, जंगली प्राणी, खुर्च्या, खिडक्या यासारख्या निर्जीव वस्तू, अक्षरे यांचाही समावेश झालेला दिसतो. शि.द. फडणीस यांचे शालेय शिक्षण कोल्हापूरला झाले. त्यांना त्यांच्यातील चित्रकार बालपणीच गवसला. चित्रकलेच्या शिक्षणासाठी मुंबईला जाण्याचे त्यांनी निश्चित केले. १९४९मध्ये जे.जे.म धून कमर्शियल आर्टची पदविका मिळविली. त्यानंतर त्यांना हास्यचित्रे चितारण्याचा छंद लागला. विविध मासिकांत त्यांची चित्रे प्रकाशित होऊ लागली. अनंत अंतरकरांच्या सूचनेनुसार ते पुण्यात स्थायिक झाले. मोहिनी मासिकाच्या १९५२च्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर त्यांचे हास्यचित्र प्रथम प्रकाशित झाले. या बदलाचे मोठ्या प्रमाणात स्वागत झाले. ती प्रथा अजूनही चालू आहे. त्यांना राजकीय व्यंगचित्रे काढण्यात रस वाटला नाही. नुकतीच शि. द. यांनी त्यांच्या जीवनाची १०१ वर्षे पूर्ण केली. मंगेश तेंडुलकरांना व्यंगचित्रकार व्हावे, ही महत्त्वाकांक्षाच नव्हती. मोठे बंधू, विजय यांच्या चित्रकलेच्या पुस्तकांमुळे, मंगेश यांना चित्रकलेची आणि नंतर व्यंगचित्रकलेची आवड निर्माण झाली. मनोहर सप्रे यांच्या मते, कला म्हणजे जीवनानुभव, परिपूर्णतेने सादर करण्याची रीत. चित्रकारितेची एक स्वतंत्र शाखा म्हणून त्यांनी व्यंगचित्रकलेची निवड केली. त्यांनी एकलव्याप्रमाणे व्यंगचित्रकलेची आराधना केली. चंद्रपूरसारख्या दूरवरच्या ठिकाणी स्थायिक झालेल्या त्यांची विविध व्यंगचित्रे विविध ठिकाणी प्रकाशित होऊ लागली. त्यांनी निवडलेल्या विविध व्यंगचित्रांविषयी सविस्तरपणे लिहिले आहे. यशवंत सरदेसाई यांना बालपणापासूनच वाचनाची आवड होती. विविध ठिकाणी प्रकाशित होणारी हास्यचित्रे पाहून त्यांनाही हास्यचित्रकलेची आवड निर्माण झाली. विविध व्यंगचित्रकारांचा यांच्यावर प्रभाव पडला. त्यामधून त्यांची व्यंगचित्रकला कशी विकसित झाली हे त्यांनी सविस्तरपणे मांडले आहे. श्रीनिवास प्रभुदेसाई हे मुंबईकर. बालपणापासूनच त्यांच्या अवतीभवती साहित्यिक वातावरण होते. विविध ठिकाणी त्यांची व्यंगचित्रे प्रकाशित झाली. त्यांच्या व्यंगचित्रांनी, विविध भाषाप्रमाणेच, देशाच्या सीमाही ओलांडून, तेथेही ख्याती प्राप्त केली. ४० वर्षांहून अधिक काळ त्यांचा व्यंगचित्र कलेचा प्रवास सुरू आहे. प्रभाकर वाईरकर तळकोकणातल्या मालवण तालुक्यातील कट्टा गावचे. ते सातवीतून आठवीत गेले तेव्हा, त्यांचे वडील अचानक निवर्तले. घरच्यांच्या पालनपोषणासाठी, मुंबईत येऊन, मिळेल ती नोकरी करावी लागली. चित्रकलेची आवड बालपणापासून होती. पुढे चित्रकलेसंदर्भात छोटीमोठी कामे मिळू लागली.

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

वहिनीने दिलेल्या पैशातून जे.जे.मध्ये जाऊन, त्यांनी कमर्शियल आर्ट डिप्लोमा केला. जॅक डेव्हिस यांच्या व्यंगचित्रांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. नंतरच्या काळात त्यांच्या व्यंगचित्रांमुळे त्यांना विविध नियतकालिकांमध्ये, दैनिकांमध्ये व्यंगचित्रे काढण्याची संधी मिळाली. १९९२ पासून त्यांनी 'ऑन द स्पॉट कॅरिकेचर'चे प्रयोग करण्यास सुरुवात केली. व्यंगचित्रकारितेमुळे देश-विदेशांमध्ये त्यांना विविध मानसन्मान प्राप्त झाले. विकास सबनीस यांचे मुंबईतील जे.जे.मधून कलाशाखेचे पद्धतशीर शिक्षण झाले. व्यावसायिक व्यंगचित्रकार होण्याचे, विद्यार्थी असतानाच ठरवले होते. १९६८ मध्ये त्यांची दोन व्यंगचित्रे मार्मिकमध्ये, एकाच अंकात प्रकाशित झाली. बाळासाहेबांचा त्यांच्या व्यंगचित्रकलेवर प्रभाव होता. दीर्घकाळ व्यंगचित्रे विविध ठिकाणी रेखाटल्यानंतर, १९९०मध्ये त्यांनी ''गोष्टी व्यंगचित्रकारांच्या'' हा एकपात्री कार्यक्रम सादर करण्यास सुरुवात केली. त्यामुळे देश-विदेशात जाण्याची संधी मिळाली. ५० वर्षांच्या व्यंगचित्रकलेमुळे त्यांना अतीव समाधान लाभले. पुण्यात राहणाऱ्या विजय पराडकर यांच्या घरामध्ये काव्यशास्त्रविनोदाचे प्रसन्न आणि खेळकर वातावरण होते. चित्रकलेची आवड असूनही, जे.जे.मध्ये प्रवेश मिळाला नाही. परिणामी पदव्युत्तर शिक्षणानंतर त्यांनी नोकरी पत्करली. मात्र व्यंगचित्रकलेची आवड टिकून राहिली. नंतर ते व्यंगचित्रकार कसे झाले, याविषयी सविस्तर लिहिले आहे. सुरेश सावंत यांनी आपल्या व्यंगचित्रकलेची प्रगती कशी झाली, हे सविस्तरपणे लिहिले आहे. सुरुवातीला बाळ ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले. व्यंगचित्रकलेमुळे त्यांना विविध देशविदेशांत जाण्याची संधी मिळाली. विविध सन्मानही प्राप्त झाले. वयाची पंच्याहत्तरी होऊनही, कलेच्या निर्मितीतील त्यांचा उत्साह टिकून आहे. प्रशांत कुलकर्णी १९८३ साली, नोकरीच्या निमित्ताने मुंबईत आले. त्यांच्या मनात व्यंगचित्रकलेविषयी प्रेम होते. फावल्या वेळात विविध व्यंगचित्रे त्यांनी आपल्या नोटबुकमध्ये रेखाटली होती. 'आवाज' या दिवाळी अंकामध्ये त्यांची सुरुवातीची व्यंगचित्रे प्रकाशित झाली. दिवाळी अंकांसाठी व्यंगचित्रे काढणे ही मोठी परंपरा आहे. विशिष्ट विषय मनात ठेवून, व्यंगचित्रे सवडीने काढता येतात. यादृष्टीने ज्येष्ठ व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांच्या कारकिर्दीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. वैजनाथ दुलंगे हे मूळचे चित्रकार. परंतु व्यंगचित्रांचे महत्त्व लक्षात घेऊन ते दीर्घकाळ व्यंगचित्रकलेत रमले. व्यंगचित्रकार एकाचवेळी कथा, पटकथा, लेखक, संवादलेखक, मेकअप आर्टिस्ट, अभिनेता इ. विविध भूमिका बजावत असतो. त्यामुळेच व्यंगचित्र उत्तम होते. व्यंगचित्रांच्या विविध प्रकारांची चर्चाही वैजनाथ यांनी केली आहे. एक पेन्सिल, एक पेन व काही कागद एवढ्या साहित्यावर व्यंगचित्रकलेचा संसार उभा राहतो, पण त्यासाठी व्यंगचित्रकाराची भक्कम वैचारिक बैठक असावी लागते. अभिमन्यू कुलकर्णी यांची १९८० पासून व्यंगचित्रे येऊ लागली. वसंत सरवटे यांच्या सुयोग्य मार्गदर्शनानंतर त्यांची व्यंगचित्रकला बहरली. सामाजिक व्यंगचित्रांचा उद्देश मानवी जीवनातील विसंगती दाखवणे हा असतो. लहान मुले, अंडरवर्ल्ड हे त्यांचे आवडीचे विषय. या विषयांवर त्यांनी विविध नियतकालिकांत व्यंगचित्रे काढली. अनिल डांगे यांची चित्रकला, त्यांच्या बालपणापासूनच बहरत गेली. घरातील अनुकूल वातावरणामुळे प्रोत्साहन मिळाले. वाचनामुळे त्यांच्या जाणिवा समृद्ध झाल्या. वृत्तपत्र व्यवसायातील विविध जबाबदाऱ्या पार पाडताना, ते व्यंगचित्रकलेकडे वळले. त्यांनी व्यंगचित्रकला किती प्रभावी असते, याची विविध उदाहरणे दिली आहेत.

चौदा निवडक व्यंगचित्रकारांच्या मनोगतांसह, त्यांची निवडक व्यंगचित्रे वाचकाला मनमुराद हसवतात आणि अंतर्मुखही करतात. हेच या पुस्तकाचे महत्त्व आणि यश आहे. यामुळेच हे पुस्तक, वारंवार वाचण्यासाठी आणि पाहण्यासाठी संग्राह्य ठरले आहे. ●

पुस्तकाचे नाव : हसऱ्या रेषा, बोलक्या रेषा
संकल्पना संयोजन : युनिक फिचर्स
प्रकाशक : समकालीन प्रकाशन, पुणे-३०
पहिली आवृत्ती : मे २०१९
पृष्ठे : ९५, किंमत रू. २००/-

भन्नाट प्रश्न, वैज्ञानिक उत्तरे

गालावर खळी का पडते?



विद्यालंकार घारपूरे

त्या दिवशी सचिन आणि मनिषा 'ज्ञानदीप'मध्ये आले, तेव्हा सचिन जरा जास्तच हसत होता.

''काय रे, आज एवढा खुशीत का?'' समाधानकाकांनी विचारलं.

''काका, तुम्हाला काही दिसतंय का माझ्या चेहऱ्यावर?''

काकांनी त्याच्याकडे निरखून पाहिलं. ''नाक आहे, दोन डोळे आहेत, दोन कान आहेत... सगळं जागच्या जागी दिसतंय!''

मनिषा हसली. ''अहो काका, तो त्याच्या गालावरची खळी दाखवतोय!''

सचिनने विचारलं, ''माझा प्रश्न हाच आहे. मी हसलो की खळी पडते; पण मनिषा हसली तर तिच्या गालावर खळी पडत नाही. असं का?''

''काहींच्या दोन्ही गालांवर पडते, काहींच्या एका गालावर. काहींच्या हनुवटीवरसुद्धा खळी असते,'' मनिषाने भर घातली.

उत्तराकाकींनी कपाटातून दोन आरसे काढले. दोघांना आरसे देऊन म्हणाल्या, ''आज आधी प्रयोग! आरशात पाहा आणि हळूहळू हसा.''

दोघे हसू लागले.

''ओठांचा कोपरा वर आणि बाजूला जातोय,'' सचिन म्हणाला.

''गालसुद्धा वर सरकतोय,'' मनिषा म्हणाली.

''आता गालावर बोटं हलकी ठेवा आणि पुन्हा हसा.''

''अरे! आत काहीतरी हलतंय!''

''ते तुमच्या चेहऱ्याचे स्नायू हलत आहेत. आपण हसतो तेव्हा त्वचेखालील अनेक स्नायू एकत्र काम करतात. विशेषतः नावाचा स्नायू ओठांचा कोपरा वर आणि बाजूला ओढण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.''

''झायगो... पुढचं तुम्हीच म्हणा!'' सचिन म्हणाला.

''काही लोकांमध्ये या स्नायूची रचना थोडी वेगळी असू शकते. तो दोन भागांत किंवा स्नायूंच्या पुंजक्यांत विभागलेला आढळू शकतो. त्या भागाची त्वचेशी असलेली जोडणी हसताना त्वचा आत खेचते. त्यामुळे छोटी खोलगट जागा दिसते. ती म्हणजे गालावरची खळी.'' काकी म्हणाल्या.

''म्हणजे माझ्या गालाची बांधणी मनिषाच्या गालापेक्षा वेगळी आहे?'' सचिनने विचारलं.

''थोडीशी. प्रत्येकाच्या चेहऱ्याची मूलभूत रचना साधारण सारखी असली, तरी स्नायू, त्वचा, चरबी आणि त्यांची जोडणी तंतोतंत सारखी नसते.'' काकींनी उत्तर दिलं.

''पण माझ्या एकाच गालावर खळी का?'' सचिनचा पुन्हा प्रश्न.

''आपलं शरीर पूर्णपणे सममित नसतं. दोन्ही डोळे, भुवया किंवा चेहऱ्याच्या दोन्ही बाजू पाहा. सूक्ष्म फरक दिसतील. त्याचप्रमाणे स्नायूंच्या रचनेत आणि त्वचेशी असलेल्या जोडणीत फरक असू शकतो.'' काकी म्हणाल्या.

मनिषाने आरशात पाहिलं व म्हणाली, ''खरंच! माझ्या दोन्ही भुवयासुद्धा अगदी सारख्या नाहीत.''

''खळी आनुवंशिक असते ना?'' तिने विचारलं.

''कुटुंबांमध्ये खळी वारंवार दिसू शकते. त्यामुळे आनुवंशिक घटकांचा वाटा असण्याची शक्यता आहे. 'खळी एका मुळे पडते' असं ठामपणे सांगितलं जातं. प्रत्यक्षात तिच्यामागची आनुवंशिक प्रक्रिया इतकी साधी आणि पूर्णपणे स्पष्ट झालेली नाही.'' काकी म्हणाल्या.

''म्हणजे आईला खळी आहे म्हणून मुलाला असणारच असं नाही?''

''बरोबर. आई-वडिलांना नसली तरी मुलाला असू शकते.'' काकांनी विचारलं, ''पण हनुवटीवरची खळी?''

''दिसायला दोन्ही 'खळ्या' असल्या, तरी त्यांची कारणं एकसारखी नाहीत. हनुवटीचा आकार खालच्या जबड्याच्या हाडाची वाढ, त्या भागातील स्नायू आणि मऊ ऊती यांच्या रचनेशी संबंधित असतो. काही व्यक्तींमध्ये हनुवटीच्या मध्यभागी खोलगटपणा दिसतो. त्याला म्हणतात.'' काकी म्हणाल्या.

''म्हणजे गालावरची खळी हसल्यावर जास्त दिसते; पण हनुवटीवरची खळी चेहऱ्याच्या रचनेचाच भाग असते हे आता समजलं.'' मनिषा म्हणाली.

सचिन आरशात पाहत म्हणाला, ''पण खळी पडली की माणूस छान दिसतो, असं सगळे म्हणतात.''

''आता कळलं!'' मनिषा म्हणाली. ''हा स्वतःला खळीमुळे देखणा समजतो!''

''मी नाही म्हणत. लोक म्हणतात!''

काकी म्हणाल्या, ''लोकांना खळ्या आकर्षक वाटू शकतात. अनेक संस्कृतींमध्ये त्या गोंडसपणा किंवा सौंदर्याशी जोडल्या जातात.''

''म्हणजे खळी असलेले लोक जास्त सुंदर?'' सचिनने विचारलं.

''थांब जरा! लगेच हरबऱ्याच्या झाडावर चढू नकोस!'' मनिषा म्हणाली.

''खळी असणं हा शरीररचनेचा गुणधर्म आहे. पण 'खळी असलेला चेहरा अधिक सुंदर' हा वैज्ञानिक नियम नाही. सौंदर्याच्या जाणिवेवर संस्कृती, काळ, समाज, अनुभव आणि व्यक्तिगत आवड यांचाही प्रभाव असतो.'' काकांनी सांगितलं.

''म्हणजे खळी हे सौंदर्याचं प्रमाणपत्र नाही! कळलं?'' मनिषा म्हणाली.

''आणि खळी नसणं म्हणजे सौंदर्यात काही कमी असणंही नाही,'' काकी म्हणाल्या.

''मग माझ्या खळीचा काही उपयोगच नाही?'' सचिनने विचारलं.

''असं कोणी म्हटलं? हसताना तुला खळी पडते तेव्हा तू छानच दिसतोस!'' काका म्हणाले.

''हां! मग ठीक आहे.'' सचिन म्हणाला.

''काकी, लहान मुलांच्या गालावर खळ्या जास्त दिसतात असं मला वाटतं.'' मनिषा म्हणाली.

''वयाबरोबर चेहऱ्यावरील चरबीचं प्रमाण आणि वितरण, त्वचेची जाडी आणि लवचिकता बदलतात. त्यामुळे काहींची लहानपणी ठळक दिसणारी खळी मोठेपणी कमी होऊ शकते. काहींची मात्र आयुष्यभर दिसते.'' काकी म्हणाल्या.

''म्हणजे खळी मानवी शरीररचनेतील नैसर्गिक विविधतेचं एक उदाहरण आहे.'' मनिषा समजल्याच्या सुरात म्हणाली.

सचिन पुन्हा आरशात पाहून मोठ्याने हसला.

''आता काय पाहतोयस?'' मनिषाने विचारलं.

''माझ्या चेहऱ्यावरची नैसर्गिक विविधता!''

''अरे वा! पाच मिनिटांपूर्वी ती 'सुंदर खळी' होती!'' काका म्हणाले.

मनिषा सचिनकडे पाहून म्हणाली, ''सचिन, तू हस रे. तू हसताना तुझ्या गालावर पडणारी खळी खरंच छान दिसते!''

''बघा! मी मगापासून तेच तर सांगतोय!'' सचिन लगेच म्हणाला.

आणि 'ज्ञानदीप'मध्ये पुन्हा एकदा हशा पिकला! ●

उत्सव नवरात्रीचा

राजाराम भगत

गौरीगणपती नंतर वेध लागतात ते नवरात्र उत्सवाचे भारतीय सण. उत्सवांना सांस्कृतिक वारसा आहे. केवळ आनंद मिळविणे एवढाच हेतू नसून आहार-विहार, आरोग्य विज्ञान याचे प्रतिबिंब त्यात दिसते. सणांचे खरे स्वरूप त्याचा अर्थ एकोपा, बंधूप्रेम, विचारांची आदानप्रदान, सर्व जाती धर्मांना, सर्वसामान्यांना सहभागी करून घेण्यात सण उत्सवांचे महत्व आहे. हिंदू धर्माची सण-उत्सव व्रतवैकल्य ही त्याची प्रमुख अंगे आहेत. नऊच्या नऊ दिवस-रात्र अखंड दीप तेवत ठेवून देवीची पूजा करून तिच्यापासून शक्ती प्राप्त करण्याचे दिवस म्हणजे नवरात्र. घरात सौख्य लाभावे, सर्वत्र आनंदी आनंद पसरावा, सर्वांच्या स्वास्थ्याकरीता, संस्कृतीची जपवणूक होऊन सर्वांचा विकास व्हावा हा हेतू सण उत्सव साजरे करण्यात आहे. प्रत्येक सण हा वर्षातून एकदाच येत असल्याने सर्वांना त्याची उत्सुकताही तेवढीच असते. नवरात्र हा उत्सव घरात तसेच सार्वजनिक स्वरूपात साजरा होतो.

'सर्व मंगल मांगल्ये, शिवे सर्वार्थ साधिके । शरण्य त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।' प्राणीमात्रांची रक्षण करणारी, भक्तांची मनोकामना पूर्ण करणारी, शरणागतांना आश्रय देणारी गौरवर्णी देवी नारायणी आम्ही नमस्कार करतो. हिचे स्तवन म्हणजेच नवरात्रीतील देवीची आराधना होय. दुर्गा पूजा म्हणजे स्त्री शक्तीची पूजा, ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांनी अमंगलाच्या विनाशासाठी आपल्या तेजातून साकारलेले स्त्री रूप म्हणजे दुर्गादेवी. या दिवसात मोठ्या श्रद्धेने देवीचे पूजन केले जाते. दिवसरात्री आरती केली जाते. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना होते. वाघावर आरूढ झालेली, हातात तलवार, खड्ग आदी शस्त्रे धारण केलेली देवीची मूर्ती सिंहासनावर विराजमान करून नवरात्रीत नऊ दिवस नऊ रात्री देवीची भक्तीभावे उपासना केली जाते. या कालावधीत नऊ दिवस उपवास करतात. अष्टमीच्या उपवासात अधिक महत्व असते. स्त्रीया या दिवशी कुलदेवतेची उपासना करतात. देवीची ओटी भरतात.

आपल्या पुराणातील कथा सांगते देवकुलातील सर्व देव संकटात सापडले. आसुरांचा बिमोड करण्याचे त्यांचे सर्व प्रयत्न संपल्यानंतर त्यांनी आदिशक्तीकडे धाव घेतली. महिषासूर नावाच्या राक्षसाने दहा वर्षे तपश्चर्या करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले आणि त्यांच्याकडून अमरत्वाचा वर मागितला. तुला अमर होता येणार नाही असे ब्रह्मदेवाने सांगितल्यानंतर मला 'स्त्री'च्या हातून मरण येऊ दे असे महिषासुराने मागणे मागितले. ब्रह्मदेवाने तात्काळ 'तथास्तु' म्हटले. महिषासुराने आपल्या प्रचंड शक्तीचा दुरूपयोग राक्षस निर्माण करण्यात वापरला. राक्षसांच्या दुष्ट प्रवृत्तीमुळे सर्वत्र अराजकता माजली. देव मानवांना त्यांनी त्राही त्राही करून सोडले. महिषासुराला स्त्रीच्या हातून मरण येणार असल्याकारणाने सर्व देवतांनी पार्वतीमातेची आराधना केली. पार्वतीमातेने दुर्गेचे उग्र रूप धारण केले. सिंहावर आरूढ होऊन दुर्गेने गर्जना करताच तिच्याभोवती असंख्य स्त्री-सैन्य जमा झाले. या स्त्रीसैन्यांमार्फत दुर्गेने महिषासुराशी वेगवेगळे अवतार घेऊन नऊ दिवस शुद्ध केले आणि दहाव्या दिवशी त्याचा वध करून विजय मिळविला. म्हणून तिला महिषासुरमर्दिनी हे नाव पडले. या देवतेला भवानी, चंडिका, अंबा, जगदंबा, महालक्ष्मी या विविध नावाने ओळखतात.

आदिशक्तीच्या शक्तीचे महत्व सर्वांनीच मान्य केले आहे. स्वतः प्रभू रामचंद्रानी दुर्गादेवीचे पूजन करून तिचा आशीर्वाद घेतला. आणि नंतर रावणाचा वध केला. सद्गुणाने दुर्गुणावर विजय मिळविण्याचे हे एक प्रतिक आहे. नवरात्रीची सांगता झाल्यावर दसऱ्याच्या दिवशी रावणाचे दहन केले जाते त्याचे कारण हेच आहे.

नवरात्रीत पहिल्या दिवशी शैलपुत्री देवीच्या रूपाची पूजा केली जाते. दुसऱ्या दिवशी 'ब्रह्मचारिणी' म्हणजे ब्रह्मपद देणारी तिसऱ्या दिवशी 'चंद्रघंटा' म्हणजे नावाप्रमाणे शांतचित्त, आत्मबळ प्रदान करणारी चौथ्या दिवशी 'कुष्मांडा' म्हणजे सर्व प्रकारच्या पीडापासून रक्षण करणारी. पाचव्या दिवशी 'स्कंदमाता' म्हणजे यशस्विनी, सहाव्या दिवशी 'कात्यायनी' म्हणजे संहारक, आठव्या दिवशी 'महागौरी' म्हणजे नवयौवना आणि नवव्या दिवशी 'सिद्धीदात्री' म्हणजे सकल मनोरथ पूर्ण करणारी म्हणून दुर्गेची पूजा केली जाते.

मानवी देहात नऊ दारे आहेत. एक तोंड, दोन कान, दोन नाकपुड्या, मुत्रेंद्रिय आणि गुदद्

भारतीय संघाचा पहिल्या सामन्यात विजय

झिम्बॉब्वेने भारताला आरसा दाखवला; निकी व दिप्तीने लाज राखली

। रायपूर । वृत्तसंस्था ।

रायपूरच्या वीर शहिद नारायण सिंग इंटरनॅशनल स्टेडियम येथे पार पडलेल्या तीन सामनांच्या मालिकेतील पहिल्या अटीतटीच्या सामन्यात भारतीय महिला संघाने सुरुवातीच्या धक्क्यातून सावरत येथे झिम्बॉब्वेचा ४ विकेट्सने पराभव केला.

टॉस गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीचे आमंत्रण मिळाल्यानंतर केलीस एनधलोवू (४२) व शेरेन मेयर्स (नाबाद ४३) यांच्या दमदार खेळीच्या जोरावर झिम्बॉब्वेने भारतासमोर ५ बाद ११५ धावांचे आव्हान दिले होते. या धावांचा पाठलाग करताना भारताला प्लेऑफमध्येच ४ महत्त्वाचे धक्के बसले. एकप्रकारे भारताला अतिआत्मविश्वाचा सुरुवातीला तोटा सहन करावा लागला. दरम्यान, दीप्ती शर्मा व निकी प्रसादने सावरून खेळत भारताला कसा बसा विजय मिळवून दिला.



क्षेत्ररक्षणात सुधारणेची गरज

भारताला रायपूरच्या स्टेडियममध्येच मालिकेत सर्व टी-२० सामने खेळायचे आहेत. येथे भारतीय महिला संघ पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय सामना खेळत असल्याने त्यांना पहिल्या सामन्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. टॉस जिंकून स्मृती मंधानाने क्षेत्ररक्षण घेतले खरे, पण झिम्बॉब्वेने संपूर्ण २० ओव्हर्स खेळून काढत भारतीय गोलंदाजांवर दबाव निर्माण केला.

यावेळी भाराताचे क्षेत्ररक्षणही खराब असे पाहण्यास मिळाले. त्याचा केलीस व मेयर्सने पुरेपूर फायदा घेतला. झिम्बॉब्वेचा पहिला विकेट पहिल्याच ओव्हरमध्ये पडला, पण दुसऱ्या विकेटसाठी भाराताला १० व्या ओव्हर्सची वाट पहावी लागली. या काळात केलीस व मॉडेस्टर मुपाचिका (१६) यांनी दुसऱ्या विकेटसाठी ५३ धावांची भागीदारी रचली. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर आलेल्या मेयर्सने केलीसला चांगली साथ देत धावगती वाढवण्याचा प्रयत्न केला, मात्र अरुंधती रेड्डीने केलीसला त्रिफळाचीत करत ही जोडी फोडली. केलीसने ६ चौकारांच्या मदतीने ४२ धावा केल्या.

दुसरीकडे, झिम्बॉब्वेची मधली फळी मेयर्सला साथ देऊ शकली नाही.मेयर्सने मात्र खराब चेंडू सिमारेषेबाहेर पाठवण्याची आपली कामगिरी कायम राखली होती. अखेरच्या चेंडूपर्यंत आपला विकेट टिकून ठेवत तिने ४ चौकार व २ षटकारच्या मदतीने नाबाद ४३ धावा केल्या. भारताच्या वतीने नंदिनी शर्माने ११ धावा देत २ विकेट घेतल्या.

फलंदाजांना अतिआत्मविश्वास नडला

झिम्बॉब्वेच्या तुल्यबळ ११५ धावांकडे पाहता, या काय झटपट करून ड्रेसिंग रुममध्ये जाऊ, हा अतिआत्मविश्वास भारताच्या पहिल्या फळीतील फलंदाजांना नडला. दस्तुरखुद्द संघाची नवी कर्णधार स्मृती मंधाना (२ चौकार, ९ धावा) दुसऱ्याच षटकात झिम्बॉब्वेच्या गोलंदाजाच्या गळाला लागली. हेही नसे थोडुके की, काय याच षटकात तिसऱ्या क्रमांकावर आलेली अनुष्का शर्मा (१ चौकार, ४ धावा)ही सोप्पा झेल देत माघारी फिरली.दुसऱ्याच षटकात नायसा ग्वांझुराने भारताच्या पहिल्या फळीतील महत्त्वाचे हिरे टिपले होते. त्यानंतर माजी कर्णधार हरमनप्रीत कौर एकप्रकारे खेळपट्टीच्या पाया पडायला आल्यागत फक्त १ धावा करून मिशेल मावुंगाच्या गोलंदाजीवर झेलबाद झाली.आता सर्वांच्या आशा आयसीसीच्या प्लेअर ऑफ द मंथ असलेल्या शेफाली वर्मा (४)वर टिकून होत्या. नायसाने आपल्याच गोलंदाजीवर तिचा सुंदर झेल टिपत, डावातील आपला तिसरा विकेट मिळवला. अशाप्रकारे भारताच्या स्कोर बोर्डची अवस्था ही ४ बाद १९ धावा अशी झाली.

संयमी खेळीने संघाला सावरले

पहिल्या फळीतील महत्त्वाचे फलंदाज बाद झाल्यानंतर आपसुकच त्याचा दबाव हा मधल्या फळीवर आला. तरी देखील निकी प्रसाद व अष्टपैलू दीप्ति शर्माने ८२ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. एवढच नाही, तर दीप्तिने ८ चौकारांच्या मदतीने ४९ धावा केल्या. तर निकीने ६ चौकारांसह नाबाद ३९ धावा करत दीप्तिला चांगली साथ दिली. दरम्यान, या सामन्यातील झिम्बॉब्वेच्या गोलंदाजीचे कौतुकच करावे लागेल.

निवडक

शिवछत्रपती राज्य पुरस्कारांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

रायगड : महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या वर्षांसाठी प्रतिष्ठेच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडू व व्यक्तींनी १५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटे ५९ सेकंदांपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन क्रीडा विभागामार्फत करण्यात आले आहे. राज्यातील उत्कृष्ट खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यामध्ये क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींसाठी जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, तसेच खेळाडू, दिव्यांग खेळाडू आणि साहसी उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांसाठीच्या पुरस्कारांचा समावेश आहे.शासनाच्या २९ डिसेंबर २०२३ आणि २५ जानेवारी २०२४ रोजीच्या निर्णयांनुसार निश्चित करण्यात आलेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारित नियमावली, २०२३ नुसार ही अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पुरस्कारासाठी इच्छुकांनी https://sports.maharashtra.gov.in या क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत. निर्धारित मुदतीनंतर अर्ज स्वीकारले जाणार नसल्याने पात्र इच्छुकांनी अंतिम मुदतीपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.

वेगवान गोलंदाज ब्रॅड व्हीलची क्रिकेटमधून निवृत्ती

स्कॉटलंड : चार टी-२० विश्वचषकांमध्ये सहभागी झालेल्या स्कॉटलंडचा वेगवान गोलंदाज ब्रॅड व्हीलने वयाच्या ३० व्या वर्षी निवृत्ती जाहीर केली आहे. शुक्रवारी त्याने व्यावसायिक क्रिकेटला रामराम ठोकला. आफ्रिकेत जन्मलेल्या या ३० वर्षीय खेळाडूने २०१६ मध्ये हाँगकाँगविरुद्ध स्कॉटलंडकडून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. तो स्कॉटलंडसाठी एकदिवसीय आणि टी-२० या दोन्ही प्रकारात खेळला. त्याला संघात संधी मिळत राहिली.भारतात होणाऱ्या २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठीच्या स्कॉटलंडच्या संघातही त्याचा समावेश होता. त्याने आपला शेवटचा सामना टी-२० विश्वचषकात खेळला. वारंवार होणाऱ्या दुखापतींमुळे ब्रॅडने वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी आपली कारकीर्द संपवण्याचा निर्णय घेतला. तो म्हणाला की, हॅम्पशायरमधील माझा काळ आणि एक व्यावसायिक क्रिकेटपटू म्हणून स्कॉटलंडचे प्रतिनिधित्व करणे मला खूप आवडले. पण दुर्दैवाने वारंवार होणाऱ्या दुखापतींमुळे मला क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. ब्रॅड व्हीलने पुढे सांगितले की, हा माझ्या कारकिर्दीचा एक मोठा भाग होता आणि मी त्या आठवणी नेहमीच चांगल्या प्रकारे जपून ठेवीन. मी निश्चितपणे मुलांवर बारकाईने लक्ष ठेवून असेन आणि त्यांना दुरूनच पाठिंबा देत राहीन. ब्रॅड व्हीलने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १८ एकदिवसीय आणि २६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

वासिम जाफरचा निवड समिती सदस्यासाठी अर्ज दाखल

मुंबई : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अजित आगरकर यांच्याशी करार न करण्याचा निर्णय घेतल्यामुळे रिक्त झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय निवडकर्त्यांच्या पदासाठी भारताचा माजी सलामीवीर वासिम जाफर याने अर्ज केला आहे. या पदासाठी आपण अर्ज केल्याची पुष्टी जाफरने शुक्रवारी दिली. जाफरने भारताकडून ३१ कसोटी सामने खेळले असून, त्यात पाच शतकांच्या मदतीने जवळपास दोन हजार धावा केल्या आहेत. त्याच्या कसोटी शतकांमध्ये वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या शतकांचा तसेच कोलकाता येथे पाकिस्तानविरुद्ध झळकावलेल्या द्विशतकाचा समावेश आहे. अशोक मल्होत्रा आणि जतिन परांजपे यांचा समावेश असलेली क्रिकेट सल्लागार समिती या अर्जांची निवड करणार असून, निवड समितीच्या अध्यक्षपदासाठी विचारल्या जात असलेल्या उमेदवारांमध्ये जाफर याच्या नावावर सर्वाधिक कसोटी सामने खेळल्याचा विक्रम आहे. प्रग्यान ओझा याने २४ कसोटी सामने खेळले असून, त्याच्या तुलनेत जाफर याचा कसोटी क्रिकेटमधील खेळण्याचा रेकॉर्ड सरस आहे. विद्यमान निवड प्रक्रियेनुसार, सर्वाधिक कसोटी सामने खेळलेल्या विभागातील सदस्य समितीचे अध्यक्ष होण्यासाठी पात्र ठरतो. जाफरने रणजी स्पर्धेत मुंबई, विदर्भाकडून नावलौकिक मिळवला आहे. मात्र, बीसीसीआयमध्ये प्रग्यान ओझालाच अध्यक्षपदी कायम ठेवण्याबाबत जोरदार पाठिंबा असल्याचे समजते, ज्यामुळे नवीन निवड समितीच्या रचनेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत, दोन कसोटी सामने खेळलेला भारताचा माजी फिरकीपटू रमेश पोवारदेखील पश्चिम विभागातून या समितीतील जागेसाठी शर्यतीत असू शकतात.



न्यूझीलंड दौऱ्यासाठी कर्णधार शुभमन गिलचा मास्टरप्लॅन

मुंबई : न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे आणि कसोटी मालिकेसाठी नुकतेच शुक्रवारी राष्ट्रीय निवड समितीने भारतीय संघाची घोषणा केली आहे. या दोन्ही मालिका महत्त्वाच्या आहेत. वनडे मालिकेतून सध्या भारतीय संघ आगामी २०२७ वर्ल्ड कपसाठी तयारी करत आहे, तर कसोटी मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२५-२७ (२०२५-२७) स्पर्धेचा भाग आहे. भारताला २०२५-२७ च्या अंतिम सामन्याच्या शर्यतीत राहायचे असेल, तर ही मालिका अत्यंत महत्त्वाची आहे. अशात आता भारताचा वनडे आणि कसोटी कर्णधार शुभमन गिलला याची गंभीरता लक्षात आली असून तो या दौऱ्यासातील सामन्यांसाठी खास तयारी करणार आहे. गिल ५ सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिले तीन सामने खेळणार आहे, त्यानंतरचे दोन सामने तो कसोटी मालिकेच्या तयारीमुळे खेळणार नाही. दरम्यान, गिल या दौऱ्यासाठी चक्क ५ नेट गोलंदाजांना स्वत:च्या खर्चाने घेऊन जाणार आहे.खरंतर परदेशी दौऱ्यांवेळी भारतीय संघांच्या सरावासाठी बीसीसीआय नेट गोलंदाजांची व्यवस्था करते. परंतु, एखाद्या भारतीय खेळाडूने स्वत:च्या खर्चाने आपल्या स्वत:च्या सरावासाठी वेगळे नेट गोलंदाज परदेशी दौऱ्यांवर नेण्याची ही पहिलीच घटना असल्याचे मानले जात आहे.

पुण्यात फुटबॉलचा थरार!

। पुणे । प्रतिनिधी ।

यजमान लॉयला हायस्कूल आणि जे. एन. पेटिट टेक्निकल स्कूल यांनी गुरुवारी उपांत्य फेरीत प्रतिस्पर्ध्यांवर वेगवेगळ्या पद्धतीने विजय मिळवत लॉयला फुटबॉल कप २०२६ स्पर्धेच्या १६ वर्षांखालील गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. हे सामने पाषाण येथील लॉयला हायस्कूल मैदानावर खेळविण्यात आले.

लॉयला स्कूल आणि एक्स-लॉयला अल्युमनी नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेला टाटा ऑटोकॉमचे प्रायोजकत्व लाभले आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात लॉयला हायस्कूलने दोन्ही सत्रांत प्रत्येकी एक गोल नोंदवत विद्या भवन हायस्कूलवर २-० असा सहज विजय मिळवला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात युग चौहानने अखेरच्या टप्प्यात



केलेल्या निर्णायक गोलच्या जोरावर जे. एन. पेटिट टेक्निकल स्कूलने बिशप्स को-एड स्कूल, उंड्री संघाचा १-० असा निसटता पराभव केला.

लॉयलाकडून मल्हार चव्हाणने आठव्या मिनिटाला गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आरव अहिवळेने ४३व्या मिनिटाला दुसरा गोल नोंदवत यजमानांचा अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित केला.दुसरी उपांत्य लढत अत्यंत चुरशीची झाली. जे. एन. पेटिट आणि बिशप्स को-एड उंड्री यांच्यातील सामना बराच काळ गोलशून्य बरोबरीत होता. मात्र, ५७व्या मिनिटाला युग चौहानने केलेला गोल निर्णायक ठरला. लॉयला संघाने यापूर्वीच १४ वर्षांखालील गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला असून, त्या गटात त्यांची सेंट व्हिन्सेंट्स हायस्कूलशी लढत होणार आहे. त्यामुळे लॉयलाला दुहेरी विजेतेपद पटकावण्याची संधी मिळाली आहे.

सेंट व्हिन्सेंट्स हायस्कूलची विद्या व्हॅलीवर मात

दरम्यान, मंगळवारी झालेल्या १२ वर्षांखालील गटाच्या उपांत्य फेरीत एकांश ओझाच्या शानदार हॅट्ट्रिकच्या जोरावर विद्या व्हॅलीने बिशप्स को-एड स्कूल, उंड्री संघाचा ५-१ असा धुव्वा उडवला. ओझाने सातव्या, २०व्या आणि २४व्या मिनिटाला गोल केले. अहान बैस आणि रियान जेधे यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला.

पुण्यात स्पोर्ट्सफिल्ड मान्सून लीगचा थरार

अवधुत विभुते क्रिकेट अॅकॅडमीचा शानदार विजय

। पुणे । प्रतिनिधी ।

स्पोर्ट्सफिल्ड मॅनेजमेंटतर्फे आयोजित पाचव्या स्पोर्ट्सफिल्ड मान्सुन लीग अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत शिवेश वेदासेन आणि संकर्षण खांडेकर यांनी केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर अवधुत विभुते क्रिकेट अॅकॅडमीने इकोल स्पोर्ट्स फाऊंडेशन संघाचा ९ गडी राखून सहज पराभव करत विजेतेपदाला गवसणी घातली.

टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर झालेल्या या अंतिम सामन्यात इकोल स्पोर्ट्स फाऊंडेशन संघाने नाणेफेकजिंकूनपहिल्यांदाफलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. परंतु इकोल संघाचा डाव उभा राहीला नाही. जेनिसेस शिरोडकर हिच्या व्यतिरिक्त कोणताही फलंदाज दुहेरी धावसंख्या गाठू शकला



नाही. इकोल संघाचा डाव १९.३ षटकात ४३ धावांवर गडगडला. संकर्षण खांडेकर याने चार धावांत तीन गडी तर, शिवेश वेदासेन याने सात धावांत तीन गडी टिपले आणि इकोल संघाच्या डावाला खिंडार पाडले. हे लक्ष्य अवधुत विभुते क्रिकेट अॅकॅडमीने ७.२ षटकात सहज पूर्ण केले. आर्यन बरगाळे याने नाबाद २९ धावा जमवून संघाचे विजेतेपद निश्चित केले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण कार आर्टचे तुषार शिंदे, भरत मारवाडी आणि ४० वर्षावरील खेळाडू संतोषकुमार सांगळे यांच्या हस्ते करण्यात आले. सुत्रसंचालन सनी मारवाडी आणि आभार अमित काळे यांनी मानले. विजेत्या अवधुत विभुते क्रिकेट अॅकॅडमी आणि उपविजेत्या इकोल स्पोर्ट्स फाऊंडेशन संघांना करंडक आणि मेडल्स् देण्यात आली.

क्षितिजाचे चौथे सुवर्णपदक

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

प्रतिस्पर्धी मल्लाला एकही गुण मिळवू न देता १०-० अशी मात करत खोपोलीच्या क्षितिजा मरागजे हिने पंढरपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत चौथ्यांदा सुवर्णपदक पटकावले. प्रणाली घनवट हिने रौप्य, तर ऋतुजा रुपनवर हिने कांस्यपदक मिळवून रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. खोपोलीतील क्षितिजा प. पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलमध्ये अकरावीत शिकत असून, तिच्या सातत्यपूर्ण सरावातून आणि जिद्दीतून हे यश मिळाले आहे.



क्षितिजा, प्रणाली आणि ऋतुजा यांच्या यशाबद्दल रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर, तहसीलदार अभय चव्हाण, खोपोली नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष सुनील पाटील, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाह किशोर पाटील आणि प. पू. गगनगिरी इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक गौरव तिवारी यांनी अभिनंदन केले.

अंशुल कंबोज, आकाश दीप कसोटी संघात

। मुंबई । प्रतिनिधी ।

न्यूझीलंड विरुद्ध एकदिवसीय आणि कसोटी मालिकेसाठी राष्ट्रीय निवड समितीने भारतीय क्रिकेट संघाची घोषणा शुक्रवारी केली. जसप्रीत बुमराला कसोटी संघात निवडले असून, वनडे मालिकेसाठी त्याला विश्रांती देण्यात आली आहे. तसेच आकाश दीप आणि अंशुल कंबोज यांचे भारताच्या कसोटी संघात पुनरागमन झाले आहे.

शुभमन गिल याच्याकडे पहिल्या तीन वनडे सामन्यांचे नेतृत्व असणार आहे. त्यानंतर तो कसोटी मालिकेच्या तयारीसाठी उपलब्ध होईल. यामुळे अखेरच्या दोन वनडे सामन्यांसाठी श्रेयस अय्यर याच्याकडे टीम इंडियाचे नेतृत्व असेल.

प्रसिध कृष्णा याचे वनडेतील स्थान व रिषभ पंत याचे कसोटीतील





स्थान तंदुरुस्तीवर अवलंबून असेल. तिलक वर्माला अखेरच्या दोन वनडेंसाठी भारतीय संघात स्थान देण्यात आले आहे.

महाराष्ट्राचा ऋतुराज गायकवाड वनडे संघात असून, रवींद्र जडेजा फक्त कसोटी संघात आहे. नितीशकुमार रेड्डी, कुलदीप यादव व मोहम्मद सिराज हे तीनही खेळाडू वनडे तसेच कसोटी संघात आहेत. ध्रुव जुरेल, देवदत्त पडिक्कल आणि साई सुदर्शन यांना कसोटी संघात स्थान देण्यात आले आहे.

कसोटी मालिकेसाठी भारतीय संघ : शुभमन गिल (कर्णधार), यशस्वी जयस्वाल, के. एल. राहुल (उपकर्णधार), देवदत्त पडिक्कल, रिषभ पंत (यष्टिरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), रवींद्र जडेजा, अंशुल कंबोज, जसप्रीत बुमरा, प्रसिध कृष्णा, आकाश दीप, साई सुदर्शन, नितीशकुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज.

पहिल्यातीनवनडेसामन्यांसाठी संघ : शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), के. एल. राहुल, नितीशकुमार रेड्डी, अक्षर पटेल, नमन धीर, अंशुल कंबोज, गुरनूर ब्रार, ऋतुराज गायकवाड, अर्शदीप सिंग, ईशान किशन (यष्टिरक्षक), मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, कुलदीप यादव.

चौथ्या आणि पाचव्या वनडे सामन्यांसाठी भारतीय संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, तिलक वर्मा, ईशान किशन (यष्टिरक्षक, उपकर्णधार), नितीशकुमार रेड्डी, अक्षर पटेल, नमन धीर, अकीब नबी, गुरनूर ब्रार, ऋतुराज गायकवाड, अर्शदीप सिंग, कुमार कुशाग्र, मोहम्मद सिराज, यश ठाकूर, कुलदीप यादव.

शिवनेरी कबड्डी महोत्सव | माटुंगा वर्कशॉपला चारली धूळ

रिजनल स्पोर्ट्स बोर्डाची विजयी आगेकूच

। मुंबई । प्रतिनिधी ।

रिजनल स्पोर्ट्स बोर्डाने आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत माटुंगा वर्कशॉपचा ४२-१० असा धुव्वा उडवला. शिवनेरी सेवा मंडळ, दादर यांच्या वतीने आयोजित शिवनेरी कबड्डी महोत्सवातील व्यावसायिक गटाच्या तिसऱ्या फेरीत रिजनल स्पोर्ट्स बोर्डाने प्रवेश केला. पुढील फेरीत त्यांचा सामना बीपीटी संघाशी होणार आहे.अजिंक्य कापरेच्या पल्लेदार चढाया आणि साई केरूडच्या पोलादी पकडीच्या जोरावर रिजनल स्पोर्ट्स बोर्डाने माटुंगा वर्कशॉपवर ३२ गुणांनी दणदणीत विजय मिळवला.

कुमार गटात अमर क्रीडा मंडळाने श्रीराम क्रीडा मंडळाचा ५३-३३ असा २० गुणांनी पराभव केला. अमर क्रीडा मंडळाकडून



साहिल बंगरने चढाईत, तर सागर राजपूतने पकडीत चांगली कामगिरी केली. श्रीरामकडून अमित सिंगने चढाईत आणि हर्ष काळेने पकडीत प्रतिस्पर्ध्यांना रोखण्याचा प्रयत्न केला.अन्य सामन्यात विजय क्लबने नवोदित क्रीडा मंडळावर ३७-२८ असा नऊ गुणांनी विजय मिळवला. विजय क्लबकडून श्रेयान पुजारी आणि विजेंद्र यादव यांनी अनुक्रमे चढाई व पकडीत योगदान दिले. नवोदित क्रीडा मंडळाकडून तनीक्ष चव्हाणने चढाईत, तर विघ्नेश गुरवने पकडीत कामगिरी केली.

महिला गटात विवेक महिला संघाने जिजामाता महिला संघाचा ४२-७ असा ३५ गुणांनी धुव्वा उडवला. विवेककडून हरजीत संधूने चढाईत, तर स्विटीने पकडीत प्रभावी कामगिरी केली. जिजामाता संघाकडून वेदिका सावंतने चढाईत आणि कृतिका चव्हाणने पकडीत प्रयत्न केले.दुसऱ्या सामन्यात डॉ. शिरोडकर संघाने स्वामी समर्थ महिला संघावर ४५-२५ असा २० गुणांनी विजय मिळवला. डॉ. शिरोडकर संघाकडून साक्षी सावंतने चढाईत, तर श्रावणी घाडीगावकरने पकडीत चमक दाखवली. स्वामी समर्थ संघाकडून साक्षी जंगमने चढाईत आणि सई शिंदेने पकडीत योगदान दिले.शिवनेरी कबड्डी महोत्सवातील या सामन्यांमध्ये खेळाडूंच्या चपळ चढाया, अचूक पकडी आणि सांघिक कामगिरीमुळे कबड्डीप्रेमींना रंगतदार सामने पाहायला मिळाले.

बीपीटी, पश्चिम रेल्वेचीही आगेकूच

दुसऱ्या फेरीतील अन्य लढतीत बीपीटीने मुंबई पोलिसांचा ४५-२० असा २५ गुणांनी पराभव केला. बीपीटीकडून अनुराग सिंगने चढाईत, तर रूपेश साळुंखेने पकडीत प्रभावी कामगिरी केली. मुंबई पोलिसांकडून विजय घाडगेने चढाईत झुंज दिली.पश्चिम रेल्वेने नेस्टजेन अॅकॅडमीचा ५३-३३ असा २० गुणांनी पराभव केला. पश्चिम रेल्वेकडून प्रणय राणेने चढाईत, तर आकाश शर्माने पकडीत चमक दाखवली. नेस्टजेन अॅकॅडमीकडून निखिल पुजारीने चढाईत आणि सुशांत वाघमोरेने पकडीत योगदान दिले.सेंट्रल रेल्वेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियावर ३४-२० असा १४ गुणांनी विजय मिळवला. सेंट्रल रेल्वेकडून समीर भोगलेने चढाईत, तर राहुल परबने पकडीत प्रभावी कामगिरी केली. रिझर्व्ह बँकेकडून सुमित मिसाळ आणि शंकर साळुंखे यांनी अनुक्रमे चढाई आणि पकडीत प्रयत्न केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)